नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका


मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

मूल्य : १ रु.

युगवाणी



कै. नाना जोग

अनुक्रमणिका

अनुक्रमणिका

मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.

प्रकाशक : मा. नी. गलगलीकर, विदर्भ सहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ–पुरस्कृत
विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

युगवाणी

संपादक
मा. नी. गलगलीकर

वर्ष २२] सप्टेंबर १९६७ [अंक ५

ॐ नमो आद्या । वेदप्रतिपाद्या ।
जय स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥

हें शब्दब्रह्म अशेष । तेचि मूर्ति सुरेख ।
जेथे वर्णवपु निर्दोष । मिरवित असे ॥

स्मृति तेचि अवयव । रेखा अंशिक भाव ।
तेथ लावण्याची ठेव । अर्थशोभा ॥

अकार चरणयुगळ । उकार उदर विशाळ ।
मकारु महामंडळ । मस्तकाकारें ॥

हे तिन्ही एकवटले । तेथ शब्दब्रह्म कवळले ।
तें मियां गुरुकृपा नमिलें । आदिबीज ॥

—ज्ञानेश्वर

कविता

यक्षप्रश्न !

स्वप्नांतिल माझेपण
दे लोटुन जागेपण.

जागेपण जगताचे
नियतीच्या फासाचे
मज माझे ते बंधन
चिरलांच्छित जडतेचे.
सघन कृष्ण बर्फाच्या दो थडीत गारठते
चिरविरही माझे मन.

दुसरा मी तिसरा मी
मजमधला चवथा मी
कुठवर हा विरह असा
मज त्याचा त्याचा मज
साहिन मी साहिन मी !

रोषाच्या कोशामधि धुमसत मी जळफळतो
एकाकी रात्रीच्या वेदनेत तळमळतो
सुखशायी तृष्णेला कवटाळुन अंतरतो
अहेवपण बघुन पुनः जगण्याचे
गडबडतो गहिवरतो.

डोळचांच्या दुनियेला रुतुन खुपुन जे वसते
मजभवती वावरते विश्वरूप दर्शन ते
झुरणारे गाऱ्हाणे स्फुंदतसे अपुल्याशी
स्वर त्याचा आर्तपणे झोंबतसे हृदयाशी
खोटचांच्या बासनात वाण कसा खपताहे
कुठल्याशा कळसावर काक कसा बसलाहे
उघडचावर अन् सौदा मिचकावुन नयनाला
आडमार्ग राजमार्ग मिळुन जाय कवणाला

पैशाच्या थैलीची लाथ सुखे झेलुन घे
उदरंभर ठळकपणे आणि कसा मिरवुन घे
नवलाचे हेच जिणे
बघणे अन् विकलपणे
मजमधला अज्ञ कुणी
प्रश्नांकित होय कुणी.

हे जगणे कंटकमय संकटमय.
ते चिन्मय ते मृण्मय.
शोधुन परि काय ऋणी
होइन मी होइन मी ?
स्वप्नांतिल जागेपण
दे लोटुन माझेपण.

—यक्ष

दिलेस तू

दिलेस तू खूपखूप दिलेस
चार रात्रीच्या आठ पाकळचांचे
एक स्वप्नफूल दिलेस
लुकलुक देते का चांदणी कधी ?
तीहि दिलीस
इंद्रधनूचे रंग दिलेस ओंजळी भरभरून
चुकून स्पर्श होता माझ्या बोटांचा कशी
गेलीस अंगभर मोहरून
हातावरले गोंदण देता आले नाही म्हणून
कशी गोरीमोरी झालीस
साक्षीला चंद्र असून पहिले चुंबन देताना
तूच तुला किती भ्यालीस !

दिलेस तू खूपखूप दिलेस
मृगजळाची सावळीनिळी तहान दिलीस
वादळवेड्या आषाढाची जीवघेणी ओढ दिलीस
पुनर्वसूची संथ लय आणि हस्ताची मस्ती दिलीस
दादऱ्याच्या दर्दात मिसळून गझलाची गुंगी दिलीस
पहाटवाऱ्याच्या सतारीवर आसावरीची धून दिलीस
कालिदासाची एक उपमा दिलीस तुला आवडलेली
उमरखय्यामची एक रुबायी दिलीस
माझ्याकरिता निवडलेली

दिलेस तू आणखीहि काहीबाही
देऊ नये तेहि दिलेस !

सारखी देत राहिलीस आठवणींची अनंत दाने
निर्मळ एखाद्या वत्सल निरागस सरितेप्रमाणे...
नूपुरांच्या नृत्यलीन झंकारात वाटचाल
करण्यात निमग्न असलेली तू
भानच नव्हते तुला—
आयुष्याची वाट वाटते तितकी सरळ नसते
अमृताच्या झऱ्याखाली केव्हाकेव्हा गरळ असते !

...आता वास्तवाची विस्तवी फुले कुंतलात माळताना
आसवे नकोत तुझ्या नेत्रात
आभाळ हरवलेल्या शुक्रतारके !
ऐक, तुझ्या स्वागतासाठी
सनईमधून विलासखानी तोडीचे विव्हल स्वर
झरत आहेत
(शिवाय आहेच आधाराला, 'ताराबलं च चंद्रबलं')
तेव्हा स्मृतीच्या स्वस्तिकावरून कुसुमकोमल
पाऊल उचलीत
हे अखंड सौभाग्यकांक्षिणी,
जुने नभ पापणीत दडवून नव्या आकाशाला
सामोरी जा !
अपूर्तीच्या अक्षत अंधारात तुझी रात्र उजळूत निघो !!

—उ. रा. गिरी

हा आतला प्रवास !

हा आतला प्रवास नसलेला
डोळा नसून डोळा नशा असलेला !
हो काळवात काळी पेटून ज्योत होते
मातीतल्या तमाला कधि शुभ्र सलत रहाते !
सलतेय आत काही ते पाप आज झाले
हातात गोजिरेसे हे स्वप्न साज ल्याले !
पय ते पराशराचे स्थिर एक इथे माता
कुंती युगायुगांची उरते उरी विकलता !
जिरलेय जिणे उदरी, उरलेत गर्भ काळे
अंगांग पेटलेले. हे लोळ, हे उमाळे !
हा आतला प्रवास दिशा नसलेला
डोळा नसून डोळा नशा असलेला !

नारायण रा. पेडणेकर

'किमया'

मानवी प्रज्ञेची चिरतृषित त्रिबिका
अधाशी जीवनातून सरकते घरंगळत
तशी मोटारींची चक्रीय वर्दळ
हळूच घेते पदर लाजल्यागत
खडबडून उठतात स्वनातीत विमाने
विमोही मदिरेच्या मादक गंधातून
अविलंब झेपावून अचुक टिपतात.
वैश्विक सत्याची विकलांगी किमया.

—पुंडलिक आर. नेमाडे

आस

पाहू देगा डोळा माझ्या
आता पाय पंढरीचे
मिटल्या या पापण्यांना
नको जीवन उद्याचे.
जळे उन्हात चांदणे
उरी वाहते ना गंगा
डोकी ठेवायला पाय
हवेत गा पांडुरंगा.

—आशा लिमये

अव्वल इंग्रजी कालातील कादंबरी

—भवानीशंकर श्रीधर पंडित

हरिभाऊंच्या उदयापूर्वी म्हणजे अठराशे पंच्याऐशीपर्यंत मराठी कादंबरीच्या आकाशात सर्वत्र दाट काळोख होता असा एक समज आहे. वस्तुतः या काळोखाच्या उदरात अंधुक उजेड होता; आणि त्या उजेडात पुढे येणाऱ्या 'उषःकाला'ची चाहूल होती.

अठराशेअठरात पेशवाई गेली; आणि तिच्या जागी इंग्रजी राजवट आली. त्या राजवटीबरोबर महाराष्ट्रात इंग्रजी भाषा व इंग्रजी वाङ्मयप्रकार आले. परंतु मराठीत सुरवातीला कादंबरी हा वाङ्मयप्रकार आला, तो मात्र सरळ इंग्रजीवरून आला नाही. इंग्रजी राज्याबरोबर मुद्रण आले; आणि दळणवळण वाढले. त्यामुळे गद्यलेखनाचा विकास व प्रसार झाला. पेशवाईपर्यंतच्या कथा पद्यात होत्या. त्या आता इंग्रजीत गद्यात निर्माण झाल्या. त्यांच्या निर्मात्यांच्या ठिकाणी कल्पकता होती यात अगदी शंका नाही. या कल्पकतेच्या जोरावर त्यांनी मराठीतील आरंभीच्या कादंबऱ्यांच्या सृष्टीची रचना केली. काही समीक्षक त्यांचा उगम संस्कृतात, फारशीत व इंग्रजीत शोधण्याचा प्रयत्न करतात. परंतु त्यांची जडणघडण सर्वस्वी स्वतंत्र आहे. त्यांच्या निर्मात्यांचा संस्कृत साहित्याशी फारसा संबंध नव्हता किंवा इंग्रजी वाङ्मयाशीही परिचय नव्हता. त्यांच्याजवळ कल्पनाशक्ती होती. त्यांना कथेची आवड होती. ती गुंफण्यात त्यांना अत्यंत आनंद होत असे. तेव्हा त्यांनी आपल्या स्वभावसिद्ध प्रतिभेच्या भरवशावर मराठीच्या क्षेत्रात कादंबरीचे नवीन दालन उघडले.

त्या काळच्या कादंबरीकारांना इंग्रजी 'नॉव्हेल' ऐकून माहीत होती. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टींच्या प्रस्तावनेत 'नॉव्हेल'चा वेळ घालवण्याचे एक मनोरंजक साधन म्हणून निर्देश केला आहे. शास्त्रीबुवांचा संस्कृत, मराठी व इंग्रजी भाषांतील वाङ्मयाचा गाढ व्यासंग होता; आणि या तिन्ही भाषांवर त्यांचा सारखा अधिकार होता. परंतु त्यांनी स्वतंत्र कादंबरी लिहिली नाही. अठराशे एकसष्ट ते पासष्टपर्यंत त्यांनी अरबीभाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टींचे भाषांतर केले; आणि अठराशेत्र्याहत्तरात डॉक्टर जॉन्सनच्या 'रासेलस'ला मराठी बोलण्यास शिकविले. 'रासेलस'चा अंतर्भाव कादंबरीत करावा किंवा करू नये हा बहुतेक समीक्षकांसमोर प्रश्न असावा. कारण आजपर्यंत त्यांपैकी एकानेही कादंबरीच्या सदरात त्या ग्रंथाचे विवेचन केलेले नाही. परंतु शास्त्रीबुवांचे चिरंजीव विष्णुशास्त्री चिपळूणकर 'रासेलस'ला कादंबरी मानतात. 'रासेलसा'चा शेवटचा भाग स्वतः विष्णुशास्त्र्यांनी लिहिला होता. ते सांगतात,—"आता या कादंबरीची (म्हणजे 'रासेलस'ची) येवढी योग्यता कशावरून धरली आहे हे जर पाहिले, तर ती संविधानकावरून किंवा रसपरिपाकांवरून आहे असे नाही. संविधानक तर अगदीच लहान व साधे असून प्रस्तुत कादंबरीत कोणता रस म्हणजे पूर्णतः किंवा अंशतःही साधला आहे असे नाही. तींतील बहार काय ती आंतील मजकुरावर आहे. प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य मोहक गुण म्हटला म्हणजे वर्णन करण्याची शैली व आयुष्यातील

निरनिराळ्या स्थितींचे तीत जे यथार्थ व चित्तवेधक विवेचन केले आहे ते होय." [निबंधमाला, ३ री आ. पृ. ७०९] डॉक्टर जॉन्सन ज्या अठराव्या शतकात झाला, त्याच शतकात रिचर्डसन्, फिल्डिंग, स्मॉलेट, स्टर्न इत्यादी सुविख्यात इंग्रज कादंबरीकार होऊन गेले. पण शास्त्रीबुवा भाषांतरासाठी त्यांच्या कादंबऱ्याकडे वळत नाहीत हे लक्षात घेण्यासारखे आहे. 'मंजुघोषे'चे कर्ते नारो सदाशिव रिसबूड त्या कादंबरीच्या प्रस्तावनेत लिहितात; --"आपल्या मुंबई इलाख्यात अलिकडे पाच चार वर्षांत असले काल्पनिक ग्रंथ उपस्थित झाले आहेत. ते व इंग्रजीतील 'नॉव्हेल्स' यांची तुलना करण्याचा उपयोग नाही. अशा प्रकारचे ग्रंथ करणारे आपल्यांत बुद्धिमान लोक उत्पन्न होणार नाहीत असे समजू नये. अशा गोष्टीत काही तरी वेळ लागेलच. या ग्रंथांचे वास्तविक स्वरूप मला इंग्रजीचा संस्कार नसल्यामुळे माहीत नाही. 'नॉव्हेल्स'चा उद्देश, या जगामध्ये सद्गुणी पुरुषास दुष्ट लोकांपासून पुष्कळ संकटे येऊन अंती सुख प्राप्त होते, हा दाखविण्याचा असतो. आपल्या लोकांच्या आयुष्यामध्ये अतिशय मोहक सद्गुण किंवा दुर्गुण दोन्ही आढळत नाहीत. 'नॉव्हेल्स' करण्यास हीच अडचण होते."

कृष्णशास्त्र्यांनी 'नॉव्हेल'चा नुसता निर्देश केला आहे. विष्णुशास्त्र्यांनी संविधानक, रसपरिपाक, आतील विषय, वर्णनशैली आणि यथार्थ व चित्तवेधक विवेचन या तिच्या गुणांची मोजदाद केली आहे; आणि रिसबुडांनी तिच्या सद्धेतूकडे अंगुलिनिर्देश केला आहे. रिसबुडांनी अठराशेसत्तरांत 'विश्वासराव' कादंबरी रचली. तिच्या समीक्षणात 'विस्तारा'चे संपादक गुंजीकर म्हणतात;—"काल्पित गोष्टीत लिहिणाराचा उद्देश लोकांच्या रीतिभाती, त्यांची धर्मसंबंधाची मते, राज्यप्रकरणी अभिप्राय, त्यांचे पोषाख, लढाईच्या रीती, त्यांच्या विचारसरणी वगैरेचे वर्णन करण्याचा असला पाहिजे, ती केव्हाचीही असोत, त्याच्या वेळची किंवा पूर्वीच्या वेळची. तसेच या गोष्टीच्या स्थळांचे वर्णन केले पाहिजे. मनुष्याचा स्वभाव सांदीकोंदीतून शोधला पाहिजे. सारांश, कादंबरीकार हा एक इतिहासकारच आहे. एका मोठ्या मनुष्याने म्हटले आहे की, आम्हास जे काही अगोदरच माहीत आहे त्यास रंग व ठाकठिकपणा देऊन मनावर नीट उठवणे हा कल्पित कादंबरीचा उद्देश. आता जर कदाचित् ती कल्पित गोष्ट आमच्या अनुभवाच्या उलट स्वभाव व गोष्टी घडवील, तर त्यापासून माहिती ग्रहण न करता ती गोष्ट आपण असंभवनीय म्हणतो. तिच्यावरून आम्ही आपली मते फिरवीत नाही, उलट मतावरून आपण तिची पारख करतो यावरून दिसेल की कल्पित गोष्ट म्हणजे पृथ्वीच्या रहाटीची नक्कल किंवा अनुकरण आहे. ती जर आम्हास इतिहासावरून माहीत अशा गोष्टीच्या फर्म्याची असली, तर तीस चांगली असे आम्ही म्हणतो. तात्पर्य, रचलेल्या गोष्टीत बीज जवळ असून वृक्षाचा शोध करतात व इतिहासात वृक्षापासून बीज शोधून काढण्याकडे वळतात." [वि. ज्ञा. वि , सप्टेंबर १८७०] गुंजीकरांनी 'मोचनगड' ही स्वतंत्र ऐतिहासिक कादंबरी रचली आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर व गुंजीकर दोघेही आंग्लविद्याविभूषित व वाङ्मयविवेचक होते. हरिभाऊंच्या उदयापूर्वी त्यांनी कादंबरीच्या स्वरूपासंबंधी व्यक्त केलेली ही मते महत्त्वाची आहेत. मात्र ती मराठी कादंबरीच्या जन्माला एक तप झाल्यानंतरची आहेत.

मराठीतील पहिली स्वतंत्र कादंबरी अठराशे सत्तावनात बाबा पदमनजी या ख्रिस्ती गृहस्थांनी लिहिली. 'यमुनापर्यटण अथवा हिंदुस्थानातील विधवांच्या स्थितीचे निरूपण' या तिच्या नावावरून तिच्यातील प्रतिपाद्य विषयाचा बोध होतो. बालविवाह, सक्तीचे वैधव्य, व्यभिचार, केशवपन, भ्रूणहत्या इत्यादी अनाचारांनी हिंदू स्त्री किती पतित झाली आहे हे या कादंबरीत निरनिराळ्या स्त्रियांची एक माळ ओवून बाबांनी दाखविले आहे; आणि शेवटी विधवाविवाहाचा व ख्रिस्ती मताची दीक्षा घेण्याचा पुरस्कार केला आहे. ही कादंबरी प्रचारात्मक आहे असा काही समीक्षकांचा हिच्यावर आक्षेप आहे. हा आक्षेप लेखक ख्रिस्ती असल्यामुळे घेण्यात आला आहे हे उघड आहे. वस्तुत: या कादंबरीत लेखकाच्या प्रामाणिक मताचा व प्रांजळ व्यक्तिमत्त्वाचा आविष्कार झाला आहे. या कादंबरीचे कथानक एकसूत्री नाही, तिच्यात मधून मधून प्रवचने आहेत, तिच्यात हिंदूंची

निदानालस्ती आहे असे काही आरोप तिच्यावर आहेत. परंतु लेखकाचा एकंदर स्त्रीजातीकडे पाहण्याचा उदार व विशाल दृष्टिकोण लक्षात घेतल्यास हे आरोप फोल ठरतात. बाबांचा इंग्रजी वाङमयाचा व्यासंग होता. तेव्हा त्यांना 'नोव्हेल'च्या आकाराप्रकाराची थोडीफार कल्पना असावी असे वाटते. मात्र या विधानाला पुरावा नाही.

'यमुनापर्यटन' ही स्वतंत्र सामाजिक, 'रासेलस' ही भाषांतरित तात्त्विक, मोचनगड ही स्वतंत्र ऐतिहासिक आणि 'नारायणराव व गोदावरी' ही स्वतंत्र कौटुंबिक कादंबरी सोडल्यास या काळात स्वतंत्र काल्पनिक कादंबऱ्यांची निपज फार मोठ्या प्रमाणात झाली. या कादंबऱ्यांतील घटना कल्पित, अद्‌भुत, असंभाव्य, योगायोगावर आधारलेल्या असल्यामुळे आणि घटनांच्या क्रमात कार्यकारणसंबंध नसल्यामुळे या कादंबऱ्यांची अनेक समीक्षकांनी थट्टेने बोळवण केली आहे. अव्वल इंग्रजीच्या काळात रावबहादूर विष्णु परशराम रानडे यांनी या कादंबऱ्यांचा सुळसुळाट पाहिला; आणि नाटक व 'नावल' यांच्या वास्तविक स्वरूपाचा बोध व्हावा या हेतूने काशीनाथ बाळकृष्ण मराठे यांना त्यावर एक निबंध लिहिण्यास सांगितला. त्याप्रमाणे मराठे यांनी सोळा फेब्रुवारी अठराशे बहात्तर रोजी मुंबईतील ज्ञानप्रसारक सभेपुढे या विषयावर एक निबंध वाचला. तो प्रसिद्ध आहे. त्यात त्यांनी या स्वतंत्र कल्पित कादंबऱ्यांचा खरपूस समाचार घेतला आहे. त्यांचा तो निबंध आजही वाचनीय व विचारणीय आहे.

स्वतंत्र कल्पित कादंबरीकारांत अग्रपूजेचा मान 'मुक्तामाला' व 'रत्नप्रभा' कादंबऱ्यांचे निर्माते लक्ष्मण मोरेश्वरशास्त्री हळबे यांच्याकडे जातो. हळब्यांच्या कादंबऱ्यांतील पात्रांची नावे पौराणिक आहेत; आणि वातावरण मध्ययुगीन संस्थानांचे आहे. पण आतील प्रतिपाद्य विषय मात्र स्त्रीजातीविषयी सहानुभूती, वैधव्य व पुनर्विवाह हे आधुनिक आहेत. हळबे हे अव्वल इंग्रजीतील परमहंस सभेचे सभासद होते. मुंबईतील ज्ञानप्रसारात त्यांच्या कविता प्रसिद्ध होत. त्यांचे विचार सुधारकी होते. मात्र त्यांनी ते कल्पित कथेच्या द्वारे व्यक्त केले आहेत. 'मंजुघोषा', 'विश्वासराव' व 'वसंतकोकिला' या कादंबऱ्यांचे कर्ते नारो सदाशिव रिसबूड हे कादंबरी लेखनात हळब्यांच्या पावलावर पाऊल टाकून चालणारे होते. मात्र हळब्यांपेक्षा त्यांचा ओढा अद्‌भुताकडे अधिक होता. हळब्यांच्या 'मुक्तामाले'त संकटांची परंपरा असली, तरी त्यांना मर्यादा आहे. या उलट रिसबुडांच्या 'मंजुघोषे'त तिला अंत नाही. हळबे फलशोभनाचे व बलात्काराच्या अतिप्रसंगाचे वर्णन सूचकतेने व संयमाने करतात. याविरुद्ध रिसबूड शृंगाराच्या प्रसंगी नुसता पूर वाहवतात. हळब्यांची भाषा स्वाभाविक व ओघवती आहे. रिसबुडांच्या भाषेला कृत्रिमतेची व अवडंबराची आवड आहे. कित्येकदा तर ती "माझ्या इष्ट कन्येने, नृपश्रेष्ठ कुमारास शिष्टजनही संतुष्ट होऊन ज्यास मान तुकवतील, अशा अष्टविवाहातील वरिष्ठ गांधर्वविवाह करावा." अशा कर्णकर्कश अनुप्रासांचा अवलंब करते. हळबे व रिसबूड यांच्या कादंबऱ्यांच्या धाटणीवर बाबा गोखले यांची 'राजा मदन', केशव लक्ष्मण जोखेकर यांची 'विचित्रपुरी', साळूबाई भ्रतार भाऊसाहेब तांबवेकर यांची 'चंद्रप्रभा विरहवर्णन' आणि पारखीशास्त्री यांची 'मित्रचंद्र' या कादंबऱ्या आहेत. याशिवाय या कालखंडात याच धर्तीवर रचण्यात आलेल्या आणखी पंधरा वीस स्वतंत्र कल्पित कादंबऱ्या आहेत. त्या सर्व ठराविक ठशाच्या आहेत. त्या सर्वांत अनर्थांची परंपरा, सज्जनांचा छळ, दुर्जनांची चैन, चमत्कारांची रेलचेल, कर्मधर्मसंयोगाची गर्दी, ऋतूंची ठरीव वर्णने, नानाविध अलंकार, विपुल वस्त्रेप्रावरणे, वैभव, दिमाख यांची ठरीव साच्याची चित्रे आहेत. त्यात विविधतेचा किंवा निराळेपणाचा अभाव आहे. त्यामुळे ती आज कंटाळवाणी वाटतात.

या सर्व कादंबऱ्या कल्पित व स्वतंत्र आहेत. त्यावरून त्यांच्या कर्त्यांच्या कल्पकतेची कल्पना येते. हे सर्व लेखक स्वप्नसृष्टीत रंगणारे होते; आणि त्यांना त्यांच्यासारखेच वाचक भेटले होते. पेशवाईच्या अखेरीचा जो अतिरिक्त रंगेलपणा, चैनबाजी व आळस अजून समाजात रेंगाळत होता; आणि नव्या इंग्रजी राज्याच्या आगमनाने निरनिराळ्या सामाजिक

सुधारणांचा हळूहळू जो प्रादुर्भाव होत होता, त्याचे प्रतिबिंब या कादंबऱ्यांत पडले आहे. या कादंबऱ्या निर्माण करणारे बहुतेक लेखक अल्पशिक्षित होते. त्यांच्या ठिकाणी किंवा वाचकांच्या ठिकाणी जिज्ञासा किंवा चिकित्सा यांचा अभाव होता. समाजात सर्वत्र चैतन्यशून्य शांतता होती. सामाजिक व राजकीय चळवळींचा काळ अजून उगवला नव्हता. तेव्हा अशा एकाच मुद्रेच्या भाराभर कादंबऱ्या भराभर बाहेर पडाव्या यात काही आश्चर्य नाही. त्यात उच्च प्रयोजन किंवा उदात्त कला यांच्याबद्दल केवळ वर्णनांचा फापटपसारा मात्र आहे.

अव्वल इंग्रजीत जे सुशिक्षित होते, ते त्या काळी स्पर्धा नसल्यामुळे निरनिराळ्या अधिकारपदांवर आरूढ होते. ते 'नॉव्हेल्स'चा मूळ इंग्रजी माध्यमातून आस्वाद घेत. तेव्हा त्यांना या तथाकथित स्वतंत्र व कल्पित मराठी कादंबऱ्यांचे सोयरसुतक नव्हते. कादंबऱ्यांना कुणी जाणता मार्गदर्शक नव्हता. तेव्हा त्यांचा स्वच्छंद संभव झाला. परंतु त्यांच्यातही कांही विशेष गुण आहेत. 'राजा मदन'चा एकमेव अपवाद वगळल्यास या सर्व कादंबऱ्या स्त्रीप्रधान आहेत. 'चंद्रप्रभाविरहवर्णन' या कादंबरीची लेखिका एक स्त्री आहे. पुन्हा 'राजा मदना'खेरीज साऱ्या कादंबऱ्या आनंदपर्यवसायी आहेत. या कादंबरीकलापांत अनेक स्थळी विकारवशता, दैववाद, धर्मभोळेपणा, उत्तान शृंगार, अवास्तव वर्णनावर भर इत्यादी दोष असले, तरी त्यांच्या कथानकांचा शेवट बोधवादांत आणि वाचकांच्या मनावर सद्गुणांचा प्रभाव पाडण्यात झाला आहे हे विसरून चालणार नाही.

अव्वल इंग्रजीतील वाचकांना करमणुकीचे दुसरे साधन नसल्यामुळे ते या कादंबऱ्यांच्या वाचनात रमले. स्वतःच्या आयुष्यात सुखोपभोगाची कमतरता असल्यामुळे ते या कादंबऱ्यांतील त्या तऱ्हेच्या वर्णनाचा मानसिक उपभोग घेऊ लागले. अशी या वस्तुस्थितीची उपपत्ती लावणे भाग आहे. यांपैकी एकाही कादंबरीत स्थळ, काळ, वेळ व मनुष्यस्वभाव ही एक नाहीत हा त्यांचा मुख्य दोष आहे. या सर्व कादंबऱ्यांत प्रत्येक बाबतींत आत्यंतिक अतिरेकता आढळते. "सांप्रत जी नावले विकत आहेत, त्यांत जेवढे पुरुष तेवढे मदनाचे पुतळे, जेवढ्या स्त्रिया तेवढ्या तिलोत्तमा, प्रत्येक शोकस्थळी मरणासारखा शोक, व आनंदस्थळी स्वर्गासारखा आनंद, नवराबायकोचे भाषण म्हणजे प्रेमाचा लोट! त्यात गूढ अभिप्राय किंवा गांभीर्य बिलकूल नाहीत. विझणवारे वाहत आहेत, पक्षी गाताहेत, बागा फुलल्या आहेत, मजलसीचा रंग उडाला आहे, जिकडे तिकडे चमचमाट, घमघमाट किंवा लकलकाट" असे जे मराठे म्हणतात ते काही खोटे नाही.

अठराशे सत्तावन ते अठराशे पंच्याऐंशी या जवळ जवळ तीन शतकांच्या कालखंडात ज्या कादंबऱ्या निर्माण झाल्या त्यांत 'रासेलस', 'यमुनापर्यटन' आणि 'मोचनगड' याच काय त्या तीन कादंबऱ्या तंत्रदृष्ट्या बऱ्याच निर्दोष आहेत. याचे कारण या कादंबऱ्यांचे निर्माते अन्य कादंबऱ्यांच्या कर्त्यांप्रमाणे अर्धेकच्चे नव्हते. 'रासेलस' डॉक्टर जॉनसनच्या कादंबरीचे भाषांतर आहे, 'यमुनापर्यटण' स्वतंत्र कादंबरी असली, तरी तिच्या लेखकाचा इंग्रजी कादंबऱ्यांशी परिचय असला पाहिजे; आणि 'मोचनगड' कादंबरी स्वतंत्र असली, तरी तिच्या लेखकापुढे सर वॉल्टर स्कॉटचा आदर्श होता. उरलेल्या कादंबऱ्यांत 'मुक्तामाला' बरी आहे. पण तिच्यासमोर आदर्श नव्हता. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी 'अरबी भाषेतील सुरस व चमत्कारिक गोष्टी' आणि 'रासेलस' ही दोन भाषांतरे केली. पण स्वतंत्र कथाग्रंथ निर्माण केला नाही याचे कारण आत्मविश्वासाचा अभाव हे असावे. बाबा पदमनजी यांची भूमिका धर्मसेवकाची असल्यामुळे ते पुन्हा कादंबरी रचण्याच्या भानगडीत पडले नसावेत. गुंजीकरांनी गोव्यातील पोर्च्युगीजांच्या जुलुमावर 'गोदावरी' ही कादंबरी लिहावयास घेतली होती. पण ती अपूर्ण राहिली.

अठराशे पंच्याऐंशीत प्रतिभासंपन्न हरिभाऊंचा उदय होताच स्वतंत्र कल्पित कादंबऱ्यांचा अस्त झाला. त्या कादंबऱ्यांतला विषय सामान्य मनुष्याच्या आयुष्यातील नसल्यामुळे आणि कथावस्तूच्या विकासात स्वाभाविकता नसल्यामुळे वाचक त्यांना विटले. त्यांची उभारणी अघटित घटनांवर असे. त्यात व्यक्ति-

रेखनाला अवकाश नसे. त्यातील वर्णनांत वास्तवतेपेक्षा भरगच्चपणावर विशेष भर असे. भाषाशैली कृत्रिम व बोजड असे. त्यामुळे वाचकांनी त्यांना लवकरच दृष्टिआड केले.

या कादंबऱ्या निर्माण होत असताना स्त्री-शिक्षण, विधवाविवाह, परदेशगमन इत्यादी सुधारणांचा आरंभ झाला होता. तेव्हा क्वचित् या कादंबऱ्यांतून प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष त्या सुधारणांचे सूर उमटले आहेत. पण ते दबलेले आहेत. ते मोकळे व प्रभावोत्पादक नाहीत.

असे असले, तरी या कादंबऱ्यांनी केलेले कार्य दृष्टिआड करता येत नाही. एके काळी या कादंबऱ्या अत्यंत लोकप्रिय होत्या. त्यामुळे त्यांच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यांनी तत्कालीन वाचकांचे मनोरंजन करून त्यांना वाचनाची गोडी लावली. वाचन हे रिकामपण घालविण्याचे उत्कृष्ट साधन आहे. या स्वतंत्र कादंबऱ्यांनी पुढे येणाऱ्या सामाजिक व ऐतिहासिक कादंबऱ्यांची वाट तयार केली. आजचा काळ त्या स्वतंत्र कल्पित कादंबऱ्यांना ओळखत नसला, तरी इतिहास आपल्या मुक्तकंठाने त्यांच्या कामगिरीची साक्ष देत आहे.

[नागपूर नभोवाणीच्या सौजन्याने]

पुस्तक परीक्षण

मृत्युंजय मार्कंडेय

(लेखक : सा भू. तु. ना. काटकर; प्रकाशक : सेवा प्रकाशन, अमरावती २; मूल्य : एक रुपया)

श्रीमार्कंडेय ऋषींचे चरित्र आणि "मार्कंडा तीर्थक्षेत्रा"ची माहिती असलेली ही एक छोटी पुस्तिका ! या पुस्तिकेत श्रीमार्कंडेय ऋषींची जीवनगाथा तर आहेच पण त्यासोबतच 'मार्कंडा' तीर्थक्षेत्राची पौराणिक, ऐतिहासिक आणि सद्यःपरिस्थिती यांचे वर्णन आहे. या चरित्रलेखनात प्रसंगोपात्त अनेक नामवंत कवींचे समर्पक वेचे उद्धृत केलेले असल्यामुळे पुस्तक अखेरपर्यंत वाचनीय झाले आहे.

विदर्भातील एका प्राचीन तीर्थक्षेत्राची माहिती पुस्तकरूपाने प्रथमच उपलब्ध करून दिल्याबद्दल श्री. काटकरांना धन्यवाद.

प्रस्तुत पुस्तकात प्रार्थना, स्तोत्र, आरती वगैरे सारे समाविष्ट असल्यामुळे भाविक मंडळीस ते संग्राह्य वाटेल अशी अपेक्षा आहे.

स्वर्गीय मा. सां. कन्नमवार यांचे चरित्र लिहून श्री. काटकरांनी चरित्र-लेखनाच्या दालनात प्रवेश केला आणि आता प्रस्तुत चरित्राच्या निमित्ताने ते या दालनात रमतील आणि साहित्याचे हे दालन समृद्ध करतील अशी आशा व्यक्त करावयास हरकत नसावी.

—वा. के. अत्रे

तो आणि त्याचे दुःख

—शशीकान्त नारायण केळकर

ती खाली नजर वळवून कटाक्षाने त्याची नजर टाळत बोलत होती.

"आता झालं, गेलं विसरून जा. तू मलाही विसरून जा. जेवढं झालं तेवढं पुष्कळ झालं."

"पण का ? अजून काय बिघडलंय ? कोण येईल आपल्यामध्ये ? मी आहे ना तुझ्या पाठीमागे. तू अशी काय करत्येस ?" त्याच्या हावभावात बोलण्यात तीव्र काकुळतीची आणि संतापाचीही धार होती.

तिला तो पहाडासारखा वाटत होता. आणि त्याच्या बोलण्यातील मनस्वीपणाने, तीव्रतेने ती भांबावली होती. तरीही आपल्या शब्दांना केविलवाणेपणाने, शून्यपणाने धरून ठेवायचा ती प्रयत्न करीत होती. त्याच्या गर्द गहन सावलीतून निसटण्यासाठी धडपडत होती.

"नको. माझ्यावर मेहेरबानी कर आणि मला सोड. आपलं आता जमणार नाही."

आणि पुढे मग तिचे नुसते ओठच थरथरत राह्यले.

त्या क्षणी घामेळलेली, घाबरलेली ती त्याला फारच क्षुद्र वाटली. त्याचा चेहरा नुसता क्षुब्ध झाला. सावजाने श्वापदाच्या तोंडातून सुटताना करावा तसा तिचा भेकडपणा पाहून त्याच्या मेंदूत संतापाने तडक गेली.

...आणि त्याची नजर टाळत ती त्याच्यासमोर सशासारखी थरथरत उभी होती.

त्याने दीर्घ श्वास घेतला. छाती श्वासाने भरून रिकामी केली. भुवया किंचित आक्रसून चेहरा निर्विकार केला. व पायाने जमिनीवरील काही तरी उडविल्याचा आविर्भाव करीत तिच्याकडे पाहात हलक्या आवाजात म्हणाला, "जा."

तिने त्याच्याकडे पाह्यले व चटका बसल्यासारखी लगेच आपली नजर त्याच्या चेहेऱ्यावरून काढून घेतली. मागे वळून हळूहळू पावलं टाकीत ती त्याच्यापासून दूर गेली. एक एक पाऊल उचलताना तिच्या छोटयाशा हृदयातली पोकळी मोठी मोठी होत होती.

दूरवर ती नाहीशी होईतोवर तिच्या मावळत्या आकृतीकडे तो त्याच विचित्र निर्विकारपणे पहात राहिला व ती नाहीशी झाल्यावर ओठाचा चंबू करून, शीळ घालण्याचा आविर्भाव करीत सायकलीकडे वळला. सायकलीवर टांग टाकून तो रस्त्याच्या रहदारीच्या प्रवाहात शिरला. एव्हाना त्याने पांघरलेला निर्विकारतेचा बुरखा पार निखळून गेला होता. त्याला छातीत, दंडात उष्ण पोलाद भरल्यासारखे वाटत होते व त्याचे डोळे एखाद्या नरभक्षक श्वापदासारखे त्वेषाने तारारले होते.

गिरमिटासारखी रस्त्यावरची गर्दी भोसकत त्याची सायकल पळत होती. शेवटी त्याने 'जगत'च्या स्टॅण्डवर सायकल आदळली व तो हॉटेलात शिरला. शेवटच्या बाकावर दोन्ही हात मानेपासून लांब काठावर ठेवून तो रेलून बसला. जलद होणारा श्वास त्याने सावकाश हळू केला. समोर आलेल्या वेटरकडे

तिरप्या कठीण नजरेने पाहून तो पुटपुटला, "एक चाय."

समोर आलेल्या चहाचे घुटके घेत घेत तो शून्य संतप्त नजरेने समोर पहात होता. आणि त्या क्षणी त्याला तोच आत येताना दिसला. ह्याला पाहताच त्याच्या कपाळावर एक रेषा शिडशिडत गेली. तरीही ह्याच्याकडे दुर्लक्ष करून घाम पुसत तो दाराजवळच्या टेबलावर बसला.

मात्र त्याला पाहून हा सरसावला. हाताने कपबशी दूर सारून, त्याच्यावरची नजर घट्ट करीत लांब सावकाश ढेंगा टाकीत हा त्याच्या जवळ गेला.

ह्याला आपल्याकडे येताना पाहून तो सरसावला. व ताठ झाला.

ह्याने त्याच्या खांद्यावर आपले जड हात ठेवले. व त्याचे दोन्ही खांदे घट्ट धरून हालवीत, त्याच्या डोळ्यांत डोळे घालीत ओरडून म्हणाला—"यू विल नॉट कम इन बिट्वीन अस. आय लव्ह युवर सिस्टर विथ ऑल माय हार्ट अँड शी लव्हज् मी टू—"

त्याच्या पकडीतून सुटण्याचा प्रयत्न करीत एका असुरक्षिततेच्या अपराधीपणाच्या भावनेने तो त्याची नजर टाळत ओरडला, "शी डज नॉट लव्ह यू अंडरस्टॅंड ? शी डज नॉट..."

त्याचं वाक्य पुरं व्हायच्या आत ह्याने त्याच्या तोंडावर गुद्दा मारला. एक...दोन...तीन आणि हा त्याच्यावर नुसता तुटून पडला. जसा काही हा त्याचा विध्वंसच करणार होता. त्याच्या मनातून, शरीरातून शुद्ध त्वेषाच्या ज्वाळा उफाळत होत्या व त्याचे हातपाय एका अमानुषतेने हलत होते.

—त्याने पहिल्यांदा बराच प्रतिकार केला पण त्याच्या मनात एक अपराधीपणाची भावना त्याचं मन पोखरीत होती. आणि एक अगतिक, अजागळ भीती त्याच्या घशात दाटून येत होती. रडक्या आवाजात तो काहीसं चित्कारीत होता.

हॉटेलचे वेटर्स धावले. तिघातिघांनी मिळून त्याला घट्ट धरून बाजूला केले. एका बाकावर त्याला बसवले. पूर्ण वेगात आलेले अजस्त्र यंत्र कळ दाबून एकदम बंद केल्यासारखा हा उसासत, चपापत त्वेषाने त्याच्याकडे पहात नुसता बसून राह्यला.

—आणि क्षणार्धात उठला. दात ओठ खात खोटचा द्वेषाने त्याच्याकडे पहात असलेल्या त्याच्या चेहेऱ्यावर थुंकला व सायकल घेऊन बाहेर रस्त्यावर आला.

रस्त्यावर आता दिव्यांची रोषणाई झाली होती व स्त्रीपुरुष गर्दीगर्दीने फिरत होते. तेव्हा त्याला जंगी शवयात्राच जात असल्याचा भास झाला.

तो घरी आला. कपडे कसेबसे अंगावरून ओरबाडल्यासारखे काढून बाहेर गच्चीत येऊन उताणा झोपला. उघडचा पाठीला गच्चीचा थंड स्पर्श झाला. आकाश विष घेतलेल्या शरीरासारखे काळेनिळे पडले होते. व आकाशातले तारे ठिणग्या उडाल्यासारखे दिसत होते.

त्याच्या शरीरात, डोळचात दाटलेला त्वेष जणू वाफा होऊन त्याच्या अंगातून बाहेर पडत होता. त्याचं मन, शरीर केवळ फणफणत होतं. तो गच्चीवर उताणा झाला. चेहेऱ्याला, उघडचा छाती–पोटाला गच्चीच्या फरशीचा थंड स्पर्श झाला.

त्याने डोळचावर पापण्या दाबून, हुंदका देण्याचा, स्वतःला त्या दुःखात वाहून टाकण्यांचा प्रयत्न केला.

पण ते घनगंभीर विराट दुःख, एखाद्या प्रेताकडे दूर बसून हनुवटीवर बोट ठेऊन पहात रहाणाऱ्या नातेवाईकासारखे निर्विकारपणे आपल्या सहस्र नजरांनी त्याच्याकडे रोखून पहात होते.

तो पुन्हा उताणा झाला. व त्या दुःखाच्या त्याच्यावर रोखलेल्या सहस्र नजरा टाळत आपले वाळवंटासारखे एकाकी, भकास डोळे सताड उघडे ठेवून तसाच उताणा पडून राह्यला.

लोकनाटय

—कै. गणेश शिवराम जोग

[गणेशचतुर्थी कै. नाना जोगांची जन्मतिथी. ह्या अंकात कै. नाना जोगांचे मराठी रंगभूमीच्या शंभरीच्या निमित्ताने झालेले एक भाषण देत आहोत. विषय आहे—लोकनाटय. तारीख ११ जानेवारी १९४४. त्या शंभरीच्या वेळेस मराठी रंगभूमीची शंभरी भरली असा एक प्रवाद ऐकू येई. कै. नानांचे भाषण आजच्याही काळास उद्‌बोधक ठरावे.

—संपादक]

मराठी रंगभूमीच्या शतसांवत्सरिक उत्सवाच्या प्रसंगी महाराष्ट्रात जी अनेक व्याख्याने व भाषणे केली गेली व जे लेख प्रसिद्ध झाले त्या सर्वांचा परामर्ष घेण्यासाठी, त्यांचा पुनरुच्चार करण्यासाठी किंवा त्यांची विधाने खोडून काढण्यासाठी मी आपल्या पुढे उभा झालो नसून, आजपर्यंतचे मराठी नाटच काय होते व त्याच्या तुलनेने लोकनाटच म्हणजे काय आणि मराठी नाटच जगावे असे ज्यांना वाटते त्यांनी काय करावयास हवे हे मला मिळालेल्या अवधीत सांगण्याचा मी प्रयत्न करणार आहे.

या प्रसंगी झालेल्या अनेक भाषणांत आणि लेखांत ज्या विचारांचे प्राबल्य दिसून येते ते विचार नाटक डबघाईला आलेले पाहून हताश झालेल्यांचे, चिडलेल्यांचे अथवा उसन्या आशावादाचे आहेत; पण ज्या कारणांमुळे रंगभूमी डबघाईला आली व ज्या उपायांनी ती भरभराटीस येईल ती कारणे व उपाय अचूकपणे कुणाच्याही ध्यानात आले नाहीत, असे म्हणणे मला प्राप्त आहे. नाटच मोडकळीला येण्याची जी कारणे अनेकांनी दिली आहेत ती बहुशः तांत्रिक कारणे आहेत, आर्थिक कारणे आहेत, मनुष्यस्वभावातील दोषांवर सारे खापर फोडण्याच्या सवयीमुळे सुचलेली कारणे आहेत, बाह्य कारणे आहेत. पण नाटचाचा आधारस्तंभ, आत्मा—जीवनाचा वास्तविक आविष्कार, नाटचाच्या माध्यमातूनच केलेला पण मानवी जीवनाला लागू होणारा आविष्कार—तो आत्माच वगळल्यामुळे नाटच मोडकळीला आले व त्या आत्म्याचे पुन्हा अधिष्ठान केले तरच नाटचाचे पुनरुज्जीवन होईल असे कुणी सांगितल्याचे माझ्या पहाण्यात आले नाही.

एखाद्या लोकप्रिय व्यक्तीची, 'शंभर वर्षे भरली' असताना, ती व्यक्ती आसन्नमरण झाली असताना तिच्या घरी तिच्या जवळपासचे बंधु-बांधव, मित्र आणि हितचिंतक जसे गोळा होतात आणि आपापल्या परीने त्या व्यक्तीला वाचविण्याचे उपाय सुचवितात तसाच प्रसंग नाटककारांवर, नटांवर आणि साऱ्या मराठी नाटचप्रेमी लोकांवर आल्याचे दृश्य मला या उत्सवाच्या प्रसंगी दिसत आहे. आसन्नमरण झालेल्या नाटचाच्या घरी जमलेल्या या मंडळीत स्वतः थकलेले, हताश झालेले, त्याचप्रमाणे जो जाणारच आहे, गेल्यासारखाच आहे त्याचे 'बरे' झाले असेही वात्रटपणाने म्हणणारे काही आहेत. शेतकऱ्याची मुले आणि नातू शेत सोडून शहरात गेल्यामुळे तो जसा आपल्या खेड्याच्या वेशीवर बसून अरण्यरुदन करीत असतो तशीही काही नाटचप्रेमी लोकांची गत सिनेमा-टॉकीजनी करून टाकली आहे. काहींची गत याहूनही वाईट झाली आहे. एखादा वैज्ञानिक येतो, चांगल्या धडधाकट शिपेन्झी माकडाच्या ग्रंथि काढून घेतो, त्या ग्रंथि एखाद्या धनवंताला, शेठाला, बहाल करतो, वैज्ञानिकाचा प्रयोग यशस्वी होतो, धनवंत शेठजी तरुण होतो, शिपेन्झी मात्र

पहाता पहाता एकाएकी म्हातारा होतो—अनेकांची अशीही गत याप्रसंगी सिनेमा-टॉकीजनी केल्यासारखे भासत आहे. थकलेल्या, रडकुंडीला आलेल्या वा घाबरलेल्या, त्याचप्रमाणे वात्रटपणातच शिष्टपणा मानणाऱ्या अशा लोकांच्या समूहात नाटचाला झालेल्या रोगाचे निदान व चिकित्सा योग्य प्रकारे होईलच अशी आशा करणे व्यर्थ आहे. न होण्याचीच भीती जास्त !

ऐतिहासिक भौतिकवादाला विरोध न करता, त्याच्याच मदतीने जर आम्ही मराठी रंगभूमीच्या रोगाकडे पाहिले, तो रोग क्रमप्राप्त कसा होता हे जर आम्ही ओळखले तरच जे झाले ते योग्यच झाले असे आपण नि:संकोचपणे व वास्तविकतेला धरून म्हणू शकू; विनाकारण शोक, खोटा शोक, ढोंगी शोक आपण करणार नाही एवढेच नव्हे; तर क्रमप्राप्त म्हणून यापुढे जे करणे योग्य होईल ते आपण अचूकपणे करू शकू. उत्पादन ही जशी एक मानवी संस्था आहे, लग्न ही जशी एक संस्था आहे, मानवी कार्याचे एक आवश्यक क्षेत्र आहे तितकेच आवश्यक असे रंगभूमी हेही एक मानवी कार्यक्षेत्र, संस्था आहे. कोणतीही मानवी संस्था आजपर्यंत तरी नष्ट झाली नाही. जे काही नष्ट झाले आहे ते म्हणजे त्या संस्थांचे, त्या क्षेत्रांचे पूर्वीचे रूप. मराठी नाटचाचेही पूर्वीचे रूप फक्त नष्ट झाले आहे, नाटच नष्ट झाले नाही. मराठी नाटचसंस्था ज्या स्वरूपात १०० वर्षांपूर्वी आपल्यासमोर आली, वाढली, उत्कर्षाला पोचली, निराळचा एका संस्थेच्या आघाताने बारगळली, थकली, त्याचप्रमाणे स्वत:तील अंतर्विरोधामुळे ज्या रूपाने वापरण्यास नालायक झाली ते रूप आता परत येणे शक्य नाही हे सत्य, हे निदान, ही वस्तुस्थिती आपण अगदी धीटपणे मान्य केली पाहिजे. तरच ते बालगंधर्व, तो भावडया, ते खाडिलकर आणि तो एकच प्याला या साऱ्या गोष्टी भूतकाळच्या इतिहासात दर्ज झाल्या असल्या तरी नाटच नष्ट झाले नाही आणि रसिकही रसातळाला गेला नाही, या विश्वासाने मराठी नाटचाची पुढील रचना योग्य प्रकारे आम्हाला करणे शक्य होईल.

हा विश्वास जर आमच्यात नसेल, इतिहासक्रमाच्या ज्ञानामुळे उत्पन्न झालेला आत्मविश्वास जर आमच्यात नसेल तर, जे रडकुंडीला आले आहेत त्यांच्याबरोबर 'मोले रडाया घातले'ल्या जातभाईसारखे वागण्यापलीकडे आमच्या हातून काहीच होणार नाही.

मराठी नाटचाला पुन्हा खडखडीत करण्यासाठी जे यापुढे उपयोगी पडण्यासारखे आहेत ते कसे असावयास पाहिजेत ? नाटचकलेच्या क्षेत्रात ज्यांनी आजपर्यंत काही विशेष कार्य केले आहे ते, ज्यांच्यात कार्य करण्याची धमक आहे ते, जे पुढे निर्माण होतील आणि पुढे येतील ते, थोडक्यात म्हणजे ज्यांच्या ठायी नाटचकलेबद्दल विशेष प्रेम आहे तेच या कार्याला मदत करतील. पण नाटचप्रेम ही एकच गोष्ट त्या कार्याला पुरेशी नाही. नाटचप्रेमी लोकांचे आज अनेक वर्ग आहेत आणि ते बहुतेक सारे रडकुंडीला आले आहेत. या वर्गांपैकी एकेकाचा आपण विचार करू या.

जुन्यातच जगल्यामुळे ज्यांना नवे समजतच नाही आणि म्हणून ज्यांच्या नाटचप्रेमाचा काहीच उपयोग यापुढे करता येणे शक्य नाही, त्या वर्गाबद्दल नुसती सहानुभूती व्यक्त करण्यापलीकडे आम्हाला काहीच करता येणे शक्य नाही.

ज्यांनी प्रयत्न केला तर नवे समजण्यासारखे आहे, पण डोळे उघडून न पाहाण्याचे ज्यांनी ठरविले आहे आणि म्हणून ज्यांनी जुन्यासाठी नुसताच हटवाद मांडला आहे आणि हटवादामुळेच जे आशावादाची भाषा बोलत असतात त्यांचीही स्थिती केविलवाणी आहे. या वर्गाचे एका काळचे चरण्याचे कुरण एका कारखान्याने, सिनेमा इंडस्ट्रीने, बळकावले. ते कुरण आपल्याला पुन्हा परत मिळेल, आणि पूर्वीच्याच स्वरूपात मिळेल हा त्यांचा हट्टी आशावाद. दुसरे तिसरे काही नसून, सारी इस्टेट उडाणटप्पूपणात घालवल्यानंतर, त्याच त्या जुन्या दस्तऐवजांचा तोच तो जुना अर्थ घोकीत कोर्टाचे उंबरठे झिजविणाऱ्या कोर्टकीटकाप्रमाणे, जनतेच्या न्यायासनासमोर न्याय मागणाऱ्या एका जुन्या खोडाचा चिवटपणा, म्हातारपणाचा केविलवाणा उद्योग, आहे. अशा वर्गाचा

नाट्याला पुढे काही उपयोग होणार नाही. आम्हाला त्यांच्याबद्दल वाईट वाटते, एवढेच.

रडकुंडीला आलेल्या नाट्यप्रेमी लोकांचा तिसरा एक वर्ग आहे. या वर्गाला दुबळ्या प्रामाणिकांचा वर्ग आपणही म्हणू. वर्गही आज रडकुंडीलाच आला आहे. रंगभूमीबद्दल या वर्गाची कळकळ स्पष्ट असते, तिच्यासाठी झीजही सोसावयास हा वर्ग तयार असतो. रंगभूमीच्या स्थितीत सुधारणा व्हावयाची असेल तर त्यात आधुनिकता पाहिजे, म्हणजे तिचे स्वरूप बदलविले पाहिजे, असेही यांचे मत असते. पण आधुनिकता म्हणजे काय हेच त्याला स्पष्टपणे समजत नाही, त्याला थोडीबहुत कल्पना असते, पण पुरेशी कल्पना येण्यासाठी या वर्गाने जितके पुढे जावयास पाहिजे तितका हा वर्ग अजून गेला नाही. रंगभूमीच्या सुधारणेसाठी या वर्गाच्या मदतीची पुढे मागे अपेक्षा करावयास हरकत नाही. या वर्गासंबंधी थोडेसे विस्ताराने सांगणे जरूर आहे.

या वर्गाचा प्रतिनिधी म्हणून मी श्री. वर्तकांची निवड केली आहे. मराठी रंगभूमीवर आधुनिकांतले आधुनिक म्हणून गणलेले "आंधळ्यांची शाळा" नाटक निर्माण करण्याचे, ते आधुनिक गणल्या गेलेल्या पद्धतीने बसविण्याचे, आणि काही काळपर्यंत नमुनेदार म्हणून समजल्या गेलेली, एक नाट्यसंस्था निर्माण करण्याचे, आणि या भानगडीत ७ । ८ हजार रुपयांचा मार खाण्याचे श्रेय यांनी संपादन केले आहे. कलेत आणि धंद्यात, दोन्ही ठिकाणी आपल्या कल्पनेप्रमाणे प्रामाणिक राहण्याचा प्रामाणिक प्रयत्न करीत राहिल्यामुळे धंद्याची कला आणि कलेचा धंदा असा घोटाळा उत्पन्न करून जो माणूस शेवटी दुबळा होतो, तशा माणसाचे एक उत्तम उदाहरण म्हणून श्री. वर्तकांकडे बोट दाखविता येईल. सुप्रसिद्ध कादंबरीकार गोर्कीने या वर्गाला भांडवलदाराचा घण आणि कामगाराचा ऐरण यांच्यामध्ये सापडलेला वर्ग म्हटले आहे. आणीबाणीच्या प्रसंगी या वर्गाला स्वतःचे असे निश्चित स्वरूप काहीच रहात नाही.

परवा मुंबईत त्यांचे हौशी नाट्यसंस्थांच्या संमेलनात एक भाषण झाले. त्या प्रसंगी एके ठिकाणी ते म्हणाले:—

"श्रेष्ठ नाटके पुढे आली तरच श्रेष्ठ दिग्दर्शक निर्माण होतील, इतकेच नव्हे, तर उच्च दर्जाचे रंगभूमीची सजावट करणारे कलावंतही निर्माण होतील. यूरोपमध्ये इब्सेन्, शॉ, ड्रिंकवॉटर, गॉल्सवर्दी वगैरे तेथील राजकारणी पुढाऱ्यांच्या बरोबरीचे किंवा बुद्धिमत्तेने त्यांच्याहूनही वरचढ असे नाटककार निर्माण होतात. परंतु हिंदुस्थानात टिळक, गांधी, नेहरू, यांच्या तोडीचे नाटककार नाहीत, याचे एकमेव कारण म्हणजे अशा पुरुषांनी लिहिलेली नाटके पुढे आणणाऱ्या संस्थाच अस्तित्वात नाहीत."

"मित्रहो! तुम्हीच सांगा, ही स्थिती स्पृहणीय आहे काय? मला माहित आहे की, जागजागी अनेक सुरेख नाटके लिहून पडली आहेत. ती रसिकांची वाट पहात आहेत. तेव्हा तुम्ही आता शिळी नाटके टाकून देऊन नवी नाटके शोधण्याच्या उद्योगाला लागले पाहिजे."

वरील उताऱ्यात वर्तकांची कळकळ स्पष्ट दिसते. पण त्यांच्या विधानात विसंगती इतकी आहे आणि ती इतकी उघड आहे की ती विसंगती त्यांच्या हातून प्रामाणिकपणे झाली नसती तर ती त्यांनी केलीच नसती. त्यांची ही विसंगति त्यांच्या प्रामाणिकपणाचे आणि तारांबळ मचली म्हणजे स्पष्ट होणाऱ्या त्यांच्या दुर्बलतेचे एक सुंदर द्योतक आहे. प्रथम ते म्हणतात की श्रेष्ठ नाटके पुढे आली तरच श्रेष्ठ दिग्दर्शक निर्माण होतील. मग ते म्हणतात की टिळकांसारख्या थोर व्यक्तींनी लिहिलेली नाटके पुढे आणणाऱ्या संस्था अस्तित्वात नाही. या एकमेव कारणामुळे अशी नाटके म्हणजे नाटककार, पुढे येत नाहीत. फिरून ते म्हणतात की जागजागी सुरेख नाटके लिहून पडली आहेत; पण ती वाट पहात आहेत—ती रुसून बसली आहेत. दिग्दर्शकासाठी रुसली आहेत का? नाही. ती रसिकांसाठी रुसली आहेत. अशी सुरेख नाटके त्यांना माहित आहेत. पण त्यांपैकी एकाचेही नाव, गाव वा पत्ता न सांगता आपल्या मित्रांना त्यांनी त्यांचा शोध लावण्याच्या उद्योगास लागण्याचा उपदेश केला आहे! 'केवढे हे क्रौर्य!' आणि केवढा हा दुबळेपणा!

वर्तकांचा माझा जो परिचय आहे, त्यावरून मी हे नक्की सांगू शकतो की थापा मारणे हा त्यांचा उद्देश नाही. त्यांना असे खरोखरच वाटते--नाटचाच्या कळकळीमुळे प्रामाणिकपणाने वाटते--की सुरेख नाटकांचे फर्मे अगदी तय्यार असलेच पाहिजेत ! श्रेष्ठ दिग्दर्शक होण्याच्या लायकीचे लोकही हौशी मंडळीत असलेच पाहिजेत; रसिकांची वाणही हिंदुस्थानात नाही; या साऱ्या गोष्टी अगदी जय्यत तयार असूनही नाटचाची ही आबाळ का ? म्हणून ते शेवटी तळतळून सांगतात की काहीतरी करा. उलटे करा, सुलटे करा, कसेही करा, पण मराठी नाटचाचा पुनरुद्धार करा.

वर्तकांच्या वर्गासंबंधी एवढे पुरे. रंगभूमीच्या सुधारणेसाठी, आज नाही तरी या वर्गाच्या मदतीची पुढेमागे अपेक्षा करावयास हरकत नाही, असे मी पुन्हा म्हणतो.

रडकुंडीला आलेला चौथा एक वर्ग आहे. हा वर्ग नाटचप्रेमी आहे, एवढेच नव्हे, तर या वर्गाच्या हातून मराठी नाटचाची प्रत्यक्ष सेवा घडली आहे. नाटचाने महाराष्ट्राच्या संस्कृतीत गेल्या काही वर्षांत जी एकसारखी भर टाकली तिच्यात यांचे फार मोठे अंग होते. वर्तकांसारखे ते धूमकेतू नव्हते किंवा उल्काही नव्हते. पण हा वर्ग नेहमीच संकटग्रस्त होता आणि अजूनही तो तसाच आहे. नाटचाविषयी हे नेहमी प्रामाणिकपणाने वागले, पण हे कच्च्या दिलाचे, कोते होते. ' चार दिन चांदनी, फिर अंधेरी रात ' असे यांचे जन्मभर होत राहिले. आज या वर्गाला ग्रहण लागले आहे. यांचे ग्रहण जेव्हा सुटेल तेव्हा हे पुन्हा चमकतील; पण फिरून ' चार दिन चांदनी, फिर अंधेरी रात ' असे यांचे चालू राहील.

या संकटग्रस्त वर्गाचे सगळचात मोठे संकट, जे यांच्या साऱ्या दुर्दैवाचे एकमेव कारण, असे यांना वाटते, ते म्हणजे पारतंत्र्य. परकीयांनी आमच्या वृद्धीला सर्वतोपरी अडथळे आणले, सदैव आणले, आमचे सर्वस्व नेले, त्याचप्रमाणे आज आमच्या नाटचाला ग्रहण लागण्याचे एकमेव कारण म्हणजे ही परकीयांची छाया; आमच्या नाटचाला फिरून बाळसे येणार हे नक्की, पण ही सटवी जाईल तेव्हा. या वर्गाचे दुसरे संकट म्हणजे सिनेमा-टॉकीजचा उदय, आणि या सावत्र धंद्याला ऊर्जितावस्था येण्याचे कारण परकीय सरकारची त्यावरची मेहेरनजर. हे दुसरे कारण अल्पांशाने खरे असले तरी खुद्द त्याच सावत्र धंद्यात जे पडले आहेत आणि त्या धंद्यातही जो संकटग्रस्तांचा एक वर्ग आहे तो देखील एकच धृवपद गात असतो; ते म्हणजे ' आम्ही स्वतंत्र नाही. ' भांडवलशाही धंद्यात करोडो रुपयांचा नफा लाटणाऱ्या लोकांनाही साम्राज्य-वाद्यांचे संकट अगदी प्रामाणिकपणे जाचत असते. ते रडगाणे गाण्याचा त्यांच्यावरही रोज प्रसंग येतो. पण एकेकाळचे व्यापारी, बनिये, आजचे साम्राज्यवादी झाले ते त्यांच्यात असलेल्या ज्या हिमतीमुळे झाले, काहीतरी विशिष्ट गुणांमुळे झाले, धाष्टर्चामुळे झाले, ज्या गुणामुळे त्यांनी आमच्यावर आपल्या सत्तेची मगरमिठी बसविली त्या गुणांचा आमच्यात जो अभाव होता, व ज्या दुर्गुणांच्यामुळे, कोतेपणामुळे आम्ही ती मगरमिठी पक्की करून घेतली त्या दुर्गुणांचे आमच्यातील वास्तव्य-- दुर्गुणांचे वास्तव्य आणि गुणांचा अभाव आम्ही का विसरतो. परकीयांच्या तुलनेने आम्ही नेहमीच भेकड, कोते राहिलो; इतकेच नव्हे तर परकीयांचे मिंधे होऊन कोटचाधीश होणे, त्यांच्याशी संगनमत करूनच आपल्याच देशबांधवांना लुबाडणे हा आमच्या मोठचातल्या मोठचा भांडवलदारांचा एकमेव धंदा आहे. स्वातंत्र्य मिळाल्याशिवाय आमचा धंदा भरभराटीस येणे शक्य नाही हे जसे भांडवलदारांचे रडगाणे असते, तसेच ते सिनेमावाल्यांचेही असते. तसेच ते या नाटचप्रेमी संकटग्रस्त वर्गाचेही असते.

या नाटचप्रेमी वर्गाला एका महत्त्वाच्या गोष्टीची स्पष्ट जाणीव करून देण्याची वेळ आली आहे. ती जाणीव जर या वर्गाला होऊ शकली तर नाटचाचे भवितव्य उज्ज्वल करण्याच्या कार्यात या वर्गाची फार मदत होण्यासारखी आहे. ती जाणीव करून देणे म्हणजेच लोकनाटचाची व्याख्या करणे होय. ती जाणीव हीच की, स्वातंत्र्य मिळाल्यावरच नाटचाला ऊर्जितावस्था येईल अशी कार्यकारण परंपरा नसून कसल्याही स्वातंत्र्यप्राप्तीचे नाटच हे एक अत्यंत तेजस्वी आणि प्रभावी शस्त्र आहे.

मराठी नाटयाने या शस्त्राचा करावा तितका उपयोग केला आहे काय ? मराठी नाटयाने स्वातंत्र्याच्या चळवळीचा तिरकार केला, तिला तुच्छ लेखले असे माझे म्हणणे नाही. पण नाटय हे प्रचाराचे एक प्रभावी शस्त्र आहे असा जर आमचा आग्रह असेल—आणि तो अनेकांचा आहे—तर मराठी नाटयाने स्वातंत्र्याच्या लढयाच्या काळात आपले शस्त्र खाली ठेवले होते, फार फार तर त्या शस्त्राकडे त्याने आपले हात सरसावले होते एवढेच म्हणता येईल. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या क्षेत्रातील कलावंत म्हणून एकही नाटककार जेलात गेला नाही. प्रत्यक्ष चळवळीत ज्यांनी भाग घेतला, जे त्या चळवळीत असल्यामुळे बंदिवासात गेले, आणि जे साहित्यिकही होते, त्यांनी आपल्या कलेला वाव देताना तिला कायद्याच्या कक्षेत राहण्यापुरताच वाव दिला. आणि तोही स्वातंत्र्याची रणदेवता रंगवण्यापेक्षा स्वतःच्या कौटुंबिक जीवनाला विशाल विशेषणांनी शृंगारण्यापुरताच. नाटककार म्हणून जे प्रसिद्ध होते व जे राजकीय चळवळीतही होते ते नाटककार म्हणून कारावास पत्करायला तयार झाले नाहीत. सरकारची वक्रदृष्टी ज्या नाटकांमुळे कंपनीकडे वळली आणि म्हणून ती कंपनी मोडली अशी नाटके करणारी एकही कंपनी आजपर्यंत महाराष्ट्रात झाली नाही. नाटयकलेचा उपयोग महाराष्ट्रात धंदा अथवा करमणूक अथवा उदारमतवादी शिक्षण एवढयापुरताच करण्यात आला. आमच्या अध्यक्षांनीच उद्धृत केलेल्या एका उताऱ्यात म्हटल्याप्रमाणे "The whole of Ireland was a stage" हे जर खरे असेल आणि रंगभूमीचे सहाय्य स्वातंत्र्यसंग्रामाच्या उठावणीला जर अतिशय प्रभावी असेल, तर मराठी रंगभूमी स्वातंत्र्याच्या अभावी आज स्वस्थ बसली आहे असे एखाद्याने म्हणणे म्हणजे स्वातंत्र्याच्या अभावी आमची स्वातंत्र्याची चळवळ थंडावली आहे असे म्हणण्यासारखेच हास्यास्पद होईल !

"स्वातंत्र्य मिळाले पाहिजे."

"स्वातंत्र्य मिळाले पाहिजे."

"कोण मिळवणार ते स्वातंत्र्य ?"

"स्वातंत्र्य मिळाले पाहिजे" या वाक्यात 'स्वातंत्र्य' हा कर्ता असतो, हेच त्याचे उत्तर !

"मोठी चळवळ झाली पाहिजे" वाक्यात कर्ता 'चळवळ'.

"चळवळ झाली तर तुम्ही काय करणार आहात ?"

"होऊ तर द्या आधी !"

स्वातंत्र्य नाही म्हणून नाटय थंडावले असे म्हणणारे नाटकाच्या धंद्याबद्दल बोलत असतात हे स्पष्ट आहे; आणि आमचा तो धंदा परकीय सरकारमुळे थंडावला असे जे म्हणतात त्याबद्दल सरकारवर आग पाखडायची काहीच गरज नाही; कारण एका नाटक कंपनीने दुसरीला बुडविताना जी ईर्षा दाखविली असेल, स्त्रीपाटर्यांना पळवून नेण्यात जे कौशल्य खर्च केले असेल, त्या मानाने परकीय सरकारने काहीच केले नाही असेच म्हणावे लागेल.

सामुदायिक चळवळीचे असे एक अंग नाही की जिथे नाटयाचा उपयोग अत्यंत प्रभावशाली होत नाही. ही जाणीव साऱ्या नाटयप्रेमी लोकांना होणे फार जरुरीचे आहे. ही जाणीव जसजशी वाढत जाईल तसतसे आमचे नाटय लोकनाटय होईल, आणि त्या लोकनाटयातून पुढे एकंदर नाटयाची उज्ज्वलता वाढेल, आणि नाटयाला समाजातील एखादा विशिष्ट वर्गच उचलून न धरता त्याला जीवंत ठेवण्यासाठी, तिचा परिपोष करण्यासाठी एकंदर जनताच झटेल.

नाटयाला पुन्हा खडखडीत बरे करून चालतेबोलते करण्यासाठी जे नाटयप्रेमी आज रडकुंडीला आले असले तरी, पुढे उपयोगी पडण्यासारखे आहेत. त्यांचा आतापर्यंत विचार करण्यात आला. त्याचप्रमाणे सामुदायिक चळवळीचे एक मोठे हत्यार म्हणून आज नाटयाचा उपयोग केला गेला पाहिजे हेही थोडक्यात सांगण्यात आले. पण सामुदायिक चळवळीत नाटयाशिवाय इतर शास्त्रांचा आज जे उपयोग करीत आहेत, नाटयाबद्दल ज्यांना प्रेमही आहे, आणि जे साहित्यिकही आहेत अशांचा जो एक वर्ग आहे आणि जो अप्रामाणिकही आहे त्या वर्गाबद्दल थोडासा विचार करून मुख्य विषयाकडे वळू. आता-

पर्यंत ज्या वर्गाचा विचार झाला ते दुबळे असले, रडके असले, असमंजस असले तरी पण प्रामाणिक आहेत. अप्रामाणिक वर्गाचा खबरदारीच्या दृष्टीने विचार केला पाहिजे.

मराठी नाट्याची उज्ज्वल परंपरा ज्यांनी गेल्या १०० वर्षांच्या सुरुवातीपासून तो ७०/७५ वर्षेपर्यंत प्रामाणिकपणे पाळली आणि हाताळली, त्यांच्यामागून हा वर्ग आला. पहिल्या काळातील नाटककार एका विशिष्ट संस्कृतीवर भक्कम श्रद्धा ठेवणारे होते आणि त्यामुळे त्यांचा सुधारणावाद प्रतिक्रियात्मकही असला तरी एका विशिष्ट संस्कृतीच्या प्रभावाचा स्पष्ट द्योतक होता. पण त्यानंतर नवमतवाद, नवी मूल्ये, नवे तंत्र, नवे जग वगैरे नवनव्या कल्पना, ज्यांना कार्याचे म्हणजे प्रत्यक्ष कृतीचे असे काहीच स्वरूप प्राप्त झाले नव्हते, त्या व्यक्त करण्यासाठी केवळ शब्दांचे अवडंबर माजू लागले. मैलमैल लांबीची प्रासानुप्रासांनी ताणलेली वाक्ये लोकांच्या मस्तकावर मारण्यात येऊ लागली. लोक मुग्ध झाल्यामुळे त्यात काही तरी असले पाहिजे असे समजू लागले. आणि या भ्रमात काही काळ राहिलेही. पण याच सुमारास जास्त वास्तववादी, जास्त कलात्मक आणि अगदी नवे असे एक सिनेमाचे आकर्षण, त्यांना प्राप्त होण्यास आणि वर सांगितलेले नाट्यतंत्र स्थापन करणारे गडकरी नाहीसे होण्यास एकच गाठ पडली. गडकऱ्यांचे नाट्य त्यांच्या पाठीमागून गेले; हे त्यांचे सुदैवच म्हणावयाचे !

गडकऱ्यांमागून तेच तंत्र घोळणारे जे शिल्लक राहिले, त्यांनी कादंबरीच्या क्षेत्रात धुमाकूळ घालावयास सुरुवात केली. गडकऱ्यांवरही एका विशिष्ट संस्कृतीची आणि परंपरेची पकड होती. कोल्हटकरांना ते गुरू मानीत. पण गडकऱ्यांना पुढारी समजणारे जेव्हा कादंबरीच्या क्षेत्रात पदार्पण करते झाले व नवमतवाद, नवी मूल्ये, नवे तंत्र, नवे जग वगैरे गोष्टी बोलू लागले तेव्हा खरोखरच नवेपण या सर्वांत जे असावयास पाहिजे ते कृतीच्या रूपाने जनतेसमोर काहीही मांडण्यास वस्तुतः हे नालायक असल्यामुळे अगदीच अप्रामाणिक झाले. या वर्गापासून नाट्याने स्वतःला फार जपले पाहिजे, कारण याची अप्रामाणिकता फार उशीरा लक्षात येते.

या वर्गाच्या काही खुणा आहेत तेवढ्या सांगतो.

या वर्गाचे लोकनाट्याचा जीवनाकडे उपयोग करण्याऐवजी जीवनाचे नाटक करणारे असतात. जग म्हणजे मी आणि मी म्हणजे जग अशा विचारसरणीमुळे स्वतःला पोखरता पोखरता पोकळ बनलेले, ज्यांची वाढ म्हणजे त्या पोकळीची वाढ, स्वतःला स्वतःचीच शेंडी धरून स्वतःमागे खेचण्याच्या प्रयत्नात आत्मलुंचन आणि आत्मवंचन करणारे, आणि या प्रयत्नामुळे थकल्यानंतर दुसऱ्यांची वंचना करण्यास उद्युक्त झालेले, सदा धापा टाकीत असलेले, उगीचच्या उगीच अश्रू ढाळणारे, उगीचच संतापणारे सदा मुठी वळविलेले, थरथर कापणारे असे हे असतात. कसे तरी करून सगळ्यांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेणे हा एकमेव प्रयत्न त्यांचा जन्मभर चालू असतो. यांची भाषा प्रचंड, अखंड असते. हे आज काय बोलतील, उद्या काय करतील याचा मुळीच नेम नसतो. आज धैर्यधर, उद्यां सुधाकर, परवा विलंदर असे वेगवेगळे पार्ट एकसारख्याच आवेशाने करण्यात हे फार चलाख असतात. आत्मनिष्ठ पोरांचा कांगावा जसा घरातल्या माणसांना त्रस्त करून सोडतो तसा स्वतःच्याच मानगुटीवर बसलेला हा समंध साऱ्या समाजाला धक्के देण्यात, हादरवण्यात धन्यता मानतो. मराठी साहित्यिकांनी याच्या प्रचंड भाषेला साजेसेच एक लांबलचक विशेषण--अतिरंजित भावनाप्रधानता--अर्पण केले आहे. पण अर्थवाहक विशेषण एकच असू शकते; आणि ते म्हणजे ' नीच ' (Low, Cheap).

या वर्गाचा फार सुळसुळाट झाल्यामुळे मराठी कलेला एकंदरीनेच फार वाईट दिवस आले आहेत.

सामुदायिक चळवळीचे एक अत्यंत प्रभावी हत्यार म्हणून नाट्याचा उपयोग करू लागताच नाट्याचा तो प्रकार बीजरूपाने लोकनाट्याचा प्रकार होतो. उदाहरणे घेऊन पाहू.

" उत्तम शेती " असे आम्ही आजही म्हणतो-- आमच्यात असे म्हणणारे पुष्कळ आहेत. वस्तुतः शेतीची आमच्या देशात काय परिस्थिती आहे ? आपल्याला

सर्वांनाच ती माहित आहे. नाटचाला ही स्थिती सुधारण्याच्या कामी मदत करता येणे शक्य आहे.

शेतीची स्थिती कशी का झाली ? शेतकरी शहरात, कारखान्यांत गेला हे त्याचे एक मोठे कारण आहे. तो शहरांत का गेला ? तिथे, कारखान्यात शेतीपेक्षा त्याला जास्त पैसा मिळतो म्हणून. शेतीवर जास्त, किंवा कारखान्याइतका, निदान आज शेतीवर मिळतो त्यापेक्षा जास्त पैसा त्याला मिळावा म्हणून काय केले पाहिजे ? शेतीच्या पद्धतीत अनेक सुधारणा व्हावयास पाहिजेत, आणि त्यांपैकी सगळचात मोठी सुधारणा ही आहे की शेतकरी शेतीचा जास्तीत जास्त मालक झाला पाहिजे. त्याची ही मालकी कधी प्रस्थापित होईल ? हिंदुस्थान देशाला स्वातंत्र्य मिळेल तेव्हा होईल. शेतकऱ्याने स्वतः मालक होण्यासाठी, देशाला स्वातंत्र्य मिळविण्यासाठी संघटित झाले पाहिजे, काही स्वार्थत्याग केला पाहिजे, काही दोष दूर केले पाहिजेत, उत्पादक अशा नवीन सोयी अंमलात आणल्या पाहिजेत, वगैरे वगैरे गोष्टी नाटचाच्या रूपाने त्याच्यापुढे ठेवण्यात आल्या तर त्यांचा जितका परिणाम होतो जितका पाचपन्नास व्याख्याने ऐकण्याचा, पुस्तके वाचण्याचा आणि फंडाचा होत नाही, ही गोष्ट इतर देशांतील प्रयोगांवरून सिद्ध झाली आहे. अशा तऱ्हेच्या नाटकांचा प्रयोग आम्ही कुठेही केला नाही; तो प्रयोग करण्यापूर्वी स्वातंत्र्याची मुळीच गरज नाही.

दुसरे उदाहरण घेऊ. जगातील आर्थिक अंदाधुंदीमुळे आपले सर्वांचेच जीवन अस्थिर झाले. ही अंदाधुंदी नाहीशी करण्याचा उपाय हाच आहे की अर्थोत्पादनाच्या, अर्थविभाजनाच्या आणि एकंदर अर्थव्यवस्थेच्या साऱ्या यंत्रावर आणि तंत्रावर आमचा सर्वांचाच ताबा पाहिजे, मालकी पाहिजे. आजपर्यंत साऱ्या अर्थव्यवस्थेची शेंडी मूठभर जुव्वेबाजांच्या हाती दिल्यामुळे काय झाले त्याची साक्ष आजचे घनघोर युद्ध साऱ्या जगाला देत आहे. असे होऊ नये म्हणून उत्पादन – विभाजनाचे एकंदर जागतिक यंत्र एकटचा परतंत्र हिंदुस्थानातीलच नव्हे तर स्वतंत्र इंग्लंडातील परतंत्र जनतेच्याही, साऱ्या जगातील साऱ्या जनतेच्या हाती यावयास पाहिजे. आजच्या आर्थिक अंदाधुंदीची चित्रे व त्याच्या उपायांचे दिग्दर्शन नाटचाच्या द्वारे खालच्या वर्गापुढेच नव्हे तर चांगल्या शिकल्यासवरल्या जनतेपुढे व्हावयास पाहिजे. शॉचे Apple Cart अशाच प्रकारचे नाटक आहे. त्या नाटकासारखे हिंदुस्थानातील सामाजिक परिस्थितीला लागू होणारे एकही नाटक आमच्या रंगभूमीवर कोणी आणले नाही. असे नाटक परतंत्र हिंदुस्थानातही रंगभूमीवर आणता येईल, पण आणले गेले नाही.

अगदी आजचेच उदाहरण घेऊ या. बंगालमध्ये उपासमारीने आणि आजाराने लाखो लोक मेले आणि मरताहेत. तेथील भयंकर परिस्थितीची वर्णने आणि कारणे वर्तमानपत्रातून, व्याख्यानातून आम्ही रोज ऐकतो व वाचतो सरकारपासून तो सावकारापर्यंत सर्वांवर याची जबाबदारी टाकताना व्याख्यात्यांनी आणि वर्तमानपत्रांनी आपले टीकास्त्र इंग्लंडातच नव्हे तर खुद्द हिंदुस्थानातही मुळीच आवरले नाही, आणि हा हल्ला सरकार अडवू शकले नाही. यावेळी मराठी नाटच कुठे आहे ? वास्तविक पहाता आजपर्यंत जी जी टीका करण्यात आली तिला खऱ्या गुन्हेगाराची खरी चीड जनतेला यावी तितकी आणता आली नाही. नाटच हे टीकेचे असे माध्यम आहे की तिथे अवास्तव टीका परिणामकारक होत नाही, कार्याला प्रवृत्त करीत नाही, पण वास्तविक टीका कार्याला प्रवृत्त केल्याशिवाय रहात नाही. १०–१५ वर्षांपूर्वी दामाजी नाटकाने जर काही कार्य केले असेल, त्या नाटकाचे जर सामाजिक समर्थन करता येत असेल तर लोकनाटचाच्या द्वारे बंगालवर कितीतरी नाटके लिहिता येतील. कुटुंबसंस्थेची मोडतोड, भुकेमुळे उत्पन्न झालेली अमानुषता, तरुण स्त्रियांचा नैतिक अधःपात यांचे चित्रण, त्यांची कारणे देऊन करणारा जर कोणी नाटचप्रेमी असेल तर तो नाटचालाच काय पण साऱ्या बंगालला वाचविण्याचे पुण्य पदरी घेऊ शकतो.

स्त्रियांसाठी नाटके, विद्यार्थ्यांसाठी नाटके, अगदी लहान मुलांसाठी नाटके—अनेक प्रकारची, समाजातील अनेक घटकांपैकी प्रत्येक घटकासाठी

नाटके आज--अगदी पारतंत्र्यात—करता येण्यासारखी आहेत. अशा नाटकांना आणि म्हणून नाटचाला ऊर्जितावस्था आणण्यासाठी समाजातील प्रत्येक घटक सरसावून पुढे येईल. मराठी नाटचाने अलीकडे जे प्रश्न हाताळले ते बहुतांशी मध्यम वर्गाच्या काही प्रश्नांपैकी करमणूक म्हणून हाताळले, अप्रामाणिकपणे, केवळ शब्दजंजाळात स्वतःला गुरफटून हाताळले. केवळ करमणुकीसाठी हापापलेल्या लोकांना काय ? तमासगीरच ते ! सिनेमा मिळाला, सिनेमाच्या मागे लागले ! तेही चार आण्यात ! भरपूर करमणूक-- फार फार तर २-२॥ रुपयात. शिवाय रोज नवी करमणूक, आणि तीही कशी ? मडमांची, आमच्या राज्यकर्त्यांच्या मडमांची करमणूक !

अनेक प्रश्नांनी भांबावून गेलेल्या लोकांचा एवढा मोठा अफाट समुदाय आहे की ज्यांची आमच्या नाटचाने कधीच पर्वा केली नाही. इतकेच नव्हे तर ज्या ज्या संस्था नुसत्या करमणुकीपलीकडे आणि चर्वितचर्वणाशिवाय काही करीत नाहीत पण स्वातंत्र्याच्या चळवळीची एखादी फळी संभाळण्याची ज्यांची पात्रता आहे असे वाटल्यामुळे त्यांना हाताशी धरण्याचा समाजवाद्यांनी प्रयत्न केला तिथे 'कम्युनिस्ट घुसले' अशी ओरड मात्र त्या संस्थांच्या तथाकथित हितचिंतकांनी केली. सुरेख नाटके रसिकांची वाट पहात बसली आहेत असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? भुकेली जनता भूक शमन करण्यासाठी वाटेल ते करते, वाटेल ते खाते. बंगालमधील उपाशी जनता अन्न न मिळाल्यामुळे कुत्र्याच्या तोंडातला मांसाचा सडका तुकडादेखील हिसकून खाताना किळस मानीत नाही. अशा वेळी सुग्रास अन्न भुकेल्यांची वाट पाहात आहे असे म्हणण्यात काय अर्थ आहे ? समाजातील प्रत्येक घटकाला आणि वर्गाला भांबावून सोडणारे अनेक प्रश्न आहेत. ज्या प्रश्नांच्या उत्तरासाठी भुकेला असा एक अफाट घटक पडला आहे. त्या प्रश्नांची साधी, सरळ उत्तरे त्याला हवी आहेत, एवढेच नव्हे, तर आपले प्रश्न खरोखर काय आहेत हे देखील ज्याचे त्याला कळत नाही असे त्यात कितीकच आहेत. त्यांचे प्रश्न रंगभूमीवर सोप्या पद्धतीने मांडणारे नाटच त्यांना हवे आहे. त्यांना, आम्ही ज्याला सुग्रास समजतो, त्या अन्नाची गरज नाही. त्यांना साधे, स्वच्छ, पौष्टिक आणि भक्कम अन्न हवे आहे. आम्ही जे सुग्रास समजतो आणि मोठ्या नाजुकपणाने table -manners संभाळून, आवाज न करता चावतो, त्या अन्नाची आणि त्या पद्धतीची ज्यांना गरजच पडली नाही, प्रसंगच आला नाही, संधी मिळाली नाही, अशा असंख्य लोकांच्या समाजापुढे आमचे नाटच, आमची कला, आमचे काव्य—केवढेही उजळ असले तरी—जाऊन पोचलेच नाही.

माझ्या दुसऱ्या एका मित्राची एक गोष्ट या मुद्यासंबंधी अतिशय उद्‌बोधक आहे. सुप्रसिद्ध मराठी खंडकाव्य 'भग्नमूर्ती'चे लेखक श्री. आत्माराम रावजी देशपांडे यांची, त्यांनी स्वतःच मला सांगितलेली ती गोष्ट आहे. त्यांची 'भग्नमूर्ती' ज्यांनी वाचली असेल त्यांना श्री. देशपांडे यांच्या सहृदयतेचा दुसरा पुरावा देण्याची गरज नाही; त्यांचा भारतीय संस्कृती आणि कलेबद्दलचा जिवंत जिव्हाळा त्यांच्या काव्यात ओळीओळीत स्पष्ट दिसून येतो. रामटेकजवळ, गावाच्या बाहेर, भारतीय संस्कृती विध्वंसकांच्या हातात सापडल्यामुळे मोडतोड झालेल्या एका काळच्या सुंदर वामनमूर्तीसमोर बसून त्यांनी लिहिलेले ११०० ओळींचे हे काव्य आहे. त्या मूर्तीच्या विध्वंसाकडे पाहून त्यांनी उद्‌गार काढले आहेत—

> **अरे ! ज्या अज्ञात कलावंतांनी**
> **रात्रंदिन अव्याहत खपूनी**
> **तुमच्या उज्ज्वल संस्कृतीलागी**
> **लेणें दिलें होतें बहुमोल हें**
> **असतील त्यांच्या अस्थिहि जरी**
> **कणकण कोठें अंबाळचामधे**
> **त्याहि असतील सळसळल्या**
> **उद्वेगानें, जेव्हा येथे जाहला**
> **विध्वंस त्यांच्या कलाकृतीचा.**

कला आणि कलावंत—तो अज्ञात, अनामिक असला तरी—त्याच्याबद्दलचा जिव्हाळा वरील उताऱ्यातील प्रत्येक शब्दात उतरला आहे. शेवटी, ती भग्नमूर्ती आपल्या अवताराचे जे रहस्य कवीला सांगते ते त्यांनी आपल्या शब्दांत मांडले आहे.—

देखा ! भगवंत वामनमूर्ती
सांगत रहस्य अवताराचे—
असलात जरी आज वामन
वाढ खुंटलेले, खुजटलेले,
दबले, दाबले, चाऱ्ही बाजूंनी
तरीही धरा विक्रम रूप
दाबा पायाखाली बळी काळाला —

हे काव्य प्रसिद्ध होऊन तीन वर्षे लोटली. या काळात वामनाचा संदेश महाराष्ट्रभर दुमदुमला असता इतक्या प्रभावीपणाने श्री. देशपांडे यांनी तो मांडला आहे असेच आम्ही समजू. कवीला पुन्हा रामटेकला जाण्याचा प्रसंग आला. साहजिकच आपल्या काव्यविषयाचे दर्शन घेण्यासाठी तो तिथे गेला. पण तिथे त्याला काय दिसले ? कुणी तरी अज्ञात माणसाने, आपल्या अंगातला कोट काढून त्या वामनाच्या मूर्तीवर चढवला होता, आणि तो त्या मूर्तीच्या चौथऱ्याच्या आधाराने दंड पेलत होता !

ते दृश्य पाहून कवीला काय वाटले असेल ते सांगणे हा माझा उद्देश ही गोष्ट सांगण्याच्या मुळाशी नाही. माझे स्वतःचे या गोष्टीवरील भाष्य मला सांगायचे आहे.

तो गृहस्थ कोण होता हे आम्हाला आजही माहीत नाही. कदाचित् दगडाच्या वामनमूर्ती घडवणाराच एखादा कलावंत तो असेल. 'महाराष्ट्रात दुमदुमलेला असण्याइतका प्रभावी संदेश त्याच्या कानापर्यंत पोचला नसेल. तो 'पहेलवान' म्हणून किंवा 'अडाणी' म्हणून वामनाचा संदेश त्याला कळला आहे की नाही याची चौकशी कवीने केली नसेल. कदाचित् तो एखादी सुंदर कलाकृती उद्या निर्माण करील आणि मरून जाईल आणि त्याचे नाव व पत्ता राहणार नाही. कदाचित् परवा त्याच्या त्या कलाकृतीचा विध्वंस संस्कृतिविध्वंसकाकडून, जपान्यांच्या बॉंब्समुळे होईल, आणि परवा एक कवी त्या भंगलेल्या कृतीपुढे बसून, या पहेलवानाच्या मोठमोठ्या अस्थी सळसळून उठल्यामुळे अंबाळा तलावात तुफान निर्माण झाले आहे असे समजून एक सुंदर काव्य लिहील. पण उभ्या आयुष्यात त्या अज्ञात कलावंताला, त्यानेच निर्माण केलेल्या कलाकृतीचा संदेश कोणी सांगणार नाही. काव्य लिहिले जाईल ते कोणतीही दणकट संस्कृती निर्माण करण्यास व हीन संस्कृतीचा विध्वंस करण्यास सर्वतोपरी असमर्थ असलेल्या मध्यमवर्गापलीकडे जाणार नाही, कारण ते त्याच वर्गाला उद्देशून लिहिले जाईल. त्या वर्गाला ज्ञात कलावंताच्या ओबडधोबड अस्तित्वापेक्षा त्याचे 'अस्थित्व'च अधिक सरस वाटते.

वामनाचा संदेश ऐकून कवी स्वतः उत्स्फूर्त होतो, आपल्या अंगात संस्कृतिरक्षणाचे कार्य करण्याची ताकद आहे असा त्याला अनुभव येतो, आणि तो अनुभव त्याने खालील शब्दात सांगितला आहे—

पुन्हा बांधायास आशामंदिर
उठले पाहिजे आपणच ना !
जीवन कार्य ते आपुलेच ना !
गतशतकांच्या अनुभवांचा
आणि आजच्या ज्ञानविज्ञानाचा
अपूर्व संयोग झालेला जींत
अशा भाग्यशाली नव्या पिढीचें
नवचैतन्याचें जीवन पहा
महाभाग्यें आपणास लाभलें
करूं काहीतरी त्याचें सार्थक

हा अनुभव कवीला स्वतःला येत असला तरी, त्याला नवचैतन्याचे जीवन 'महाभाग्ये लाभले' असे वाटत असले तरी, हा अनुभव त्याच्या वर्गापैकी कितीकांना येतो ? आणि येतही असला तरी त्याचे 'सार्थक' करायला कितीसे तयार होतील ? "तुमचे काव्य व तुम्ही स्वतः धन्य आहा !" असे उद्गार काढण्यापलीकडे ते दुसरे कोणते सार्थक करतील ? ज्या एका अफाट वर्गाच्या अंगात सार्थक करण्याची खरीखुरी ताकद आहे त्या वर्गापर्यंत वामनाचा संदेश जात नाही, आणि ज्यांच्यापर्यंतच तो जातो ते दुबळे, रडके, प्रामाणिक असले तरी असमर्थ, आणि अप्रामाणिकही, वात्रट, बिनबुडाचे, सदैव बुचकळधात पडलेले असेच असतात. त्यांना Finished Products हवे असतात पण Producers आणि Production ची दगदग नको असते. त्यांना संस्कृती हवी असते पण संस्कारकर्त्यांत मिसळायचे नसते. त्यांना

स्वातंत्र्य हवे आहे, पण स्वातंत्र्याच्या लढ्याचे बिनी-वरचे सैनिक व्हावयाचे नाही. त्यांना मुद्यांची सालजाबी हवी असते, पण गुद्यांची नको असते. अशा वर्गाला उत्स्फूर्त करण्यासाठी त्या वर्गातून वर येणारे जे अपवाद उत्पन्न होतात, त्यांना बहुतेक त्या वर्गाकडून वाळीत तरी टाकण्यात येते. नाही तर, फारच झाले तर, "धन्य धन्य," म्हणण्यात येते, आणि इतके होऊनही नवचैतन्याच्या जीवनाचे सार्थक करण्यास तो पुढाकार घेत नाही.

आज ज्या एका वर्गाला गतशतकांच्या 'अनुभवां'-च्या आणि 'ज्ञानविज्ञानां'च्या संयोगाची जाणीव झाली आहे व जो नवचैतन्याने उसळून उठत आहे तो वर्ग, ती पिढी कोणाची ? 'वामन', 'वाढ खुंटलेला', 'चाऱ्ही बाजूंनी दबला' गेलेला असला, तरी 'विक्रम' रूप धारण करून 'बळी काळाला' दाबणारा कोणता वर्ग आहे ? कोणत्या वर्गाची ती पिढी आहे जी आजही अस्तित्वात आहे,, 'अस्थि'रवात नाही ?

आजचा, आमच्या डोळ्यासमोर घडत असलेला डोळा उघडून पाहिला तर डोळे दिपवून टाकणारा जो इतिहास घडत आहे त्या इतिहासाकडूनच आम्हाला या प्रश्नाचे 'समाधान'कारक उत्तर मिळू शकते. तो इतिहास कोणता ?

हजारो वर्षांपूर्वीच्या ज्यांच्या पिढीने आपल्या हातांनी आपले जग निर्माण केले, संस्कृतीची इमारत बांधीत असताना प्रत्येक दगडाला ज्यांचे हात लागले, असंख्य 'वामनमूर्ती'वर ज्यांचे नाव नसले तरी ठसा उमटला आहे, जे परकायपुष्ट कधीच नव्हते, उलट ज्यांच्या रक्ताचे शोषण मात्र पिढ्यान् पिढ्या करण्यात आले, इतकेच नव्हे तर त्यांनीच निर्माण केलेल्या कलाकृतींचा त्यांच्याच हातून विध्वंस करून टाकण्यापूर्वी ज्यांच्या मेंदूतील रक्त शोषण करण्यात येऊन त्या ठिकाणी अनेक मादक तत्त्वे घुसडून ज्यांना बधिर करण्यात आले, त्यांच्याच गेलेल्या पिढीचे आजचे वारसदार जो इतिहास घडवीत आहेत तोच तो इतिहास. दीड वीत जमिनीच्या मालकीमुळे मत्त होऊन, ज्याला फक्त हात आहेत पण डोके नाही, असे आम्ही कालपर्यंत समजत होतो. तोच गत 'अनुभवा'च्या आणि 'आजच्या ज्ञानविज्ञाना'च्या बळावर साऱ्या मानवी संस्कृतीचे रक्षण करावयास उद्युक्त झाला आहे, समर्थ आहे, तोच काही तरी सार्थक, करीत आहे. त्यानेच आपल्या स्वतःच्या देशात Institute of Oriental Studies of the Academy of Sciences of the U. S. S. R. प्रस्थापित केली. एका हाताने 'बळी काळा'च्या अमानुष आक्रमणाचे वार झेलीत असता, दुसऱ्या हाताने आमच्या भारतवर्षातील भव्य कलाकृतींचे, महाभारताचे, स्वतःच्या भाषेत भाषांतर करण्यात तोच गुंतला आहे. भांडारकर इन्स्टिटयूटने आपली एक सटीक प्रत त्यांच्याकडे पाठविल्याबद्दल कृतज्ञ होऊन तो म्हणतो:--

> "The purpose of the translation is to satisfy the interest in ancient India manifested in the U. S. S. R. not only by a narrow circle of specialists but by the intelligentsia at large. The Russian public has always displayed a lively interest in this cradle of human civilization....This epic, glorifying as it does, love of country, military valour, courage and daring, is *topical today when mankind is fighting the dark forces of fascism.* It sings of the finest human features, of justice, honesty, frankness, fidelity to friends and *help to the weak*....I hope to...give a broad section of the Russian intelligentsia the opportunity to make a full acquaintance with this gem of ancient civilization and pride of the Indian people."

त्याच कामगाराला 'भग्नमूर्ती'चे काही मध्यमवर्गीय वाचक आता 'साम्राज्यवादी' म्हणायला तयार झाले आहेत. परकीय कामगाराला आज महाभारत प्रासंगिक (topical) वाटत आहे, पण अप्रामाणिक भारतीय मध्यमवर्ग परकीयांच्या आक्रमणाची वाट पहाण्यात स्वतःचा पराक्रम समजत आहे. या अशा वर्गाकडून मराठी नाटयाच्या कोणत्याही सेवेची आम्ही यापुढे अपेक्षा करू शकत नाही.

ज्या ' अफाट समुदाया 'बद्दल मी वर सांगितले त्याला हवे असलेले नाटच एका विशिष्ट प्रकारचेच असू शकते. त्या नाटचालाच आम्ही लोकनाटच म्हणतो. दुबळचांसाठी, रडकुंडीला आलेल्यासाठी, भांबावलेल्यांसाठी, संकटग्रस्तांसाठी, प्रामाणिक लोकांसाठी— जे संस्कर्ते आहेत आणि संस्कृतिरक्षणही जे करू शकतील त्यांच्यासाठीही मग ते कोणत्याही वर्गाचे असोत लिहिली गेलेली नाटके उत्स्फूर्त करणे, पुढे आणणे, त्यांचे दिग्दर्शन करणे, म्हणजेच लोकनाटच निर्माण करणे होय.

आतापर्यंत लोकनाटच म्हणजे कोणचे नाटच याचा विचार झाला. आता हे नाटच निर्माण करण्याची जी सामुग्री, जे भांडवल, प्रथम हवे त्याचा विचार करू, आणि शेवटी ते निर्माण करण्याची रीत काय असू शकते याचा विचार करू. आज लोकनाटचाचे तंत्र रीतसर पद्धतीने मांडणे शक्य नाही, कारण त्याला अजून आकार यायचाच आहे. ज्या विशिष्ट तत्त्वांकडे डोळेझाक केल्यास लोकनाटच निर्माण होणार नाही, त्याचप्रमाणे ज्या विशिष्ट तत्त्वांसंबंधी दक्षता बाळगल्यास लोकनाटच निर्माण होण्याची शक्यता आहे, त्या तत्त्वांचाच, आणि तोही ठोकळमानानेच, विचार करणे आज शक्य आहे.

सर्वांत महत्त्वाची आणि जरूरीची जर कोणती गोष्ट लोकनाटचाला हवी असेल, तर ती म्हणजे वर उल्लेखिलेल्या अफाट समुदायाबद्दल खराखुरा जिव्हाळा. जिव्हाळा हाच एक असा मसाला आहे की जो कोणत्याही कलाकृतीत असेल तर ती जीवंत, विचारप्रवर्तक, कार्यप्रवर्तक आणि आकर्षक होऊ शकते. एकटचा जिव्हाळचात ही शक्ती आहे असे नाही, पण एकटा जिव्हाळा जर नसेल तर कोणतीही कलाकृती इतर सर्व अंगोपांगे असूनही निर्जीवच होईल. ज्या लोकांसाठी आम्हाला लोकनाटच निर्माण करावयाचे आहे त्या लोकांबद्दल तिरस्कार, तुच्छता, तुटकपणा, त्रागा, त्रास, यांपैकी काहीही नसले पाहिजे.

जिव्हाळचाचे हे महत्त्वाचे व जरूरीचे तत्त्व जिथे असेल तिथेच प्रयत्नाची चिकाटीही असू शकते. ज्या एका वर्गासंबंधी मानवी इतिहासात एकसारखा व सारखाच जिव्हाळा आपल्याला पहावयास सापडतो तो म्हणजे बालकांचा वर्ग. या वर्गासाठी जिव्हाळचामुळे आपण नेहमी झटत आलो आहोत. त्यांच्या शिक्षणासाठी, जोपासनेसाठी, करमणुकीसाठी, विकासासाठी नवनवी साधने निर्माण करण्यास, नवनव्या कलाकृतींचे उत्पादन करण्यास आपण नेहमी झटत आलो आहोत. मुलांशी वागण्यात, त्यांच्या हिताकडे पहात असताना आपल्या हातून चुका झाल्या नाहीत असे नाही, पण त्यांच्याबद्दलचा आपला जिव्हाळा कधीच नाहीसा झाला नाही. आपल्या चुका झाल्या त्या त्यांना न ओळखल्यामुळे झाल्या.

तेव्हा जिव्हाळा असूनही खरे लोकनाटच निर्माण करण्यासाठी लोकांची आपल्याला ओळखही व्हावयास पाहिजे. ही अतिशय महत्त्वाची व जरूरीची दुसरी गोष्ट आहे.

' ओळख ' या तत्त्वात काय काय येते ? ज्या वर्गासंबंधी तुम्ही लिहाल त्याचा पूर्वेतिहास, त्याची आर्थिक परिस्थिती, त्याची रहाणी, त्याच्या आवडीनिवडी, त्याच्या सवयी, त्याच्या महत्त्वाकांक्षा, त्याची भाषा, त्याच्या चालीरीती, त्याची कुवत, त्याच्या भावना, त्याची शरीरप्रकृती, त्याचे ज्ञान, त्याचे शिक्षण, आणि या व अशाच अनेक गोष्टी मिळून तो जो काही एक प्राणी तयार होतो त्याचा सर्वसाधारण साचा, या साऱ्या गोष्टींचा आपल्या मनावर एक ठसा उमटणे म्हणजे त्याची ओळख होणे. ' मनुष्यस्वभाव सगळीकडे सारखाच ' हे जे एक ठोकळेबाज तत्त्व वाटेल तिथे लावण्याचा आपण प्रयत्न करतो, आणि तोही शेवटचे अस्त्र म्हणून करतो, ते अजीबात टाकून दिले पाहिजे. या तत्त्वासारखे भ्रामक असे दुसरे तत्त्व नसेल. प्रथम हे तत्त्व टाकायचे आणि मग ओळख करून घ्यायला बाहेर पडायचे असे केले पाहिजे. असे केले नाही तर खरी जानपछान कोणत्याच वर्गाशी होणार नाही. रशियातील आजच्या लढयाचे जे आकलन आपल्याला होत नाही त्याचे कारण म्हणजे तेथील कामगारवर्गाला आपण आपल्या इथल्या कामगारासारखे देखील समजत नाही, एवढेच नव्हे तर त्याला आपल्यासारखेच कोणी तरी जोशी, जोग, देशपांडे, देशमुख, काळे, केळकर, फडके, बापट वगैरे समजतो; आपल्यासारखे न समजण्याजोगा प्रसंग असेल तर मग आपल्या

(पुढील मजकूर पान १९४ वर)

कला आणि कारागिरी

—कृ. आ. मुंगीकर

आजदेखील एखाद्या कलावंताच्या उत्कृष्ट कलाकृतीऐवजी कारागिरीने युक्त असलेल्या कलावंताची कृती कीर्ती संपादन करताना दिसते तेव्हा काही विचारमंथन होऊ शकत असावे.

एकादी कृती प्रसिद्ध झाल्यानंतर तिची कीर्ती प्रसृत होते आणि ती एक अलौकिक कृती असा समज रूढ करण्यात येतो. पण एकाद्या कलाकृतीचा लौकिक झाला म्हणजे ती कलाकृती श्रेष्ठ दर्जाची असते असे निश्चयात्मक सांगणे धाष्टर्याचे होईल असे वाटते. कारण कीर्ती आणि कलाकृतीची कलात्मकता ह्या बाबी हातात हात घालून जाणाऱ्या सदैव असतात असे नाही. एवढेच नव्हे तर कीर्तीचे मृगजळ कित्येक वेळा दिसते आणि त्या मानाने ती कृती उंचीला अगदीच कमी नरू शकते. कीर्ती वृद्धिगत होण्याला कधी कधी लेखकाची टिमकी वाजविणाऱ्या वर्गाने पुढाकार घेतल्याने त्याच्या लेखनाला अवास्तव महत्त्व लाभून त्याच्या लेखनाला बरीच सूज येते. बरे, केव्हा केव्हा तर असे घडते की बऱ्याच काळपर्यंत ती कलाकृती एक सुंदर कलाकृती आहे अशी समजूत दृढमूल होऊन बसलेली असते. या बाबतीत जेवढे प्रकाशक व संपादक जबाबदार आहेत तेवढीच अनुकूलता काळाने दिलेली असते असे म्हणावे लागेल. कालमहात्म्य येथे म्हणावे लागेल. ' कालाय तस्मै नमः असे म्हणून मूग गिळून बसावे. वाचकांच्या घाईचा हा परिणाम असेल. पण एवढे मात्र खरे की, अशा कलाकृतीत वाङ्मयीन विशेष नसताना तिची कीर्ती मात्र त्या मानाने विशेष चढलेली दिसते. त्याशिवाय लेखकाच्या लेखणीतली कारागिरी त्याच्या गौरवाला कारणीभूत झालेली असते.

लेखकाच्या अभिव्यक्तीच्या युक्त्याप्रयुक्त्या ज्या वेळी त्याच्या लेखणीतून एकामागून एक येऊ लागतात त्या वेळी कारागिरीचा प्रांत सुरू होतो. काहीतरी करून आपल्या लेखनाला प्रसिद्धी मिळवावी ही त्या लेखकाची ईर्षा असते. शिवाय याच वेळी तो वरकरणी त्यात चकाकी कशी येईल यात गुरफटलेला असतो. त्याच्या कृतीत कसरत जास्त आढळेल आणि केलेली मखलाशी पदोपदी सळसळते — भाषेला अवास्तव महत्व देण्यात येऊन जितके भाषिक शब्दालंकार अधिक तितकी कलाकृती अधिक उत्तम अशी समजूत होऊ लागते. शाब्दिक कोलांटउड्या घेतलेल्या आढळतील. विनोदामुळे आपले वाङमय लोकांना रुचेल या आशेने प्रेरित झाल्यावर विनोद कोठे कोठे येऊ शकतो, तो आशयाशी एकरूप होतो की नाही हे कोणी पाहावे ? आपली कुशलता फक्त लोकांच्या हसता हसता मुरकुंड्या कशा वळतात यात दिसावी एवढेच तो पाहील. पाहील म्हणण्यापेक्षा न पाहता विनोद निर्माण करील. विनोदाबरोबर जशा शाब्दिक कोटया येतील तसे शब्दावडंबर आल्यावाचून राहणार नाही. कोणता शब्द कोठे आणला असता लोक संतुष्ट होतील या हिशेबात तो राहील. मूळ आशयापेक्षा चमत्काराची ओढ त्यात अधिक येईल. कॉलेजातील प्रेम–प्रकरणे आल्याने आपल्या कादंबरीला भाव येईल या हेतूने कादंबऱ्या लिहिण्यात येतात. आणि गुलगुलीत वातावरण टाकून मोहजाल पसरविण्यात येते. उद्देश हा की यश लाभून कीर्ती पदरात पडावी. जसजशी मांडणी याप्रमाणे होत जाईल तसतसा कलेऐवजी कृत्रिमतेकडे कलावंताचा काटा झुकेल यात शंका नाही. केव्हा केव्हा तर वेगळयाच हुलकावण्या दिलेल्या असतात आणि

कसाबसा कलकृतीचा डोलारा उभा करण्यास आलेला असतो. पण कलेचा आत्मा कलात्मकता, याची विस्मृती पडलेली असते.

एकाद्या कलाकृतीची निर्मिती जेव्हा होऊ लागते तेव्हा कलावंताची मूलभूत भावना जागृत झालेली असते. हिलाच क्रियाप्रवण भावना म्हणतात. ही जसजशी अधिक जागृत असेल तसतशी ती भावना कलात्मकतेच्या जवळ जाईल. पण ही भावना ज्या प्रमाणात तंत्रमंत्राचा जप करीत बसेल त्या प्रमाणात कलाप्रांतापासून ती दूर जाताना दिसेल. जर ही भावना केवळ ऐटदारपणाच्या आहारी जाईल तर तिला वाटेल की ती कला प्रांताकडे जात आहे. पण त्यात खरे असे आहे की, ती त्या प्रांताला पराङ्मुख होते. येथे तंत्राला महत्त्व प्राप्त झाले तर साधन हेच साध्य होईल. एकदा का साध्याची जागा साधनाने पटकावली की मूळ प्रवृत्तीच नष्ट होते. आकर्षकपणाकडे झुकता झुकता तिचा तोल गेलेला असल्याने ती खाली पडते. पण क्रियाप्रवण भावना संयमाने भावानुभव एका विशिष्ट पातळीवर आणते तेव्हा ती कलात्मकतेची कास धरते. ती एक सहज प्रक्रिया असते. विशिष्ट भावानुभव रेखांकित करण्यासाठी ती एक तळमळ असते. ती आंतरिक तळमळ भावानुभव व्यक्त करू दिल्याशिवाय चैन पडू देत नाही, लेखक बेचैन होतो. ती एक धुंदी असते. धुंदीमुळे हा अनुभव एक विशिष्ट लय घेतो. हे अनुभव सहज आकार घेऊन वर येतात. येथे त्यांना आकार द्यावयाचा नसतो. ती उत्स्फूर्त अशी एक अवस्था असते. ती संवेदना व्यक्त झाल्यावाचून कलावंताच्या जिवाला शांतता लाभत नाही. कलात्मक संवेदनांची तीव्रता त्याला स्वस्थ बसू देत नाही. कलाकृतीच्या बाह्य स्वरूपाकडे तो पाहात नाही. कलात्मक विकल्पन म्हणजे प्रमाणबद्धता व सुसंलाप तिला कलात्मक अनुभवाच्या प्रक्रियेतून लाभतो आणि विशिष्ट सौंदर्य व घाट येतो. येथे बर्नार्ड शॉ म्हणतो त्याप्रमाणे ' Art and Beauty may be regarded as well nigh." याचाच अर्थ हा की कला आणि सौंदर्य यांचे सान्निध्य सातत्याने असावे. परस्परांचा सहवास परस्परांना मिळतो.

कारागीर आपल्या कृतीची रचना कशी असावी यात रमून जातो. वाक्यरचना चांगली होत आहे ना? आश्चर्यचकित करणारी मिश्रवाक्ये व संयुक्त वाक्ये भरपूर पेरण्यात आली आहेत ना? कलाकृतीची पाने इतकीच भरली पाहिजेत. मुखपृष्ठ भडक असावे. नायक व नायिका पाहून वाचक थक्क झाला पाहिजे. आपले लेखन असामान्य वाटले पाहिजे. व वाचकाने 'शाब्बास लेखकाची कल्पकता' असे उद्गार काढले पाहिजेत. कल्पकतेचे कंकण हाती बांधूनच केलेले वर्णन अर्थातच सरळसोट होत जाते. त्यात खऱ्या जीवनाचा अनुभव व्यक्त होण्याऐवजी कृत्रिमपणा येऊ लागतो. अमुक अमुक प्रसंग वर्णिला असता वाचकांची बुद्धी स्तिमित होईल म्हणून तीत तसे तसे प्रसंग येऊ लागतात. भाषा शैलीदार व्हावी हीच अधिक काळजी लागते. पात्रे, प्रसंग त्या भाषेच्या अनुषंगाने येतात. 'काय लेखकाची भाषाशैली आहे!' असे वाचकाने गुण घ्यावेत अशी अपेक्षा ठेवून लेखन होऊ लागते. विपुल लेखन होऊन नावगाव वाढावे अशी उत्कंठा! कीर्तीसाठी सतत झटत राहिल्याने त्यात आत्मकेंद्रितता येते. अशी अहंकेंद्रितता आल्याने लेखकाच्या लेखनाला ठराविक साचा येतो. तो आपल्या लेखनाच्या शिल्पाकडे अधिक लक्ष देत राहतो. व्याज–वर्णने व व्याज–पात्रे निर्माण होऊन अतिरंजितपणा येतो. बाह्यांग तवतकीत कसे होईल यात कृतार्थता मानतो; व मूळ जीवनाकडे पाठ फिरवितो. त्यामुळे कलाकृती निःसत्व व निर्जीव होते. तिचा थिटेपणा जाणवल्यावाचून राहत नाही. कारागीर उतरंड रचल्यासारख्या एकामागून एक कलाकृती निर्माण करून रचतात आणि ती उतरंड कालांतराने कोसळते. हा मुखवटा ओळखू येतो. अंतरंग ओसाड असते. बाह्य तोरण फडकाविण्यात येते. त्याच्या कलाकृतीचे झुडुप दिसून येते.

याचा अर्थ उत्कृष्ट कलावंताची कलाकृती पूर्ण असते असे नव्हे. चांगल्या कलावंतांच्या कलाकृतीत अपूर्णतेतले पूर्णत्व असते. अपूर्णतेतील पूर्णतेची ओढ त्याला लागलेली असते. मानव अपूर्ण आहे तेथे मानवनिर्मित कलाकृती अपूर्ण असणार हे खरे. पण अपूर्णतेतील यशःसिद्धी पूर्णतेच्या जवळपास गेलेली असते. मानव अपूर्ण असला तरी मानवी मन हे विविध आहे. ते विशाल आहे. विविध रंगी आहे. इंद्रधनुष्यातील रंगांच्या सीमारेषा अशा काही मिसळलेल्या असतात की सांगता येत नाही. तशाच मनाच्या रेषा एकमेकीत मिसळतात. अंतरंगाची उकल कोणाला

झाली आहे ? अंतरंगाचा ठाव घण्यात जी मजा असते ती तो कलाकृतीद्वारा व्यक्त करताना लुटतो. म्हणूनच अस्सल कलाकृती अंतरंगाच्या बैठकीवर अधिष्ठित झालेली असते. म्हणूनच कलावंत मानवी मनाच्या विविध हालचाली रंगविण्यात गुंग झालेला असतो. मानवी मनाचा तळ गाठण्यात गुंगतो. मनाला कोणतीच चौकट मान्य नाही. ती साधी बेरीज–वजा-बाकी नसते. तो गुणाकार–भागाकार नसतो. गणिताच्या आकड्यात त्याची मांडणी नसते. $अ_1$, $अ_2$, $अ_3$ मधील स्पंदने—त्यांच्या जीवनातील कलात्मक—व्यक्त करावयाची असतात. काही तरी अनंत अनंत असते. ' मेघ रंगले

चित्त दंगले

गान स्फुरले '

अशी अनंताशी तद्रूपता झालेली असते. पण कलाकुसरीत मात्र मनाच्या ऐवजी बाह्य शरीराला प्राधान्य देण्यात येते. केस, डोळे, कपाळ, भुवया इत्यादींचे वर्णन अधिक. चालण्याची, बोलण्याची ढब आल्याने त्या कलाकृतीचा वरचा पृष्ठभाग चांगला दिसला तरी आत पोकळपणा असतो. ती एक शिथिल अशी रचना असते. प्रसंग, पात्रे बुद्धिबळातील प्याद्यां-सारखी हालविण्यात येतात. ती कलाकृती यंत्रवत् बनते. कृत्रिम पाण्याचा पाट आणि नैसर्गिक नदी यात जे अंतर असते तेच अंतर या दोन कलाकृतींत दिसून येते. अमर कलेत नैसर्गिक असा एक आंतरिक प्रवाह असतो तो न गवसणाऱ्या पूर्णतेकडे जात असतो.

अक्षर वाङ्मय हे ' मागचा मागोवा ' घेत असले तरी ते स्वयंभू असते. त्यात आलेला अनुभव हा एका विशिष्ट वरच्या स्तरापर्यंत पोचतो. अक्षर वाङ्मयात आलेला अनुभव हा अनुभव बनतो. या उलट कारागिरीने युक्त असलेल्या वाङ्मयातील अनुभव हा व्याज अनुभव असतो. म्हणून तो जिवंत नसतो. खरी कलाकृती ही चैतन्यमय असते. चैतन्यशीलता हा तिचा आत्मा. एक अनन्यसाधारण प्रकृती तिला लाभलेली असते. पण कधी कधी गल्लत होते ती अशी की आपण अशा चैतन्यशील नसलेल्या कलाकृती असामान्य मानतो. त्यांना ' युगप्रवर्तक ' लेखक म्हणून संबोधतो. ' First rate writers ' म्हणून त्यांचा गौरव होतो. त्यांच्या कलाकृतीच्या बहुप्रसवतेने त्यांना हे भूषण लाभलेले असते. कधी कधी गुणापेक्षा संख्येकडे पाहण्यात येते. संख्येचा विचार सापेक्ष असतो. त्यात निश्चितता येईल असे नाही. पण हा सर्व पूर्वग्रहाचा परिणाम असतो. नंतर ते तथाकथित लेखक युगप्रवर्तक नाहीत असे उघडकीस येते. रसिक वाचक हा बुडबुडा फोडतात, तेव्हा कळते की हे लेखक ' Second rate writers ' पैकी आहेत.

कीर्ती ही पुष्कळ वेळा कारागिरांच्या कृतीच्या गळयात माळ घालताना दिसली तरी पण हा फुगा केव्हा ना केव्हा तरी फुटतो. पण कीर्तीने एकदा का अक्षर कलाकृतीच्या गळयात हार घातला की मग मात्र ही जोडी अखंड व अक्षय टिकते. त्यांचा परस्परात छेद बसत नाही : तर बेरीज होत जाते

पण आजही आवर्जून मधून मधून कारागिरांच्या कलाकृतीला गौरविण्यात येते. पण खेद मानण्याचे कारण नसते. हे कालचक्र चालूच असते. काल हा जादूगार आहे. यातूनच कलाकृतीला बाहेर पडावयाचे असते. नव्हे, तिचा जिवंतपणा तेव्हाच सिद्ध होतो.

(पान १९१ वरून)

इथल्या कामगारासारखा, आणि तोही कामगार म्हणजे औद्योगिक कामगार न समजता आपल्या घरी भांडी घासणाऱ्या कामगारासारखा समजतो. अशी वस्तुस्थिती असताना आपण जेव्हा वर्तमानपत्रे आणि मासिके यांची पानेच्या पाने रोजच्या रोज लिहितो व वाचतो ती चुकांनी बुजबुजली असणेच जास्त साहजिक नाही काय ? आमचे कादंबरीकार पुस्तकेच्या पुस्तके जेव्हा अमेरिकन तरुणी, कँटनमधील कत्तल, सप्तमीच्या संध्याकाळी क्षितिजावरील चंद्र, ऑक्सिजनचे इंजेक्शन वगैरे वगैरेनी भरून लिहितात तेव्हा ते इतके बेजबाबदारपणे लिहीत असतात की ते राजकारणाबद्दल, आणि तेही रशियातील, साऱ्या जगाला जो अजून खरोखरच परिचित व्हावयाचा आहे, ज्याचा इतिहास अवघा २०–२५ वर्षाचा आहे. त्याच्याबद्दल बेधडकपणे वाटेल ते लिहावयास लागले म्हणजे काय लिहिणार नाहीत याचीच कल्पना करता येत नाही. ज्या वर्गासंबंधी आपल्याला लिहावयाचे आहे त्याची जास्तीत जास्त ओळख होणे अतिशय आवश्यक आहे हे कितीजरी सांगितले तरी पुरेसे होणार नाही.

कविता समजणे, न समजणे–एक टिपण

—वामन इंगळे

नवकाव्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कवितेपैकी बरीचशी कविता दुर्बोध आहे आणि ती समजत नाही असा एक आक्षेप नेहमीच घेतला जातो. (आरोप उद्घृत करणाऱ्या या वाक्यांतील बरीचशी हा शब्द माझा आहे. एक तर या संबंधाने अजून निश्चित संख्यावारी झाली नाही आणि आक्षेपकांतही संख्येच्या मुद्यावर मतभेद संभवणे शक्य आहे.) या आरोपाच्या मुळाशी कविता समजणे म्हणजे कवितेचा सरल अर्थ समजणे असेही एक गृहितकृत्य असते. हे गृहितकृत्य– कवितेचा अर्थ तिच्या बंदीशीवाहेरही निघू शकतो आणि तेवढा समजला म्हणजे कविता समजली आणि तेवढा समजला नाही म्हणजे कविता समजली नाही या दुसऱ्या गृहितावर आधारलेले असते.

कवितेचा अर्थ जेव्हा तिच्या बंदीशीबाहेर निघू शकतो तेव्हा त्याला तिच्या विषयाची एक खूण अथवा तिचे तात्पर्य–सार एवढेच महत्त्व असू शकते. अशा तात्पर्य–सारामुळे कवितेवरील बौद्धिक भाष्ये सुलभ होऊ शकत असली तरी त्यांचा कविता समजण्याच्या क्रियेशी अंगांगी संबंध असतो काय, हा खरा प्रश्न आहे. कविता समजणे ही क्रिया तिच्या निर्मितीप्रमाणेच संपूर्ण मानसिक आहे. कवितेची निर्मिती होणे म्हणजे जे शब्दाविण संवादिजे– त्याला शब्दरूप देणे. श्रेष्ठ कवितेत हे शब्दरूप सुस्वरूप असूनही स्वस्वरूप असते. त्या स्वस्वरूपाला Unique पुन्हा सरलार्थात मांडून दाखविणे ही क्रिया एक तर संपूर्ण अशक्य आहे. जे आपण सरलार्थात मांडून दाखवू शकतो त्याचा कवितेच्या स्वस्वरुपाशी नक्की कोणता संबंध असतो ? आणि कवितेत द्राव्य होण्यापूर्वीची विषयाची स्थूल कल्पना आणि कवितेचा सरल अर्थ यांच्यात एखादा मूलभूत प्रकाराचा भेद शोधता येऊ शकेल काय ?—असे प्रश्न निर्माण होतात. या ठिकाणी एक गोष्ट ध्यानात घेणे आवश्यक आहे. कवितेचा अर्थ सांगणे हे लौकिकदृष्टचा शक्य झालेले आपल्याला दिसत असले तरी त्याच वेळी कवितेतील अनुभवाची अर्थपूर्णता अर्थ सांगण्याच्या क्रियेत गैरहजर असू शकते. (असतेच)

गद्य आणि काव्य यात मूलभूत भेद असतात. (वस्तुतः काव्य आणि अकाव्य यांच्यातच असे मूलभूत भेद संभवू शकतात.) रामा गावाला गेला—या वाक्यात तो गावाला गेला असल्याची माहिती Information–Assertion आपणास मिळते त्या पलीकडे अधिक काही कळविण्याचे (Communicate, Convey, Express या अर्थी) सामर्थ्य या वाक्यात नाही. या वाक्यामुळे आपल्याला जे समजते (आणि व्याकरणातील सर्वच वाक्यांच्या प्रकारामुळे जे कळते) त्यांनाही आपण समजण्याच्याच क्रियेत अंतर्भूत करतो. हे सर्व समजणे आणि एखादी कविता समजणे यात नक्की भेद कोणते असतात हा महत्त्वाचा प्रश्न असतो.

या संदर्भात मर्ढेकरांच्या बऱ्यावाईट दोन्ही अर्थांनी गाजलेल्या एका कवितेचा विचार करता येण्यासारखा आहे.

पिपात मेले ओल्या उंदिर
माना पडल्या, मुरगळल्याविण
ओठावरती ओठ मिळाले
माना पडल्या आसक्तीविण

आता प्रश्न असा आहे की वरील ओळीद्वारे आपल्याला काय समजते ? ओल्या पिपात माना मुरगळल्याशिवाय

उंदीर मेले आहेत. त्यांचे ओठ परस्परांशी जुळले आहेत. परंतु तरी त्यांच्यात उत्तेजना वगैरे दिसत नाही, असा सरल अर्थ आपल्या पदरात पडू शकतो. या कवितेमुळे एवढाच साधा सरल अर्थ प्राप्त होत असेल तर रामा गावाला गेला या वाक्यापेक्षा वरील ओळींनी काय अधिक दिले अशी शंका येईल आणि ती तशी येण्यात काही चूक होईल असे नाही. परंतु या ओळी वाचताना भिंती पारदर्शक व्हाव्या तसे पलीकडचे काहीतरी साक्षात दिसू लागते. उंदिरांच्या जागी माणसे दिसू लागतात. त्यांतही सरधोपट चेतनीकरणाची क्रिया होत नाही असे आपल्याला प्रत्यक्ष जाणवू लागते. या ओळींच्या निमित्ताने आपल्याला जे अनुभवावे लागते त्याचे वर्णन एकतर नक्की शब्दात करता येणे कठीण असते. ती केवळ एक Information अथवा Assertion नसते हेही आपणास जाणवू लागते. Information पेक्षा अधिक बिनचूक, प्रतिमा, प्रतीती, भावस्थिती Mood असे शब्द वापरून आपण त्या परिणामाला सोयीच्या दृष्टीने निर्देशित करू शकतो.

उंदिरांच्या ठिकाणी माणसे का दिसावी असा प्रश्नही या ठिकाणी अप्रस्तुत असतो. 'जाळीमंधी पिकली करवंदे' मधील करवंदांच्या ठिकाणी आपल्याला दुसरेच काही अगदी सहज दिसू लागते तेव्हाही असाच प्रश्न विचारला जाऊ शकतो. हा प्रश्न जुन्या नव्या दोन्ही कविता प्रकृतीच्या संदर्भात विचारला गेला तरी दोन्ही वेळी तो सारखाच अप्रस्तुत असतो.

रामा गावला गेला या वाक्यातून असा कोणताच परिणाम साकार होत नाही हे स्पष्ट आहे. या विवेचनावरून आपण दुसऱ्याच एका प्रश्नाजवळ येतो. ज्या कवितेचा सरल अर्थ सहजासहजी कळला तीच केवळ अशी भावस्थिती संक्रमित करू शकते काय? निदान, भावस्थिती निर्माण करण्यास काही मर्यादेपर्यंत सहाय्य करू शकते काय, आणि भावस्थिती संक्रमित झाली असली, तरी त्या कवितेचा सरलार्थ मात्र समजलेला, कळलेला नाही अशी काही अवस्था असू शकते काय? या प्रश्नाची वस्तुनिष्ठ उत्तरे खरे म्हणजे प्रयोगांतीच देणे शक्य आहे. असा एक प्रयोग मी माझ्यापुरता करून पाहिला आहे. दहावीच्या विद्यार्थ्यांपुढे करंदीकर, चित्रे, मर्ढेकर, मुक्तिबोध, वामनपंडित, ज्ञानेश्वर आदि कवींच्या कविता योग्य उच्चारण आणि वजनासह म्हणून दाखविल्या. विद्यार्थ्यांना एकीचाही सरलार्थ सांगता आला नाही. तरीपण प्रत्येकजण काहीतरी भव्य-विराट ऐकल्यासारखा भाराऊन गेल्याचे माझ्या लक्षात आले.

याच संदर्भात अर्थशून्य वक्तृत्व असलेल्या आणि आपाततः एकत्र आलेले शब्द– सांघात आणि मुद्दामच प्रयोग म्हणून केलेले कवितेसारखे कृतक आकृतींबंधही काही विशिष्ट मर्यादेपर्यंत एक Rhandom Mood कायम करू शकतात असेही आढळून आले आहे.

केवळ नव्या कवितेतील दुर्बोधतेसंबंधी विचार करण्याऐवजी जुन्या कवितेतील दुर्बोधतेसंबंधीही तुलनात्मक विचार झाला तर दोन्ही दुर्बोधतांमध्ये काही महत्त्वाची साम्यस्थळे सांपडण्याची शक्यता आहे. मर्ढेकर–चित्र्यांची बरीचशी कविता समजत नाही हे म्हणणे ठीकच. परंतु 'लाली मेरे लालकी' सरलतेसाठी प्रसिद्ध म्हणून सांगण्यात आलेल्या मीरेच्याही ओळींचा सरलार्थ कळत नाही अशी तक्रार करणारे रसिक जेव्हा भेटतात, तेव्हा दुर्बोधता–नवकाव्य अशी जोडी सांधण्याऐवजी कविता न समजणे हा पूर्ण काव्याविरुद्धचाच आक्षेप होऊ शकेल.

वर उदाहरणादाखल घेतलेली मर्ढेकरांची कविता ही सरलार्थ समजण्याच्या दृष्टीने फारशी कठीण नसावी असा माझा समज आहे. परंतु तीही एकच एक भावस्थिती प्रत्येकात संक्रमित करू शकेल असे नियम म्हणून सांगता येणार नाही. एखाद्या कवितेतील समाजसंदर्भाच्या दृष्टीने नवीन असलेली प्रतिमा– त्यांचा परस्पर संकर, अनुभवरूपातील एकांतिक अपरिचितपणा यामुळे न समजणारी कविता सरलार्थाशिवायही धूसर भावस्थिती देत असेल, तर सरलार्थाचे आयुष्य वांडगुळी असते की काय याचाही विचार होणे आवश्यक आहे.

वस्तुतः दुर्बोध कविता आणि मुळीच न समजणाऱ्या कविता असाही भेद करावयास पाहिजे. सर्वच दुर्बोध कविता मुळीच समजत नाही असेही नसते. एखादी कविता अर्धी कळली, बाकीची कळली नाही असेही होऊ शकते. परंतु मुळीच समजत नाही अशी कविता म्हणजे पृथ्वीच्या पाठीवरील कुणालाच न समजलेली कविता म्हणून समजावी लागेल. तत्वशः

अंशी कवितेचे अस्तित्व सशाच्या शिंगाप्रमाणे आहे. परंतु कलावंताच्या इमानात खोटेपणा शोधण्याचे ठरविल्यावर मात्र अशाही कवितेचे अस्तित्व सहज शक्य होऊ शकेल.

सर्वसामान्य परिस्थितीत जेव्हा एखादी कविता समजत नाही असे विधान करण्यात येते तेव्हा ते कोणत्याच अर्थाने भयंकर असे विधान नसते. परंतु तेवढ्यामुळे जेव्हा पूर्ण काव्यप्रकृतीच्या अर्थपूर्णतेविषयी शंका उत्पन्न करण्यात येतात, तेव्हा त्यांच्या पाठीशी आपल्याला सर्वच गोष्टी समजल्या पाहिजेत हा आग्रह असतो. सरलार्थ आणि भावस्थिती या दोन्ही दृष्टींनी न आकळलेली कविता संपूर्ण विश्व-ब्रह्मांडामधील एखाद्या अज्ञात प्रदेशासारखी वा ग्रहासारखी आहे असे मानले म्हणजे हा प्रश्न मिटतो. त्यावर हेतू वगैरे चिकटवून भाष्य करणे म्हणजे अंधारात गोटे मारण्यासारखे असते. माझ्या मित्राला समजलेली कविता मला समजत नाही आणि (हा लेख लिहूनही) बक्षिसासाठी ठेवलेल्या कवितेचा अर्थ लावून दाखविता येईल किंवा नाही याची शंका आहे.

एखाद्याला एखादी कविता समजत नाही त्याप्रमाणेच एखाद्याला एखादे गाणेही समजत नाही. तेवढ्यावरून गाणे दुर्बोध, क्लिष्ट आहे असे म्हणता येऊ शकेल आणि तेवढ्याचसाठी त्याची टिंगल टवाळी सह्य असली तरी पण, दुर्बोधता वा सरलता त्याच्या श्रेष्ठ कनिष्ठत्वाचा मूल्यनिर्णय मात्र करू शकत नाही. आणि कलावंताच्या इमानाला आव्हान करण्याचेही कारण होऊ शकत नाही.

गाण्याचे माध्यम सूर आणि कवितेचे शब्द हा फरक ध्यानात घेऊनही हे साम्य केवळ पृष्ठभागावरचे ठरत नाही. एखाद्या कवितेत शब्दच साध्य म्हणून वापरले असतील तर त्यांच्यामुळे शब्दापलीकडील आशय व्यक्त करण्याचे कार्य न होता, ते भाषेतील संदर्भ तुटलेल्या कोणत्याही एका शब्दाइतकेच जडशीळ असतात. (शब्दांचे कार्य काही सांगणे बोलणे असे मानले तर ते अशा कवितेत काहीच बोलू सांगू शकत नाही.) या उलट खांसाहेब विलायत हुसेनांच्या सतारीवर दिले गेलेले परिणाम हे रसिकांच्या मनात एका अचूक भावस्थितीला बोलकी करतात. एका विशिष्ट पातळीवर शब्द आणि सूर यांचे कार्य एकच असते.

आधुनिक कवितेप्रमाणे ललित गद्यही शिक-विण्याचे काही वैशिष्ट्यपूर्ण अनुभव शिक्षकांना येत असतात. एका शिक्षकापुढे 'श्रावण साखळी' विद्या-र्थ्यांना कशी शिकवावी असा प्रश्न पडला. स्वतः शिक्षकाच्या डोक्यात सरलार्थ समजून शिजून तयार. पण त्याचे स्पष्टीकरण विद्यार्थ्यांपुढे कसे करायचे हा प्रश्न. या अडचणीचा अर्थ 'श्रावण साखळी' दुर्बोध आहे असा नसला तरी शब्दांचे अर्थाशी सूक्ष्म साहचर्य सुचविणारा आहे. त्यातून अर्थ बाहेर काढणे कठीण कर्म बनते. शिवाय स्वतः शिक्षकाने बाहेर काढलेल्या अर्थाचे पोत अगदी बटबटीत असते. प्रस्तुत अडचण प्रत्यक्ष दुर्बोधता नसली तरी शून्यता आणि दुर्बोधता यातील एक दुवा आहे हे नाकारता येत नाही.

या अडचणी वेगवेगळ्या प्रकारात मोडण्या-सारख्या असल्या तरी त्यांचे मूळ मात्र श्रेष्ठ कलाकृती हेच आहे. श्रेष्ठ कलाकृतीच फक्त दुर्बोध संभवू शकतात. तेव्हा त्यांच्या संदर्भात निर्माण झालेल्या विविध अडचणी ही आव्हाने आहेत. कलाकृतींनी एकसंध होताना दुर्बोध व्हावे, शून्यतेकडे आणि अर्थघनतेकडे जावे, पण त्या समजून घेताना अडचणी निर्माण व्हाव्यात, असे विरोध जेव्हा निर्माण होऊ लागतात, तेव्हा ते विरोध मोडून काढण्याचे नसतात. पण जेव्हा कविता सुखासुखी समजत नाही तेव्हा अधिक सोपे लिहावे— कलावंताने खाली जावे—रसिकाने वर यावे, अशा भयावह प्रतिक्रिया निर्माण होताना दिसतात. एक वेळ दुर्बोध नं. एक कविता सह्य होईल. कारण ती एखाद्याला जरी समजली, तरी ती समजत नाही या आक्षेपाची सार्व-त्रिकता भंगून जाईल. पण सृजनाला एखादी गोळाबेरीज समजणाऱ्या या प्रतिक्रिया मात्र दुर्बोध का होईना— पण निर्मितीच्या स्रोताचे महाद्वारच बंद करून टाकतील.

मराठीचे अध्यापन...८

मूल्यमापन—

—प्रा. म. बा. कुंडले

आतापर्यंत विविध पातळीवरील मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे कोणती असावीत, ती कशी साध्य करावी, त्यासाठी अभ्यासक्रम कसा असावा व पाठ्यपुस्तके कशी असावीत याचे विवेचन केले. तेव्हा या पुढील प्रश्न म्हणजे उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली, विद्यार्थ्यांची किती प्रगती झाली, याचे मोजमाप करणे ! हे मोजमाप कसे करावे याची चर्चा आपण या प्रकरणात करू या.

मूल्यमापन म्हणजे काय ?

प्रगतीचे मापन करणाऱ्या या प्रक्रियेला आपण नेहमीच्या भाषेत परीक्षा असे म्हणतो. परंतु येथे परीक्षेऐवजी मूल्यमापन या संज्ञेचा वापर केला आहे. वस्तुतः मूल्यमापन म्हणजे परीक्षाच. तरी देखील परीक्षेऐवजी मूल्यमापन या शब्दाचा वापर करण्याचे प्रयोजन काय हे थोडक्यात स्पष्ट करणे आवश्यक आहे. काळाच्या ओघात प्रत्येक शब्दाला एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो, विशिष्ट कल्पना त्याच्या भोवती निगडित होतात व जेव्हा आपण तो शब्द उच्चारतो तेव्हा तोच अर्थ व त्याच कल्पना आपल्या मनात निर्माण होतात. परीक्षा म्हटले की लेखी परीक्षा, त्यात ८–१० प्रश्न विचारणे, त्यांपैकी कोणतेही पाच किंवा सहा सोडविणे, ते निबंधवजा स्वरूपात लिहिणे, महत्त्वाच्या किंवा मागील एक दोन वर्षात न विचारलेल्या भागांवरच अभ्यास केंद्रित करणे, इतर भाग सोडून देणे अशा प्रकारचे चित्र आपल्या मन:चक्षूपुढे उभे राहते. त्याच वेळी शैक्षणिक दृष्टीने विचार करणाऱ्या व्यक्तीला या परीक्षापद्धतीचे दोष किंवा तिच्या मर्यादांचीही स्वाभाविकपणेच आठवण होते. हे दोष म्हणजे, काही ठराविक व थोड्या अभ्यासक्रमाचाच परीक्षेत अंतर्भाव, परीक्षेत यश मिळविण्याच्या दृष्टीने स्मरणशक्तीवरच देण्यात येणारा अतिरिक्त भर, केवळ ज्ञानात्मक बाजूंची चांचणी व इतर अंगांकडे होणारे दुर्लक्ष, लेखी बाजूवरच सर्वस्वी भर दिल्यामुळे मौखिक वा इतर प्रात्यक्षिक बाजूंची होणारी उपेक्षा, उत्तरपत्रिकांच्या तपासणीला व मूल्यांकनाला अपरिहार्यपणे येणारे व्यक्तिनिष्ठ व अनिश्चित स्वरूप, अशा प्रकारचे होत. या उणीवा लक्षात घेऊनच आधुनिक शिक्षणशास्त्रज्ञांनी नव्या व व्यापक भूमिकेचा अंगिकार करून या परीक्षा-प्रक्रियेचा विचार केला आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचे, किंवा व्यक्तित्वाच्या सर्व घटकांचे परीक्षण करणे, अध्यापन करते समयी जी उद्दिष्टे आपण समोर ठेवली होती, ती किती प्रमाणात साध्य झाली— त्यानुसार विद्यार्थ्यांमध्ये कितपत परिवर्तन झाले वा सुधारणा झाली हे पाहणे हा परीक्षेचा उद्देश असला पाहिजे. तसेच उद्दिष्टानुरूप योग्य अशा निरनिराळ्या परीक्षणसाधनांचा अवलंब करूनच विद्यार्थ्यांच्या भाषिक व वाङ्मयीन प्रगतीचे मापन केले पाहिजे. हे सर्व आजच्या परीक्षेमध्ये होत नाही. एवढेच नव्हे तर ‘परीक्षा’ या संज्ञेतूनही या सर्व प्रक्रियांचा बोधही होत नाही. म्हणून ‘परीक्षा’ या रूढ व संकुचित प्रक्रियानिदर्शक शब्दाऐवजी प्रगतीमापनाच्या उपरिनिर्दिष्ट व्यापक दृष्टिकोनाला अनुरूप अशा ‘मूल्यमापन’ या संज्ञेचा हल्ली शिक्षणक्षेत्रात वापर केला जातो व तो इष्टच आहे.

मूल्यमापन ही प्रक्रिया उद्दिष्टांवर आधारित असते. उद्दिष्टे—त्यांच्या साध्यतेसाठी अनुरूप असे शैक्षणिक अनुभव—त्या अनुभवांमधून उद्दिष्टे किती प्रमाणात साध्य झाली हे पाहण्यासाठी शेवटी मूल्यमापन, असे आधुनिक शिक्षणप्रक्रियेचे स्वरूप आहे. हे मूल्यमापन उद्दिष्टानुरूप व्हावे या दृष्टीने उद्दिष्टांचे (१) ज्ञान (Knowledge), (२) उपयोजन (Application), (३) कौशल्य (Skill), (४) अभिवृत्ती–अभिरुची (Attitudes and Interests आणि (५) इतर व्यक्तित्व–विशेष अशा पाच प्रकारांमध्ये विभाजन केले जाते. या वर्गीकरणाचा उपयोग प्रश्नांची योजना करण्याच्या बाबतीत विशेष होतो. प्रश्नांमधून त्या विशिष्ट उद्दिष्टांची चाचणी होऊ शकते की नाही, त्या दृष्टीने प्रश्न योग्य आहे की नाही हे पाहता येते व उद्दिष्टानुरूप योग्य अशा प्रश्नांची योजनाही करणे सुलभ जाते.

मराठी विषयातील मूल्यमापनाची दिशा

परंतु प्रत्येक विषयातील प्रगतीचे मापन करण्यासाठी या पाच प्रकारच्याच उद्दिष्टांचा काटेकोरपणे अवलंब केला पाहिजे असे नाही. मूल्यमापन सर्व दिशेने व्हावे, सर्व पातळींवर व्हावे हाच त्या मागचा प्रमुख उद्देश ! प्रत्येक विषयामध्ये अध्यापन करताना जी जी उद्दिष्टे आपण समोर ठेविली असतील, त्या त्या उद्दिष्टांना अनुसरून आपण विद्यार्थ्यांचे मूल्यमापन करू शकतो. मराठीच्या अध्यापनाचा विचार आपण (१) ग्रहण, (२) प्रगटीकरण, (३) रसास्वाद व (४) सृजन या उद्दिष्टानुरूप केला. तेव्हा त्याच पद्धतीने आपल्याला विद्यार्थ्यांच्या प्रगतीचे मूल्यमापन करता येईल. बरे, ही उद्दिष्टे वर निर्देशिलेल्या मूल्यमापनांतर्गत उद्दिष्टांना विरोधी वा बाधक नाहीत, उलट पूरकच आहेत. ग्रहणात्मक व काही रसास्वादात्मक उद्दिष्टांचा ज्ञानात्मक उद्दिष्टांमध्ये, प्रगटीकरणात्मक व सृजनात्मक उद्दिष्टांचा उपयोजनात्मक व कौशल्यात्मक उद्दिष्टांमध्ये, तर काही रसास्वादात्मक उद्दिष्टांचा अभिरुची–अभिवृत्यात्मक उद्दिष्टांमध्ये आपल्याला अंतर्भाव करता येईल. तसेच प्रत्येक विषयाच्या अध्यापनात काही विशिष्ट उद्दिष्टांना अधिक प्राधान्य राहील, तर काहींचे स्थान गौण राहील. प्रत्येक विषयाच्या स्वरूपावर ते अवलंबून राहील.

असो. आपल्याला विचार करावयाचा आहे तो मराठी विषयाचा ! तेव्हा मराठीच्या अध्यापनात ज्या उद्दिष्टांना प्राधान्य आहे व त्या उद्दिष्टांचे आपण ज्या पद्धतीने वर्गीकरण केले त्याला अनुसरूनच मूल्यमापनाचा विचार करणे इष्ट होईल.

मराठीच्या मूल्यमापनाचा विचार करताना सर्वप्रथम आपल्याला आणखी एक मुद्दा ध्यानात घ्यावा लागेल. तो म्हणजे भाषेचे मूल्यमापन व इतर विषयांचे मूल्यमापन यातील मूलभूत फरक ! इतर विषयांमध्ये विद्यार्थ्यांची परीक्षा घेताना त्या विषयातील ज्ञान अगर माहिती त्यांना किती प्रमाणात आहे याची आपण चाचणी घेतो. म्हणजे आपला भर आशयावर (content matter) अधिक असतो. परंतु भाषेच्या मूल्यमापनामध्ये आपण विद्यार्थ्यांच्या भाषेवर अधिक भर दिला पाहिजे. सामान्यत: परीक्षेमध्ये माहितीवजा प्रश्न अधिक विचारले जातात व जर विद्यार्थ्यांच्या उत्तरांमधील माहिती अगर मुद्दे सर्वसाधारण बरोबर असतील तर त्यावरच परीक्षक गुण देतात. परंतु ती माहिती विद्यार्थी कशा भाषेत लिहितात त्यांच्या उत्तरातून व्यक्त होणारे त्यांचे भाषाप्रभुत्व व त्यांचे भाषिक सामर्थ्य मूल्यमापनाच्या वेळी क्वचितच, निदान माहितीपेक्षा कमी प्रमाणात विचारात घेतले जाते. त्यामुळे पुष्कळदा मराठीची परीक्षा म्हणजे नेमलेल्या पाठ्यपुस्तकातील ज्ञानाचीच परीक्षा होते ती खऱ्या अर्थाने भाषेची परीक्षा होत नाही. हे योग्य नव्हे. एखाद्या विद्यार्थ्याने लिहिलेल्या उत्तरातील माहितीवजा तपशीलात जरी थोडीफार उणीव असेल, परंतु ते उत्तर जर त्या विद्यार्थ्याने उत्कृष्ट भाषेत लिहिले असेल, तर त्याला अवश्य अधिक गुण द्यायला हवे. तात्पर्य, विद्यार्थ्यांच्या मराठी विषयातील प्रगतीचे मूल्यमापन करताना भाषांतर्गत घटकांनाच अधिक प्राधान्य देण्यात यावे.

ग्रहणात्मक उद्दिष्टांचे मूल्यमापन

ग्रहणात्मक उद्दिष्टांच्या मूल्यमापनात आपल्याला दोन घटकांचा अंतर्भाव करावा लागेल. (१) नेमलेल्या पाठ्यपुस्तकातील वा अभ्यासक्रमातील ज्ञान वा आशय

विद्यार्थ्यांनी किती प्रमाणात ग्रहण केला हे पाहणे. यालाच आपण ज्ञानप्राप्ती असे म्हणू या. (२) दुसरा घटक म्हणजे नेमलेल्या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांच्या आकलनशक्तीचा व विचारशक्तीचा किती प्रमाणात विकास झाला आहे हे पाहणे. यालाच भाषाग्रहण-शक्तीचा विकास असे म्हणता येईल. या दोन्ही प्रकारच्या घटकांचा आपण स्वतंत्रपणे विचार करू.

ज्ञानप्राप्ती

मराठी विषयाच्या परीक्षेत केवळ विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला अगर माहितीला महत्त्व देऊ नये असे या पूर्वी म्हटले. परंतु याचा अर्थ असा नव्हे, की ज्ञानप्राप्ती ही पूर्णपणे उपेक्षणीय आहे. अभ्यासक्रमात क्रमिक पुस्तके नेमलेली असतात. तेव्हा त्यांचा अभ्यास विद्यार्थ्यांनी केलाच पाहिजे व तो अभ्यास म्हणजेच त्यांची ज्ञानप्राप्ती. म्हणून पुस्तकातील वेचे व काव्य यांतील आशय–विचार व कल्पना कितपत ग्रहण केल्या हे पाहण्यासाठी विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची चांचणी घेणे आवश्यक असते. म्हणून ज्ञानप्राप्तीवर प्रश्न हे विविध पाठांमधील मुद्यावर आधारित असतात.

नेहमीच्या परीक्षेत देखील असे ज्ञानप्राप्तीवर प्रश्न विचारले जातात. परंतु ते सर्व निबंधवजा स्वरूपाचे प्रश्न असतात. परीक्षा तीन तासांची. त्यात जास्तीत जास्त सहा प्रश्न विद्यार्थी लिहू शकणार. प्रत्येक पाठावर एक, याप्रमाणे जास्तीत जास्त सहा पाठांवरील प्रश्न तो सोडवू शकेल. आठपैकी सहा किंवा जास्तीत जास्त दहापैकी सहा प्रश्न सोडवा असा पर्याय दिला, तरी परीक्षेत दहाच पाठावर प्रश्न विचारले जाणार. म्हणजे जवळ जवळ तीनचतुर्थांश भागावर प्रश्न न विचारता आल्यामुळे त्यातील विद्यार्थ्यांच्या ज्ञानप्राप्तीची चाचणी होऊच शकत नाही. हा दोष निबंधवजा प्रश्नांच्या योजनेमुळे निर्माण होतो. म्हणून ज्ञानप्राप्तीच्या चाचणीसाठी वस्तुनिष्ठ (objective type) प्रश्नांचा उपयोग करण्यावर हल्ली बराच भर दिला जात आहे. वस्तुनिष्ठ प्रश्नां-मध्ये विद्यार्थ्यांना उत्तरे लिहावी लागत नाहीत. काही संभाव्य उत्तरे दिली असतात व त्यांपैकी योग्य उत्तराची विद्यार्थ्याला निवड करावी लागते. काही प्रश्नांमध्ये उत्तरादाखल फक्त एक दोन शब्दच लिहावे लागतात. त्यामुळे प्रश्नांची संख्या पुष्कळच वाढविता येते व जवळजवळ सर्व पाठांचा व त्यातील जास्तीत जास्त आशयाचा अंतर्भाव प्रश्नांमध्ये करून घेता येतो. शिवाय या प्रश्नांची उत्तरे अगदी निश्चित व असंदिग्ध असल्यामुळे मूल्यांकनही अचूक, निश्चितपणे व वस्तु-निष्ठ स्वरूपात करता येते. म्हणून ज्ञानप्राप्तीच्या मूल्यमापनासाठी वस्तुनिष्ठ प्रश्नांची योजना उपयुक्त ठरते. अशा प्रकारच्या प्रश्नांचे काही नमुने पुढे देत आहे:—

वस्तुतः येथे एखादा पाठ्यांश–म्हणजे उतारा अगर कविता देऊन त्यावर प्रश्न काढून दाखविणे योग्य ठरले असते. परंतु स्थलमर्यादेस्तव ते शक्य नाही. म्हणून आवश्यक तेथे पाठ्यांशाचा फक्त उल्लेख करून काही वेचकच उदाहरणे देत आहे. तेवढ्यावरून वाचकांना प्रश्नपद्धतीची कल्पना येऊ शकेल असे वाटते.

साधे स्मरणात्मक प्रश्न—(Simple Recall)

(१) 'शारदा' या नाटकाचे लेखक कोण ?

(२) 'फुलामुलांचे कवी' कोणाला म्हणतात ?

(३) अर्वाचीन काव्याचे जनक कोण मानले जातात ?

(४) ज्ञानेश्वरीचे दुसरे नाव कोणते ?

(५) इंग्रजी भाषेला 'वाघणीचे दूध' कोणी म्हटले आहे ?

सूचना—जेथे प्रश्नाचे उत्तर निश्चित आहे, विचार करण्याची आवश्यकता नाही व पूर्वज्ञानाचे स्मरण करून उत्तर देता येते, तेथे या प्रकाराचा अवलंब करावा.

खरे–खोटे लिहा—(True-false)

(१) ज्ञानेश्वरांची समाधी आळंदीला आहे.
ज्ञानेश्वरांची समाधी देहू येथे आहे.

(२) आचार्य विनोबांनी गीतारहस्य हा ग्रंथ लिहिला आहे.
आचार्य विनोबांनी गीता प्रवचने हा ग्रंथ लिहिला आहे.

सूचना—जेथे सारखेपणामुळे विद्यार्थ्यांचा घोटाळा होण्याची शक्यता असते व निश्चित ज्ञान असले तरच खरे किंवा खोटे कोणते हे ओळखता येते तेथेच असे प्रश्न विचारावे.

अनेक पर्यायी प्रश्न (Mutiple choice)

पाठ्यांश—' सारेच देवाला अर्पण ' लेखक विनोबा
योग्य उत्तरापुढे √ खूण करा.

(१) कृष्णाबद्दल विनोबांना आदर वाटतो, कारण—
- अ) तो विष्णूचा अवतार होता.
- ब) त्याने कंसासारख्या अनेक दुष्टांचा संहार केला.
- क) त्याने बालपणीच अनेक चमत्कार करून दाखविले.
- ड) त्याने स्त्रीशूद्रादिकांना देखील मोक्षाचा अधिकार प्राप्त करून दिला.

(२) विनोबांच्या मते देव हा
- अ) तमाम लोकांच्या स्वरूपात आपल्यापुढे उभा आहे.
- ब) प्रत्येक देवळात आहे.
- क) स्वर्गात बसला आहे.
- ड) भूदानकार्यात समावलेला आहे.

सूचना—जेथे विद्यार्थ्यांना नीट विचार करून उत्तराची निवड करावी लागते तेथेच अशा प्रकारची योजना करावी.

रिकाम्या जागा भरा

' ······रचिला पाया, बांधियले देवालया,
······तयाचा किंकर, तेणे केला हा विस्तार,
······ध्वज उभारिला भागवत
······झालासे कळस, भजन करा सावकाश.'

जोड्या जमविणे (Matching)—

खाली काही वचने दिली आहेत. तसेच त्या खाली कंसात काही लेखकांची नावे दिली आहेत. त्या त्या विधानासमोर त्याच्या कर्त्याचे नाव निवडून लिहा.

अ) ' माझा मराठाची बोलु कौतुके । परि अमृतातेही पैजा जिंके
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ॥ '———

ब) ' जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधू ओळखावा । देव तेथेचि जाणावा ॥'

क) ' प्राप्तकाल हा विशाल भूधर
सुंदर लेणी तयात खोदा
निजनामे त्यावरती नोंदा———
सत्वर काही चला करा तर '

ड) ' मानवी अंतःकरण हे स्त्रीसारखं आहे. व्याकरणात ते नपुसकलिंगी खरं, परंतु व्यवहारात ते स्त्रीलिंगी ठरेल.'—

ई) ' व्यक्तीचा व विश्वाचा जे समन्वय घडविते ते वाङ्मय.'—

फ) ' वृद्ध पूजा म्हणजे ज्ञान पूजा. '———

(ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, तुकाराम, केशवसुत, टिळक, बी, आगरकर, परांजपे, फडके, खांडेकर, केळकर, विनोबा, सानेगुरुजी.)

सूचना—ही अवतरणे पुस्तकातीलच असावीत. त्यांची संख्या आणखीही वाढविता येईल. जितकी अवतरणे असतील, त्यापेक्षा लेखकांची नावे अधिक असावीत.

शब्दसंपदा—नवनवीन शब्दांचा परिचय होऊन त्यांची शब्दसंपदेमध्ये भर पडणे हा ज्ञानप्राप्तीचाच एक भाग होय. पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करताना अनेक नवीन शब्द, वाक्प्रचार, म्हणी विद्यार्थी शिकतात. त्या त्यांनी किती प्रमाणात ग्रहण केल्या, हे पाहण्यासाठीही काही प्रश्नांची योजना करणे आवश्यक असते. शब्दांचे अर्थ विचारणे, शब्दांचे विरुद्धार्थ विचारणे, विशिष्ट संदर्भात योग्य शब्दांची निवड करायला लावणे, वरवर सारख्या दिसणाऱ्या शब्दांमधील फरक दर्शविण्यास सांगणे, एकाच शब्दापासून बनणारी विविध रूपे करावयास सांगणे, इत्यादी अनेक प्रकारांनी ही शब्दज्ञानाची चाचणी घेता येते. या चाचणीसाठीही आपल्याला वस्तुनिष्ठ पद्धतीच्या प्रश्नांचा अवलंब करता येईल. तो असा—

१) योग्य अर्थाच्या शब्दावर √ खूण करा.

वितंडवाद—फार मोठा वाद, वादविवाद, परिसंवाद, विनाकारण निर्माण झालेला वाद.

कर्मठ—खूप काम करणारा, कर्तव्यनिष्ठ, धार्मिक कर्म आचरणारा, काम टाळणारा.

२) विरुद्धार्थी शब्द द्या—

अनुकूल —

सज्जन —

३) शब्दसमूहासाठी एक शब्द द्या—

उपकारांची जाणीव ठेवणारा———

ईश्वराचे अस्तित्व मानणारा———

४) पुढील शब्दांचे समानार्थ असे तीन शब्द द्या—

फूल—— १——, २——, ३——.

सूर्य—— १—— २——, ३——.

५) व्युत्पत्ती सांगा—

घर——, गाढव——,

६) प्रसाद ' व ' प्रासाद ' या शब्दांचा पुढील वाक्यात योग्य त्या ठिकाणी वापर करा—

——त राहण्याचे भाग्य त्याला प्राप्त झाले हा त्याच्यावर झालेला परमेश्वर कृपेचाच —— होय.

व्याकरण—व्याकरणाचा अभ्यास हाही ज्ञान-प्राप्तीतच जमा होतो. म्हणून व्याकरणज्ञानाचीही परीक्षा या ज्ञानग्रहणात्मक मूल्यमापनात वस्तुनिष्ठ प्रश्नांच्या योगे आपण घेऊ शकतो. नामापासून विशेषणे तयार करा, विशेषणापासून भाववाचक नामे तयार करा, संधीचे–समासांचे विग्रह करा, प्रकार सांगा, शब्दांची शुद्ध रूपे लिहा, परिच्छेदात विरामचिन्हांचा उपयोग करा, वाक्यांची व्याकरणशुद्ध रचना बनवा, तसेच शब्दांच्या निरनिराळ्या जातींची व्याख्या देऊन उदाहरणे द्या इत्यादी अनेक प्रश्न वस्तुनिष्ट स्वरूपात विचारले जाऊ शकतात. आजच्या परीक्षेत देखील ते तसे विचारले जात आहेत. त्यांचा अध्यापकांना परिचय असल्यामुळे उदाहरणे देण्याची जरूर नाही.

भाषाग्रहणशक्तीचा विकास—

ज्ञानग्रहणातील दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थ्यांच्या भाषाग्रहणशक्तीचा विकास किती झाला हे पाहणे. पाठ्यपुस्तकांचा अभ्यास करण्याचा प्रमुख उद्देश हाच असतो. परंतु केवळ पाठ्यपुस्तकावरील आधारलेल्या प्रश्नांमधून या ग्रहणशक्तीचे मापन होऊ शकत नाही. कारण हा सर्व भाग विद्यार्थ्यांना शिकविला गेला असतो, त्यांनी तो अभ्यासिला असतो, त्यामुळे त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहिताना विद्यार्थ्यांना फारसा विचार करावा लागत नाही, बुद्धीला, कल्पनेला विशेष ताण देण्याची गरज नसते. तेथे त्यांना प्रामुख्याने पूर्वार्जित ज्ञानाचे स्मरण करावे लागते. याचमुळे आजच्या परीक्षेत पाठांतरालाच अधिक वाव आहे किंवा ज्याने पाठांतर चांगले केले असेल त्यालाच अधिक गुण मिळतात. स्वतंत्र बुद्धी, विचार, कल्पकता इत्यादी उच्चतर मानसिक शक्तींच्या उपयोगाला वावही नसतो व त्यांचे मापनही होत नाही असे आक्षेप अनेक टीकाकारांकडून घेतले जातात. म्हणून भाषा-ग्रहण शक्तीचा किती विकास झाला हे पहायचे असेल, तर त्यासाठी पाठ्यपुस्तकांवरील प्रश्नांवर विसंबून न राहता अपठित उतारे देऊन त्यावर प्रश्न टाकणे व ते विद्यार्थ्यांना कितपत सोडविता येतात हे पाहणे आवश्यक आहे. या अपठित उताऱ्यांच्या साह्यानेच विद्यार्थ्यांच्या भाषाग्रहण शक्तीची खरी चाचणी होऊ शकेल. अर्थात हे उतारे साधारणतः पाठ्यपुस्तकांतील इतर उताऱ्यांच्या दर्जाचेच असावेत. फार सोपेही नसावेत, आणि अति अवघडही नसावेत.

त्यावरील प्रश्न अर्थातच आतापर्यंत विचारलेल्या प्रश्नांच्या धर्तीवर विचारता येतील. काही प्रमाणात लघुउत्तरात्मक स्वरूपाचे प्रश्न रूढ पत्रिकेतही आपण विचारीत असतोच.

रसग्रहणात्मक उद्दिष्टांचे मूल्यमापन

प्रकटीकरणात्मक उद्दिष्टांच्या मूल्यमापनापूर्वी रसग्रहणात्मक उद्दिष्टांच्या मूल्यमापनाचा विचार करण्याचे कारण येथे स्पष्ट केले पाहिजे. रसग्रहण ही देखील ग्रहणात्मकच प्रक्रिया आहे. फक्त ती थोडी उच्चतर व वाङ्मयीन पातळीवरील एवढाच त्यात फरक. जे उतारे–धडे अगर कविता आपण विद्यार्थ्यांना नेमतो व शिकवितो त्यातील माहितीपर वा ज्ञानात्मक आशय त्यांनी किती ग्रहण केला हे आपण प्रथम पाहतो. परंतु तो धडा अगर ती कविता वाङ्मयीन कलाकृतीचाच एक लहान घटक असते. त्यांतून रस, सौंदर्य, शैली आदि वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा आविष्कार होत असतोच. म्हणून ज्ञानात्मक आशयासोबतच हा रसात्मक, सौंदर्यात्मक आशय विद्यार्थ्यांना किती प्रमाणात समजला, त्यांनी किती प्रमाणात ग्रहण केला याचीही चाचणी आपल्याला घ्यावीच लागते. हे दोन्ही

प्रकारचे प्रश्न एकाच किंवा त्याच पाठावर टाकावे लागतात, टाकता येतात. म्हणून या दोन्ही प्रकारच्या उद्दिष्टांचे परीक्षण आपण एकसमयावच्छेदे करू शकतो.

दुसरे असे — रसग्रहण किंवा सौंदर्यानुभूती ही भावनात्मक (Affective) प्रक्रिया आहे हे खरे. तिलाही ज्ञानात्मक (Cognitive) बाजू आहे. रस, अलंकार, कल्पनेचा विलास, प्रतिमासौंदर्य, शैली इत्यादींपासून मनाला होणारा आनंद हे त्याचे भावात्मक अंग. परंतु हा रस कोणता आहे, हे अलंकार कोणते आहेत, त्यांची वैशिष्ट्ये काय, लेखकाच्या कल्पनाविलासाचे किंवा शैलीचे विश्लेषण इत्यादी गोष्टींची चर्चा ही ज्ञानात्मक प्रक्रियेवरच आधारित आहे. म्हणून या सर्व वाङ्मयीन घटकांचे ज्ञान विद्यार्थ्यांना देणे व त्यांच्या या ज्ञानाची चाचणी घेणे या दोन्ही गोष्टींचा समावेश ज्ञानात्मक उद्दिष्टांमध्ये किंवा ग्रहणात्मक उद्दिष्टांमध्ये करता येतो. एवढेच नव्हे, तर रसग्रहणात्मक विकासाचे मूल्यमापन आपल्याला त्याच्या ज्ञानात्मक अंगापुरतेच मर्यादित ठेवावे लागते. रसग्रहणाचा भावनात्मक भाग हा रूढ मूल्यमापनाच्या कक्षेत येत नाही, आणता येत नाही. एखाद्याला कवितेच्या वाचनाने अगर अध्ययनाने आनंद झाला हे ठीक. परंतु हा कसा झाला, किती झाला, त्याच्या भावना किती प्रमाणात उचंबळून आल्या याचे मोजमाप आपण कसे काय करणार ? आज तरी या मापनाला अनुरूप अशी साधने आपल्या-जवळ नाहीत. शिवाय या भावनात्मक प्रक्रिया व्यक्तिनिष्ठ असतात, व्यक्तिपरत्वे वेगवेगळ्या असतात, त्यांना कोणतेही वस्तुनिष्ठ नियम लावणे फार कठीण आहे. म्हणून रसग्रहणातील भावनात्मक जागृतीचा भाग हा आपल्याला अध्यापनात्मक उद्दिष्टां-पुरताच मर्यादित ठेवावा लागतो, मूल्यमापनाच्या कक्षेत तो आणण्याची गरज नाही.

रसग्रहणाच्या ज्ञानात्मक बाजूचेच मूल्यमापन करण्याची आवश्यकता व शक्यता आपण विचारात घेतली. या ज्ञानात्मक बाजूचेही ग्रहणात्मक उद्दिष्टांच्या मूल्यमापनाच्या धर्तीवर दोन प्रकार करावे लागतील. व ते म्हणजे (१) पाठ्यपुस्तकांतर्गत कवितांवर अगर घड्यावर आधारलेले रसग्रहणात्मक प्रश्न विचारणे. यात रस, अलंकार, शैली, कल्पनाविलास आदि वाङ्मयीन सौंदर्य व्यक्त करणाऱ्या घटकांवर आधारित प्रश्न विचारावेत. परंतु हे सर्व शिकविले असल्यामुळे साहजिकच पूर्वज्ञानावर आधारित अशी विद्यार्थ्यांची उत्तरे राहतील. परंतु या सोबतच विद्यार्थ्यांच्या रसग्रहणशक्तीचा, आस्वादक्षमतेचा विकास खरोखरच झाला आहे की नाही हे पाहण्यासाठी अपठित गद्य उताऱ्यांप्रमाणेच एखादी अपठित कविता किंवा काव्य-सौंदर्याने नटलेला अपठित उतारा देऊन त्यावर प्रश्न विचारून विद्यार्थ्यांची चाचणी घेता येईल.

उदाहरणे — योग्य उत्तरावर खूण करा —

१) 'तुतारी' या कवितेतून केशवसुतांचा कोणता दृष्टिकोण व्यक्त होतो ?

(अ) समाजक्रांतिकारक, (ब) धार्मिक, (क) आर्थिक, (ड) समाजवादी.

२) 'ढळला रे ढळला दिन सखया,
संध्याछाया भिवविती हृदया,
अता मधूचे नांव कासया
लागले नेत्र रे पैलतिरी'

या ओळीतून कवीच्या मनाची कोणती वृत्ती प्रगट होते —

(अ) उत्साह, (ब) आशा, (क) भीती, (ड) विषण्णता.

३) 'खबरदार जर टाच मारुनी जाल पुढे चिंधड्या उडविन राई राई एवढ्या'

या ओळीतून कवीच्या काव्यशैलीचा कोणता गुण दिसून येतो —

(१) माधुर्य, (२) ओज, (३) प्रसाद (४) अलंकारिकता.

४) खाली काही काव्यपंक्ती दिल्या आहेत. त्या खाली काव्यसौंदर्याचे काही प्रकार दिले आहेत. त्यांपैकी त्या त्या पंक्तीसमोर त्यातून कोणत्या प्रकारचे काव्यसौंदर्य प्रगट होते हे लिहा —

अ) 'पीता मरंद उदरंभर भंबरांचे' ———

आ) 'ने मजसी ने, परत मातृभूमीला,
सागरा प्राण तळमळला' ———

इ) 'नियमन मनुजासाठी मानव नसे
नियमनासाठी जाणा' ———

ई) 'वरती बघता इंद्रधनूचा गोफ दुहेरी विणलासे—
मंगलतोरण काय बांधले, नभोमंडपी कुणी
भासे'

(कल्पनासौंदर्य, भावसौंदर्य, विचारसौंदर्य, नादसौंदर्य).

प्रगटीकरणात्मक उद्दिष्टांचे मूल्यमापन

प्रगटीकरणात्मक उद्दिष्टांच्या स्वरूपाची चर्चा आपण एका स्वतंत्र प्रकरणात केलीच आहे. भाषेच्या मूल्यमापनात प्रगटीकरणात्मक शक्तीचा विद्यार्थ्यांना भाषेचा वापर किती प्रमाणात व कसा करता येतो याच्या परीक्षणाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र इत्यादी विषय हे बऱ्याच प्रमाणात आशयनिष्ठ विषय (Content subjects) आहेत. परंतु मराठीत—अगर कोणत्याही भाषेत केवळ आशयाला महत्त्व नसून, विद्यार्थी आशयाची अभिव्यक्ती कशा रीतीने करतात यालाही तेवढेच महत्त्व असते.

हे प्रगटीकरण लेखी व तोंडी या दोन पातळीवर होत असते हेही आपण पाहिलेच होते. आजच्या परीक्षेत लेखी प्रगटीकरणाला अधिक महत्त्व असल्यामुळे आपण प्रथम त्याचाच विचार करू या.

निबंधवजा प्रश्न—

लेखी प्रगटीकरण कौशल्याचे मापन करण्याचे उत्तम साधन म्हणजे निबंधवजा प्रश्न. हल्ली वस्तुनिष्ठ प्रश्नपद्धतीचा बराच गाजावाजा होत आहे. तसेच निबंधवजा प्रश्नांचे दोषही दर्शविले जात आहेत. त्यामुळे वस्तुनिष्ठ परीक्षापद्धती ही सर्वश्रेष्ठ व एकमेव परीक्षापद्धती असाही पुष्कळांच्या मनात गैरसमज निर्माण झाला असतो. या उलट वस्तुनिष्ठ काय प्रश्नांच्या साह्याने विद्यार्थ्यांची लेखनशैली सुसूत्र, सुसंगत व मुद्देसूद विचार मांडण्याचे सामर्थ्य आदि कौशल्यांचे मापन होऊ शकत नाही म्हणून तिच्यावरही आक्षेप घेणारे टीकाकार आहेतच. परंतु वस्तुनिष्ठ काय किंवा निबंधवजा काय, कोणत्याही पद्धतीचा अभिनिवेश वा अधिक्षेप—दोन्हीही गैरच! प्रत्येक प्रश्नप्रकाराची वा परीक्षापद्धतीची काही वैशिष्ट्ये असतात, तिच्यातून काही विशिष्ट उद्दिष्टांची चाचणी अधिक चांगल्या तऱ्हेने घेता येते. म्हणून त्या उद्दिष्टांसाठी आपण तिचा वापर करतो, तर दुसऱ्या प्रकारच्या उद्दिष्टांसाठी दुसऱ्या अनुरूप पद्धतीचा उपयोग करावा लागेल. मराठी विषयात ज्ञानप्राप्तीची चाचणी घेण्यासाठी निबंधवजा प्रश्नांची योजना फार अपुरी ठरते. त्यामुळे तेथे आपण वस्तुनिष्ठ प्रश्नपद्धतीचा पुरस्कार केला. परंतु वस्तुनिष्ठ प्रश्नांमधून प्रगटीकरण कौशल्याची परीक्षा होऊ शकत नाही. बरे, प्रगटीकरण कौशल्य—किंवा लेखनशैलीला मराठीच्या परीक्षेत महत्त्वाचे—इतर विषयांच्या मानाने कितीतरी महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे. साहजिकच मराठीच्या परीक्षेत निबंधवजा प्रश्नांना वस्तुनिष्ठ प्रश्नांइतकेच किंबहुना अधिकच महत्त्व आहे.

तेव्हा निबंधवजा प्रश्नांबद्दल वाद उपस्थित होण्याची गरजच नाही. हे निबंधवजा प्रश्न कसे असावेत व त्यांचे मूल्यमापन कसे करावे याचाच आपण विचार करायला हवा.

(१) निबंधवजा प्रश्नासंबंधी लक्षात घेण्याची पहिली गोष्ट म्हणजे, जेथे आपल्याला विद्यार्थ्यांमधील विचारांचे सुसूत्र संयोजन करून मुद्देसूद स्वरूपात ते मांडण्याचे कौशल्य—त्यांचे लेखनकौशल्य पहावयाचे असते तेव्हाच निबंधवजा प्रश्नांचा वापर करावा.

(२) दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे निबंधवजा प्रश्न दोन प्रकारे विचारता येतात. एक म्हणजे—प्रत्यक्ष पाठ्यपुस्तकांतर्गत धड्यांवर अगर कवितांवर प्रश्न विचारणे व दुसरा म्हणजे स्वतंत्र विचार वा कल्पना यांची अभिव्यक्ती करणारे प्रश्न विचारणे. पहिल्या प्रकारच्या प्रश्नांची आवश्यकता मान्य करूनही, दुसऱ्या प्रकारच्याच प्रश्नांमधून विद्यार्थ्यांच्या लेखनक्षमतेच्या विकासाची खरी चाचणी होऊ शकते हे कदापि विसरता कामा नये.

(३) पहिल्या प्रकारचे प्रश्न जरी विचारायचे असले तरी ते अगदीच पोपटपंची करविणारे वा सारांशवजा किंवा माहिती स्वरूपाचे नसून विद्यार्थ्यांच्या विचारांना व बुद्धीला चालना देणारे असावेत.

(४) स्वतंत्र लेखनाचा आविष्कार निबंधाच्या प्रश्नात होऊ शकतो हे खरे. परंतु स्वतंत्र लेखनाच्या चाचणीसाठी फक्त निबंधच लिहायला दिला पाहिजे असे नाही. परिच्छेदलेखन हेही स्वतंत्र लेखनाचे एक महत्त्वाचे व विशेषतः प्राथमिक स्वरूपाचे साधन आहे. म्हणून लहान लहान मुद्यांवर अगर कल्पनांवर विद्यार्थ्यांना परिच्छेद लिहायला सांगणे हे देखील

अनुक्रमणिका

लेखनशैलीच्या चाचणीसाठी फार उपयुक्त ठरू शकेल. त्याचप्रमाणे कल्पनाविस्तार करणे, किंवा गोषवारा लिहिणे (Precis-writing) या प्रकारांचाही उपयोग करून घेता येईल.

(५) या निबंधवजा प्रश्नांचे मूल्यांकन देखील लेखनशैलीचे मुख्य घटक—अनुरूप-यथार्थ शब्द-योजना, सुटसुटीत वाक्यरचना, विचारांची किंवा मुद्यांची सुसंगत मांडणी, लेखन परिणामकारक करण्या-साठी केलेले वाक्प्रचार, म्हणी, सुभाषिते, अलंकार, श्रुतयोजने इत्यादी भाषासौंदर्य निर्माण करणाऱ्या साधनांची योजना या कसोटयांवर करण्यात यावे. स्वतंत्र वा मौलिक अशा लेखनगुणांचा किंवा शैलीचा आविष्कार करणाऱ्या विद्यार्थ्यांना अधिक श्रेय देण्यात यावे.

वस्तुनिष्ठ प्रश्न

प्रगटीकरणक्षमतेच्या चाचणीसाठी निबंधवजा प्रश्नांचाच अधिक उपयोग होतो हे खरे. परंतु काही प्रमाणात वस्तुनिष्ठ प्रश्नांचाही उपयोग आपल्याला करून घेता येतो.

जसे—(१) शब्दांचा वाक्यात उपयोग करा—

(२) वाक्प्रचारांचा वाक्यात उपयोग करा—

(३) म्हणींचा वाक्यात उपयोग करा—
(यासाठी पाठयपुस्तकातील निवडक शब्द, वाक्प्रचार, म्हणी देण्यात याव्या.)

(४) दोन शब्दांमधील फरक वाक्यात उपयोग करून स्पष्ट करा—

(अ) सुत ————————
सूत ————————

(ब) कोश ————————
कोष ————————

(हेही शब्द पुस्तकातूनच निवडावे)

(५) खाली काही उपमेये व उपमाने दिली आहेत त्यांची वाक्यें तयार करा.

(अ) जीवन — बुडबुडा, (ब) अश्रू — मोती.

शैलीदार व सृजनशील लेखनक्षमतेची परीक्षा पुढील प्रकारच्या वस्तुनिष्ठ प्रश्नांद्वारे घेता येईल.

(१) खाली दिलेल्या वाक्यात वाक्प्रचारांचा उपयोग त्यांचे पुनर्लेखन करा—

(अ) माधवरावांच्या मृत्यूमुळें त्यांच्या कुटुंबावर फारच कठिण प्रसंग ओढवला. (आकाश कोसळले)

(ब) थोडेसे रागावल्यावरोबर तिच्या डोळयातून पाणी आले. (गंगा यमुना वाहू लागल्या)

(२) अनुरूप म्हणींचा उपयोग करून वाक्यांचे पुनर्लेखन करा—

(अ) त्याला कितीही समजावून सांगितले तरी त्याचा काही उपयोग होत नाही.
(पालथ्या घागरीवर पाणी)

(ब) गरज पडली तर काय करणार ? कोणाचीही मदत घेणे आवश्यक आहे.
(अडला नारायण गाढवाचे पाय धरी).

(३) समर्पक सुभाषितांचा वा वचनांचा वापर करून वाक्यांचे पुनर्लेखन करा—

(अ) माणसाजवळ कितीही ज्ञान असले तरी त्याचा गर्व नको. त्याने नम्रतेनेच वागा-यला पाहिजे. (विद्या विनयेन शोभते)

(ब) कोणत्याही गोष्टीचा अतिरेक वाईटच.
(अति सर्वत्र वर्जयेत्)

(क) जगात आपले नाव होईल असे काही कार्य प्रत्येकाने आयुष्यात करून ठेवले पाहिजे.
(मरावे परी कीर्ति रूपे उरावे.)

(४) योग्य अलंकारांचा वापर करून वाक्यांचे पुन-र्लेखन करा—

(अ) भारतीयांच्या मृत्यूमुळे भारतीय जनतेला अतिशय दुःख झाले. (शोक सागरात बुडून गेली.)

(ब) लाजल्यामुळे तिचे गाल लाल झाले.
(गालावर गुलाब फुलले)

(क) आमचे सर फार संतापी आहेत.
(जमदग्नीचा अवतार.)

वाक्यांचे पुनर्लेखन करताना कोणत्या वाक्प्रचार, म्हणी, सुभाषित वा अलंकारांचा उपयोग करता येईल याची कल्पना देण्यासाठी ते कंसात दिले आहेत. विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिकेत ते देता कामा नये.

याच्या पुढची पायरी म्हणजे एखादा साध्या भाषेत लिहिलेला परिच्छेद देणे व वरील प्रसाधनांचा उपयोग करून त्याच परिच्छेदाचे सुंदर स्वरूपात पुनर्लेखन करण्यास सांगणे.

या प्रकारच्या प्रश्नांमधून विद्यार्थ्यांना प्राप्त भाषाज्ञानाचा आपल्या लेखनात उपयोग करून आपल्या अभिव्यक्तीला सुंदर व कलात्मक स्वरूप देता येते की नाही हे पाहता येईल व विद्यार्थ्यांमध्ये सृजनशीलतेचा विकास कितपत झाला आहे याचाही अंदाज येईल.

तोंडी परीक्षा

हल्ली मराठीमध्ये लेखी परीक्षेलाच महत्त्व दिले जात असून विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याचीच तपासणी करण्यावर भर असतो. परंतु लेखी प्रगटीकरणाइतकेच मौखिक किंवा तोंडी प्रगटीकरणालाही भाषेच्या परीक्षेत स्थान द्यायला हवे. विद्यार्थी भाषा कशी लिहितात हे पाहणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच ते भाषा कशी बोलतात याचीही पाहणी करण्याची आवश्यकता आहे. म्हणून लेखी परीक्षेच्या जोडीला तोंडी परीक्षाही घेण्यात यावी व त्यातून विद्यार्थ्यांचे उच्चार, वाचन, पाठांतर या मूलभूत एवढेच नव्हे तर भाषण, काव्यगायन वा काव्यवाचन, नाट्यवाचन, वक्तृत्व या उच्चतर पातळीवरील कौशल्यांची चाचणी घ्यावी. यातील काही क्षमतांची प्रत्यक्ष परीक्षा घेता येईल, तर काही कौशल्यांची चाचणी विद्यार्थ्यांनी वर्षभरात ज्या निरनिराळ्या अभ्यासानुवर्ती कार्यक्रमात भाग घेतला असेल त्यांच्या आधारे करावी.

सृजनशीलतेचे मूल्यमापन

सृजनशीलतेचा विकास हेही आपण मराठीच्या अध्यापनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट मानले आहे. त्यामुळे त्याच्याही मूल्यमापनाचा प्रश्न आपल्यापुढे उभा राहतो. सृजनशीलता याचा अर्थ स्वतंत्र व मौलिक लिखाण असे मानल्यास प्रगटीकरण कौशल्याच्या चाचणीबरोबरच काही प्रमाणात सृजनशीलतेच्या विकासाचीही चाचणी होऊ शकेल. ही चाचणी कशी घेता येईल, याची काही उदाहरणे प्रकटीकरण मूल्यमापनात दिलीच आहेत. या सृजनशीलतेचा आविष्कार विद्यार्थ्यांच्या निबंधांमध्ये व तत्सदृश स्वतंत्र लेखांमधूनही होतो. तेव्हा ज्या विद्यार्थ्यांच्या लेखामध्ये भाषासौंदर्याचा किंवा तदनुषंगिक घटकांचा आढळ होत असेल त्यांना तुलनात्मक दृष्टीने वरच्या पातळीवर आणून त्यांच्या लिखाणाला अधिक गुण द्यावेत. या व्यतिरिक्त कलात्मक पातळीवर लेखन करणाऱ्या सृजनशील विद्यार्थ्यांच्या लेखनाचे मोल ठरविणे हेही आवश्यक आहेच. परंतु या बाबतीत आज तरी निश्चित अशी कोणतीही पद्धती ज्ञात नाही. रसग्रहणाच्या भावनात्मक भागाची चाचणी घेणे हे जसे विलक्षण कठीण आहे. तसेच कलात्मक सृजनशीलतेचेही मापन करणे कठीणच जाणार आहे. त्यामुळे प्रगटीकरण कौशल्याच्या मापनासाठी वापरण्यात आलेल्या उच्चतर कसोटयांच्या आधारावरच हे मूल्यमापन करण्यावाचून गत्यंतर नाही. 'सृजनशील उद्दिष्टांची साध्यता' या प्रकरणात सृजनशीलतेच्या विकासाला चालना देणारे काही नवनिर्मितीपर स्वाध्याय सुचविले आहेत. त्या धर्तीवर जर काही लेखन काही विद्यार्थ्यांनी केले असेल तर ते तपासून त्या विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करण्याची जबाबदारी शिक्षकांवर ओघानेच येते व ते त्यांनी करावे. तसेच अशा प्रकारचे लेखन करण्याचे सामर्थ्य ज्या विद्यार्थ्यांमध्ये आहे त्यांच्या लेखनाचे मूल्यमापन करून त्याचे श्रेयही विद्यार्थ्यांना द्यावे. अशा मूल्यमापनात थोडी फार व्यक्तिनिष्ठता येणे अपरिहार्य आहे. अर्थात अशा सृजनशील प्रश्नांची योजना परीक्षेत करण्याची आवश्यकता नाही. विशेष कलात्मक पात्रता दाखविणाऱ्या या विद्यार्थ्यांना विद्यालयांतर्गत मूल्यमापनात (Internal assesment) अधिक गुण देण्यात यावे.

आतापर्यंत मराठीच्या अध्यापनाच्या विविध उद्दिष्टांचे मूल्यमापन कसे करावे, कोणकोणत्या पद्धतीचा व प्रश्नप्रकारांचा वापर करावा याची चर्चा केली. नमुन्यादाखल काही उदाहरणेही दिली. या व्यतिरिक्त इतरही काही प्रकारांचा अवलंब करता येईल. शिक्षकांनी जर आपल्या बुद्धीचा व कल्पकतेचा उपयोग केला, तर त्यांना अशा तऱ्हेचे नवे प्रकार सुचू शकतील व त्यांचा अवलंब त्यांनी अवश्य करावा. कोणतीही पद्धती पूर्णपणे निर्दोष अगर पूर्णपणे टाकाऊ नाही. तसेच परीक्षा पद्धतीमधील सर्व उणीवांवर वा दोषांवर एकमेव रामबाण उपाय असाही कोणताच नाही. ज्या उद्दिष्टांच्या चाचणीसाठी जी पद्धती योग्य असेल तिचा वापर करणे हेच आपले धोरण असावे. उद्दिष्टपरत्वे विविध पद्धतींचा वापर केला, तरच हे मूल्यमापन अधिकाधिक व व्यापक पातळीवर होईल. ते अधिकाधिक यथार्थ व विश्वसनीय होईल.

अनुक्रमणिका

संघवार्ता

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस, वि. सा. संघ

पुण्यतिथी

लो. बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी दि. १ ऑगस्टला साजरी करण्यात आली. यावेळी 'युगवाणी'चे संपादक श्री. मा. नी. गलगलीकर यांनी लोकमान्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला व त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली.

भेट

सुप्रसिद्ध साहित्यिक व नाटचवाङ्मयाचे अभ्यासक श्री. शि. गो. भावे (सातारा) यांनी दि. १४ ऑगस्ट ६७ रोजी सायं. ७ वा. संस्थेला भेट दिली. यावेळी उपाध्यक्ष श्री. शं. बा. शास्त्री आणि इतर कार्यकर्ते प्रामुख्याने उपस्थित होते.

निरोप समारंभ

सुप्रसिद्ध लेखक श्री. श्रीकान्त राय यांची नाशिक येथे बदली झाली त्यानिमित्त गुरुवार दि. १७ ऑगस्ट रोजी सायं. ७ वा. निरोपसमारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपाध्यक्ष श्री. शं. बा. शास्त्री आणि 'युगवाणी'चे संपादक श्री. मा. नी. गलगलीकर यांची भाषणे झाली. उत्तरादाखल श्री. श्रीकान्त राय यांनी भाषण केले. चहापानानंतर हा निरोपसमारंभ संपला.

नाटचाचार्य कै. खाडिलकर पुण्यतिथी

नाटचाचार्य कै. कृ. प्र. खाडिलकर पुण्यतिथीनिमित्त दि. २६ ऑगस्ट ६७ रोजी सायं. ७ वा. प्रा. म. ना. लोही यांचे व्याख्यान झाले.

'स्वरमंडळ' ची स्थापना

वि. सा. संघाच्या सांस्कृतिक समितितर्फे संगीतविषयक कार्य करण्याकरिता 'स्वर मंडळ' सुरू करण्यात आले असून या समितिचे आमंत्रक डॉ. बाळ पुरोहित आहेत.

या समितीचे कार्य करण्यासाठी खालील व्यक्तींना सभासद म्हणून नियुक्त करण्यात आले—

प्रा. राजाभाऊ कोकजे, डॉ. वा. वि. देशपांडे, प्रा. प्र. नी. खर्डेनवीस, श्री. पुरुषोत्तम सामक, श्री. मधुसूदन भावे, श्री. शरद सुतवणे, श्री. आनंद जोग, सौ. उषा पारखी, श्री. प्रभाकर गडकरी.

स्वरमंडळाच्या वतीने दर महिन्याच्या २ ऱ्या गुरुवारी रात्रौ संगीत सभेचे आयोजन करण्यात येईल.

अनुक्रमणिका

जन्माष्टमीच्या सुमुहूर्तावर दि. २८ ऑगस्ट ६७ रोजी रात्री ९ वा. 'स्वर मंडळाने' पहिल्या संगीतसभेचा कार्यक्रम आयोजित केला.

यावेळी सौ. स्नेहलता सराफ आणि श्री. शरद सुतवणे यांचे सुश्राव्य गाणे झाले. डॉ. बाबा-साहेब देशपांडे यांनी तारशहनाईचा कार्यक्रम सादर केला.

या कार्यक्रमाला नागपुरातील रसिक मंडळी उपस्थित होती.

लो. ना. डॉ. बापूजी अणे यांचा ८८ वा वाढदिवस

वि. सा. संघातर्फे लोकनायक डॉ. मा. श्री. ऊर्फ बापूजी अणे यांचा ८८ वा वाढदिवस दि. २९ ऑगस्ट ६७ रोजी सायं. ६. ३० वा. डॉ. भवानीशंकर नियोगी यांचे अध्यक्षतेखाली गडकरी सभागृहात साजरा करण्यात आला.

यावेळी ॲड. श्री. चंद्रशेखर धर्माधिकारी, ॲड. श्री. चंद्रशेखर माडखोलकर व श्री. जांबुवंतराव धोटे यांची भाषणे झाली.

कवी 'बी' स्मृतिदिन

वि. सा. संघातर्फे बुधवार दि. ३० ऑगस्ट ६७ रोजी सायं. ६–३० वा. कविवर्य नारायण मुरलीधर गुप्ते ऊर्फ "बी" स्मृतिदिनानिमित्त प्रा. म. ना. लोही यांचे अध्यक्षतेखाली प्रा. श्रीधर शनवारे यांचे व्याख्यान झाले.

आजीव सभासद

श्री. श्रीकान्त आगाशे, खापरखेडा, रु. १०१=००

डॉ. महादेवराव यादवराव देव, नागपूर– रु. १०१=०० हे संस्थेचे आजीव सभासद झाल्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोत.

शाखावृत्त

कारंजा

मंगळवार दि. १५ ऑगस्ट १९६७ रोजी मुलजी जेठा म्युनिसिपल हायस्कूलच्या भव्य सभागृहात मूर्तिजापूर–कारंजा निर्वाचन क्षेत्राच्या आमदार सौ. प्रतिभाताई तिडके ह्यांच्या अध्यक्षतेखाली सुप्रसिद्ध कवी श्री. भाऊ मालेराव, प्राचार्य, श्री. गाडगे महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय, मूर्तिजापूर यांच्या हस्ते कारंजा शाखेचे उद्घाटन झाले. कारंजा नगर–परिषदेचे अध्यक्ष श्री. नरेन्द्रसावजी चवरे व शहरातील अनेक साहित्यप्रेमी व गणमान्य नागरिक समारोहास उपस्थित होते.

शुक्रवार दि. ११–८–६७ रोजी स्थानिक कार्यकारिणीच्या निर्वाचित प्रतिनिधींची बैठक होऊन त्यात पुढीलप्रमाणे पदविभागणी झाली:—

(१) अध्यक्ष—डॉ. हेमचंद्र वैद्य,
(२) उपाध्यक्ष—श्री. अ. मो. चवरे,
(३) कोषाध्यक्ष—श्री. वीरेन्द्र ठाकूर,

अनुक्रमणिका

(४) चिटणीस—श्री. बाळकृष्ण वारगळ,
(५) सहचिटणीस—सौ. कमल द. खजूरकर,
(६) सदस्य—श्री. अं. रं. असोलकर व (७) श्री. वा. दे. धुमाळ.

उमरखेड

उमरखेड शाखेची गुरुवार दि. १७-८-६७ रोजी बैठक बोलावण्यात आली. तीत खालील कार्यकारिणी बनविण्यात आली:—

अध्यक्ष : डॉ. सिंगम — उपाध्यक्ष : श्री. शाम उत्तरवार
कार्यकारी अध्यक्ष : प्रा. वा. दा. जोशी — कार्यवाह : डॉ. गायकवाड
उपकार्यवाह : श्री. बाळ घामणकर, मालचंद्र अयाचित.
कोषाध्यक्ष श्री. बाळ पाटील.

याच बैठकीत चालू वर्षाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रामुख्याने शाखेतर्फे महिन्यातून कमीतकमी एक कार्यक्रम घेण्याचे ठरविले. ह्यात मुख्यत्वे नामवंत साहित्यिकांची भाषणे व गायकांचे गायन होणार आहे.

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ : परीक्षा समिती

– परीक्षांच्या तारखांत बदल –

केंद्राधिकाऱ्यांना सूचना आणि विनंती :—

संस्थेतर्फे होणाऱ्या मराठीभाषा आणि वाङ्मयाच्या (मराठी प्रवेश ते साहित्य स्नातक) परीक्षांच्या तारखांमध्ये बदल करण्यात आला आहे. केंद्राधिकाऱ्यांनी तत्संबंधी दखल घेऊन आम्हास सहकार्य द्यावे, अशी विनंती आहे.

येत्या सप्टेंबर १९६७ च्या सत्रातील परीक्षा दि. २३, २४ सप्टेंबरऐवजी शनिवार दि. ३० सप्टेंबर व रविवार १ ऑक्टोबर ६७ रोजी घेण्यात येतील.

परीक्षार्थी आवेदन–पत्रे भरून पाठविण्याची तारीख १० सप्टेंबर ६७ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

परीक्षा आरंभ दिनांक ३० सप्टेंबर १९६७

दि. ३० सप्टेंबर शनिवार, दुपार २–३० ते ५–३०	सा. स्नातक १,
दि. १ ऑक्टोबर, रविवार, सकाळ ७–३० ते १०–३०	म. प्रवेश, म. परिचय, म. बोध. म. प्रबोध, प्रारंभ, सा. विनीत १ सा. परिचित १, सा. प्रबोध. सा. स्नातक २.
रविवार, दुपार २–३० ते ५–३०	सा. विनीत २, साहित्य परिचित २. सा. स्नातक ३.

ग. स. देशपांडे
संचालक,
परीक्षा समिती, वि. सा. संघ
उत्तर अंबाझरी रस्ता, नागपूर १.

वि. सा. संघ
१ सप्टेंबर १९६७

अनुक्रमणिका

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

कार्यवृत्त इ. स. १९६६–६७

एक एप्रिल १९६६ पासून सुरू झालेल्या नवीन वर्षात कार्यकारी मंडळाच्या ५ आणि सर्व साधारण सभासदांच्या २ सभा झाल्या.

यावर्षी, संस्थेचे एकूण १२२८ सदस्य नोंदले गेले. यात ९८१ साधारण सभासद, २४७ आजीव सभासद असून त्यात ४ उपकर्ते, ६ आश्रयदाते, २ सहाय्यक, ५ हितचिंतक सभासद होते.

वेगवेगळ्या समित्यांनी संबंधित वर्षातील कार्यक्रम व्यवस्थित पार पाडल्याबद्दल त्या त्या समित्यांच्या आमंत्रकांचे आणि कार्यकर्त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

सांस्कृतिक समितीद्वारे—श्रीगणेश व्याख्यानमाला, कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमाला, इतिहासकार श्री. पु. ना. ओक यांची व्याख्यानमाला, कीर्तनसप्ताह इत्यादी कार्यक्रम झाले.

श्रीगणेश व्याख्यानमालेत, दि. २३, २४ व २५ एप्रिल ६६ रोजी, श्री. वि. के. पाळेकर ऊर्फ अप्रबुद्ध यांनी ‘ वैदिक धर्माचा खरा इतिहास ’ विद्यमान स्थिती, अपसिद्धान्त व वास्तविक स्वरूप ’ या विषयावर व्याख्याने दिली.

कै. ना. के. बेहेरे व्याख्यानमालेत प्रा. डॉ. रा. शं. वाळिंबे यांनी दि. १९ ते २१ जानेवारी १९६७ रोजी ‘ कलेचे कालानुवर्तित्व ’ या विषयावर व्याख्याने दिली.

सुप्रसिद्ध इतिहास–संशोधक श्री. पु. ना. ओक (दिल्ली) यांची दि. ७ ते ९ जानेवारी ६७ रोजी ‘ मी इतिहास संशोधनाकडे का वळलो ? ’ ‘ भारतीय इतिहास संशोधनातील काही कूट प्रश्नांचा उलगडा ’ व ‘ प्राचीन अर्बस्थानातील वैदिक संस्कृती ’ या विषयावर तीन व्याख्याने झाली.

यावर्षी दि. ८ जून ते १४ जून १९६६ पर्यंत कीर्तन–सप्ताह साजरा करण्यात आला. या सप्ताहात पुढील कीर्तनकारांनी भाग घेतला.

दि. ८ जून	ह. भ. प. श्री.	नानाबुवा सिंदखेडकर, खामगाव
दि. ९ जून	ह. भ. प. श्री.	दादाबुवा देवरस, नागपूर.
दि. १० ,,		भाऊशास्त्री शेवाळकर, अचलपूर
दि. ११ ,,		बाबासाहेब सालपेकर, नागपूर
दि. १२ ,,		विनायकबुवा भागवत, वाराणसी
दि. १३ ,,		विठ्ठलराव चिंचघरे, नागपूर
दि. १४ ,,		प्रभाकरशास्त्री दीक्षित, हिंगणघाट

अनुक्रमणिका

दि. २२ जून ६६ रोजी प्रा. मनोहर कवीश्वर यांनी ' गीत गोविंद ' या स्वरचित काव्याचे गायन केले.

श्री. प्रत्यक्ष वाल्मिकी सीतारामशास्त्री यांचे दि. २६ जून ६६ रोजी ' राम-वाली युद्ध ' या विषयावर भाषण झाले.

याव्यतिरिक्त म. म. बाळशास्त्री हरदास, प्रा. सौ. उषा लिमये यांची अनुक्रमे लोकमान्य टिळक व कवी ' बी ' पुण्यतिथीनिमित्त भाषणे झाली.

दि. १३, १४ व १५ डिसेंबर ६६ रोजी डॉ. ब. स. येरकुंटवार यांची ' संत साहित्य ' या विषयावर व्याख्याने झाली.

दि. २ मार्च ६७ रोजी सुप्रसिद्ध संगीत-दिग्दर्शक श्री. यशवंत देव यांचे ' शब्द आणि सूर ' या विषयावर सप्रयोग व्याख्यान झाले.

नाट्यसमितीतर्फे— कै. श्री. कृ. कोल्हटकर, वीर वामनराव जोशी, कृ. प्र. खाडिलकर, अ. ब. कोल्हटकर यांचे स्मृतिदिन साजरे करण्यात आले. या कार्यक्रमांचे वेळी प्रा. या. वा. वडस्कर, प्रा. मधुकर आष्टीकर, प्रा. रू. पां. पाजणकर व श्री. वि. ल. उळामाजे यांची व्याख्याने झाली.

लहान मुलांसाठी दि. १४ आणि १५ ऑगस्ट रोजी, मुंबईचे कलाकार श्री. रंगनाथ कुळकर्णी यांनी ' सुरईतला राक्षस ' हा कथाकथनाचा साभिनय कार्यक्रम सादर केला.

दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी सुप्रसिद्ध विनोदी नट श्री. शंकर घाणेकर यांचे ' गडकऱ्यांच्या नाटकांतील विनोदी भूमिका ' या विषयावर भाषण झाले.

दि. ५ नोव्हेंबर ६६ रोजी ' रंगभूमी दिना 'निमित्त नाट्यसमिती आणि रंजनकला-मंदिरातर्फे एक खास कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी श्री. गोपाळ कौशिक, डॉ. बाळ पुरोहित, कु. नीलांबरी बर्वे आणि सौ. कुमुद कुळकर्णी यांनी नाट्यगीते गाऊन दाखविली. ' मराठी रंगभूमी ' या विषयावर एक परिसंवाद घडवून आणण्यात आला. यात प्रा. रू. पां. पाजणकर (मराठी रंगभूमीचा सुवर्णकाळ), प्रा. म. बा. कुंडले (प्रायोगिक रंगभूमी), श्री. पु. व्यं. दारव्हेकर (मराठी रंगभूमीचे भवितव्य) यांनी भाग घेतला.

श्री. खोलकुटे ढाल—नाट्यस्पर्धा आणि कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा इ. स. १९६६–६७

श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा—

या स्पर्धेत—व्हेटर्नरी कॉलेज, मेडिकल कॉलेज, नॅशनल कॉलेज, विज्ञान महाविद्यालय आणि विश्वेश्वरैया रिज. इंजिनिअरिंग कॉलेज या ५ महाविद्यालयांनी भाग घेतला.

ह्या स्पर्धेत विश्वेश्वरैया रिज. इंजिनिअरिंग कॉलजने सादर केलेल्या ' प्रेमाविना भिकारी ' या नाटकाचा प्रथम क्रमांक आल्यामुळे या महाविद्यालयाला ' श्री. खोलकुटे रौप्यढाल ' मिळाली.

यावेळी श्री. अनिलकुमार सुळे यांना ' प्रेमाविना भिकारी ' या नाटकातील सर्वोत्कृष्ट वैयक्तिक अभिनयाबद्दल रु. २५–०० चे पारितोषिक मिळाले.

अनुक्रमणिका

स्त्री भूमिकेचे सर्वोत्कृष्ट वैयक्तिक अभिनयाचे रु. २५–०० चे पारितोषिक कु. प्रतिभा मुळे यांना ' मी जिंकलो मी हरलो ' या नाटकात भूमिका केल्याबद्दल मिळाले.

कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धा

(खामगाव शाखेच्या वतीने) या वर्षी, शासकीय आयुर्वेद महाविद्यालय, विश्वेश्वरैया रिज. इंजिनिअरिंग कॉलेज, अभ्यंकर नगर नागरिक मंडळ, फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद आणि धनवटे नॅशनल कॉलेज या संस्थांनी भाग घेतला. ही स्पर्धा वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात दि. ४ आणि ५ जानेवारी ६७ रोजी घेण्यात आली.

धनवटे नॅशनल कॉलेजने सादर केलेल्या ' भ्रमात पडले जर बच्चमजी ' या एकांकिकेला प्रथम क्रमांकाचे रु. ५०–०० चे बक्षिस आणि रौप्यढाल मिळाली.

विश्वेश्वरैया रिज. इंजिनिअरिंग कॉलजने सादर केलेल्या ' शूरा मी वंदिले ' या एकांकिकेला द्वितीय क्रमांकाचे रु. ३०–०० चे पारितोषिक मिळाले.

वैयक्तिक अभिनय–प्रथम क्रमांक रु. १५–००

कु. कलावती आठवले (शूरा मी वंदिले—भूमिका : मंजुळा वीर)
(रिजनल इंजिनिअरिंग कॉलेज, नागपूर)

वैयक्तिक अभिनय–द्वितीय क्रमांक रु. १०–००

श्री. अनिल पेंडसे (भ्रमात पडले जर बच्चमजी—भूमिका : सुभाष)
(धनवटे नॅशनल कॉलेज)

वैयक्तिक अभिनय–तृतीय क्रमांक रु. ५–००

कु. कुमुद बेंहेरे (भ्रमात पडले जर बच्चमजी—भूमिका : सुषमा)
(धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर)

या स्पर्धांचे वेळी परीक्षक म्हणून डॉ. राम म्हैसाळकर, सौ. उषाताई ऊर्ध्वरेषे, श्री. गोविंद मिडे, श्री. दिनकर देशपांडे, डॉ. डी. एम्. पालकर, प्रा. सुनील सुभेदार आणि सौ. नलिनी दिवाडकर यांनी सहकार्य दिले.

पारितोषिक वितरण समारंभ

श्री. खोलकुटे ढाल नाट्यस्पर्धा आणि कै. पद्माकर डावरे एकांकिका स्पर्धांचा पारितोषिक वितरण समारंभ दि. १ फेब्रुवारी १९६७ रोजी सायं. ७ वाजता वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात पार पडला.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे चित्रपट निर्माते—दिग्दर्शक–नट श्री. राजाभाऊ परांजपे हे होते. त्यांच्याच हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला. यावेळी श्री. राजाभाऊ परांजपे यांचे भाषण झाले.

वि. सा. संघाच्या मदतीकरिता रंजन कला मंदिरातर्फे श्री. पुरुषोत्तम दारव्हेकर लिखित ' नयन तुझे जादुगार ' या नाटकाचा प्रयोग दि. ४ फेब्रुवारी ६७ रोजी सादर करण्यात आला.

अनुक्रमणिका

वि. सा. संघाच्या ४४ व्या वर्धापन–दिनानिमित्त नाटककार श्री. मधुसूदन कालेलकर यांच्या नाटकांचा सप्ताह दि. १४ ते २० जानेवारी पर्यंत साजरा करण्यात आला. यावेळी ' विजयाचे वारस आम्ही ' ' अपराध मीच केला ' ' दिवा जळू दे सारी रात ' आणि ' दिल्या घरी तू सुखी रहा ' ही नाटके सादर करण्यात आली.

परीक्षा समिती तर्फे—यावर्षी मराठी प्रवेश ते साहित्य पारंगत या परीक्षा घेण्यात आल्या. दोन्ही सत्रांमध्ये एकूण २८०० विद्यार्थी परीक्षेस बसले. अ–मराठी भाषिकांकरिता नव्याने सुरू करण्यात आलेल्या परीक्षांना या वर्षी अधिक प्रमाणात विद्यार्थी बसले.

सप्टेंबर सत्र ६६	—	१५३३ विद्यार्थी;	४७ केंद्रे
फेब्रुवारी सत्र ६७		१२६७ विद्यार्थी;	४१ केंद्रे

' युगवाणी ' संपादक मंडळातर्फे—यावर्षी ११ अंक प्रसिद्ध झाले. यात ' कवी केशवसुत विशेषांक ' आणि ' दिवाळी विशेषांक ' यांचा उल्लेख प्रामुख्याने केला पाहिजे. नवोदित लेखक आणि कवी यांच्या साहित्याला प्रोत्साहन देण्याचे संपादक मंडळाचे धोरण लक्षात घेण्यासारखे आहे.

कवी केशवसुत जन्मशताब्दी महोत्सव—

कवी केशवसुत जन्मशताब्दी–महोत्सवानिमित्त दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी रात्रौ ८–३० वा वि. सा. संघाच्या धनवटे रंगमंदिरात ' केशवसुत गीत–गान ' हा कार्यक्रम सादर करण्यात आला. यावेळी सर्वश्री गोपाळ कौशिक, मधुकर गुळवणी, अरविंद दाते, वाळ पुरोहित, विजय भावे, माधव भावे, कु. नीलांबरी वर्वे, कु. माधवी वर्वे, कु. मीनाक्षी जोशी, सौ. विद्यावती केळकर, सौ. कुमुद कुळकर्णी यांनी भाग घेतला.

यानंतर ' केशवसुत–काव्यदर्शन ' या अभिनव कार्यक्रमात ' कवीच्या दृष्टिकोनातून केशवसुत ' या सदराखाली कवी गिरीश यांनी ' हरपले श्रेय ' श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांनी ' गोफण केली छान ', प्रा. भ. श्री. पंडित यांनी– ' मूर्तिभंजन ', श्री. सोपानदेव चौधरी यांनी ' झपूर्झा ' व प्राचार्य या. मु. पाठक यांनी ' प्रत ' या कवितांचे रसग्रहण वाचून दाखविले.

कवीसंमेलनाचे अध्यक्षस्थान श्री. शं. के. कानेटकर ऊर्फ गिरीश, यांनी स्वीकारले. या या संमेलनात सर्वश्री. भ. श्री. पंडित, गिरीश, वा. रा. कान्त, कवी अनिल, शरच्चंद्र मुक्तिबोध, या. मु. पाठक, सोपानदेव चौधरी, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगावकर आणि वसंत सबनीस यांनी भाग घेतला.

दि. ५ ऑक्टोबर रोजी ' कवी केशवसुत काव्यचर्चा ' कार्यक्रम झाला. दि. ७ ऑक्टोबर रोजी सायं. ६–३० वा. श्री. द. मो. दामले (सोलापूर) यांनी लिहिलेल्या, ' सरस्वतीचे लाडके पुत्र ' या पुस्तकाचा आणि ' युगवाणी–कवी केशवसुत विशेषांका 'चा प्रकाशन समारंभ, ' तरुण भारता 'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे हस्ते झाले. याच वेळी केशवसुतांच्या काव्याचे रसज्ञ समीक्षक म्हणून श्री. ग. त्र्यं. माडखोलकर आणि प्रा. भ. श्री. पंडित यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे व प्रा. म. शं. वावगावकर यांची यावेळी गौरवपर भाषणे झाली. या कार्यक्रमाला केशवसुत–कुटुंबीयांपैकी श्रीमती रत्नप्रभा घारपुरे ह्या उपस्थित होत्या.

श्री. वि. स. खांडेकर सत्कार समिती (पुणे) यांचे वतीने वि. सा. संघाच्या स्वाधीन केलेल्या निधीच्या रकमेवरील व्याजातून महाराष्ट्रातील विद्यापीठांतून बी. ए. परीक्षेत मराठी ऐच्छिक विषयात प्रथम क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्याला प्रत्येकी रु. ७५ चे पारितोषिक देण्यात येते. इ. स. ६६–६७ मध्ये पुढीलप्रमाणे श्री. वि. स. खांडेकर पारितोषिके देण्यात आली.

श्री. पद्माकर रामचंद्र दादेगावकर	(उमरखेड)	नागपूर विद्यापीठ, नागपूर
कु. सुनंदा कृष्णराव मराठे	(खडकेश्वर)	मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद
श्री. अनिलकुमार कृष्णराव देवधर	(पुणे)	पुणे विद्यापीठ पुणे
श्री. दिगंबर विठ्ठल पाध्ये	(मुंबई)	मुंबई विद्यापीठ मुंबई
कु. शशिकला वसंत पाटणकर	(सातारा)	श्रीशिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

न्या. मू. रानडे आंतरमहाविद्यालयीन वादस्पर्धा—

वि. सा. संघ आणि वक्तृत्वोत्तेजक सभा (पुणे) या संस्थांच्या विद्यमाने कै. न्या. मू. रानडे आंतर–महाविद्यालयीन वादस्पर्धा दि. २३, २४ व २५ सप्टेंबर ६६ रोजी आयोजित करण्यात आली.

या स्पर्धेत एकूण १६ महाविद्यालयांनी भाग घेतला. परीक्षक म्हणून अॅड. श्री. म. पु. केळकर, श्री. कृ. अ. कुळकर्णी आणि श्री. मा. नी. गलगलीकर यांनी काम केले.

यावर्षी नागपूर महाविद्यालयाने फिरती रौप्यढाल मिळविली. कु. पद्मा नांदे (नागपूर महाविद्यालय) यांना १०० रु. चे वैयक्तिक प्रथम क्रमांकाचे पारितोषिक आणि प्रमाणपत्र देण्यात आले.

श्री. ए. बी. देशमुख (विज्ञाणी नगर महाविद्यालय, नागपूर) याना ७५ रु. चे द्वितीय पारितोषिक आणि प्रमाणपत्र मिळाले. श्री. धनंजय आचार्य आणि श्री. प्रकाश लोये याना ६० टक्क्यांहून अधिक गुण मिळाल्याबद्दल प्रमाणपत्रे देण्यात आली.

दि. २५ सप्टेंबर ६६ रोजी श्री. कृ. ग. पाठक, डेप्युटी डायरेक्टर ऑफ एज्युकेशन (विदर्भ विभाग) नागपूर, यांच्या हस्ते बक्षिस–समारंभ झाला.

श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालय—यावर्षी संदर्भ ग्रंथालय समृद्ध करण्याकरिता नवीन ग्रंथ विकत घेण्यात आले. विशेषतः टीकावाङ्मय, संपूर्ण गडकरी, संपूर्ण सावरकर, मामा वरेरकर, आचार्य अत्रे यांचे वाङ्मय प्रामुख्याने खरेदी करण्यात आले.

संदर्भ ग्रंथालयाचे दृष्टीने ग्रंथालय व्यवस्थित लावण्यात आले. ग्रंथालय व्यवस्थित लावण्याकरिता कु ललिता राजंदेकर, कु. सुहासिनी पांढरीपांडे, श्री. ढवळे व श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांनी सहकार्य दिले.

संस्थेतर्फे, नव्याने 'अभ्यास मंडळ' सुरू करण्यात आले. या अभ्यास मंडळातर्फे मराठी एम्. ए. च्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याची सोय करण्यात आली व संदर्भ ग्रंथांचा उपयोग कसा करावयाचा याचेही मार्गदर्शन देण्यात आले. अभ्यास–मंडळाचे संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांच्या सहकार्याने मार्गदर्शनाचे काम सुरू आहे.

अभ्यासमंडळातर्फे 'कवी केशवसुत वाङ्मय सूची' प्रसिद्ध करण्यात आली. तसेच महाराष्ट्रातील सर्व साहित्यिकांचे पत्ते मिळविण्याचे दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

अनुक्रमणिका

या अभ्यास मंडळाकरिता काही विद्यार्थ्यांनी ग्रंथानुदान दिले. संयोजक श्री. चंद्रकांत कुळकर्णी यांचे आणि त्यांच्या सहकार्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

२६ वे विदर्भ साहित्य संमेलन

वि. सा. संघाचे २६ वे साहित्य संमेलन काटोल (जि. नागपूर) येथे शनिवार दि. १७ आणि रविवार दि. १८ सप्टेंबर १९६६ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली झाले.

संमेलनाचे उद्‌घाटन, दि. १७ सप्टेंबर ६६ रोजी सायं ६–३० वा. माननीय बॅ. शेषरावजी वानखेडे, अर्थमंत्री–महाराष्ट्र राज्य, यांच्या हस्ते झाले.

स्वागताध्यक्ष श्री. जीवनलालजी चांडक यांनी भाषण केल्यावर संमेलनाध्यक्षांच्या गौरवपर भाषणे झाली. या नंतर डॉ. अ. ना. देशपांडे यांचे भाषण झाले. हा सोहळा वल्लभदास नाट्यगृहात झाला.

रात्री १०–३० वा. स्थानिक रसरंग कला मंदिरातर्फे 'कौन्तेय' नाटक झाले. दि. १८ रोजी सकाळी ८–३० वा. सर्वसाधारण सभा झाल्यावर दुपारी ११–३० वा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली पुस्तक प्रकाशनाचा कार्यक्रम झाला.

प्रा. म. ना. लोही यांचे 'साहित्य आणि कला', प्रा. माऊ मांडवकर यांचा 'कोलाम' ग्रंथ सौ. इंदुमती शेवडे यांचे 'इये साहेबाचिये नगरी' आणि कवी श्री. वि. वा. जोशी यांचे 'कवितेचे दुकान' ह्या पुस्तकांचे प्रकाशन झाले.

'साहित्य आणि समाज' या विषयावर परिसंवाद—

दुपारी २ वा. 'साहित्य आणि समाज' या विषयावर परिसंवाद झाला. यात सर्वश्री मा. नी गलगलीकर, मधुकर केचे, म. ना. लोही, बाबा मोहोड यांची भाषणे झाली. यावेळी स्वागतोपाध्यक्ष श्री. वैकुंठराव इंगळे यांनी सर्वांचे आभार मानले.

'मराठीचे अध्यापन' या विषयावर प्रा. म. बा कुंडले यांचे व्याख्यान झाले.

सायं. ६–३० वा. रुईया विद्यालयाचे प्रांगणात खुले अधिवेशन झाले. यावेळी सम्मेलनात मांडावयाच्या ठरावांसंबंधी चर्चा करण्यात आली. वेगवेगळ्या ठरावांवर भाषणे झाली. एकूण ५ ठराव मंजूर झाल्याचे जाहीर करण्यात आले. यानंतर प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांनी समारोपाचे भाषण केले. स्वागताध्यक्ष श्री. जीवनलालजी चांडक, वि. सा. संघाचे सरचिटणीस श्री. बाबुराव चिमोटे आणि प्रतिनिधींतर्फे श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांनी आभार मानले.

२७ वे साहित्य संमेलन वर्धा येथे भरविण्यात यावे, यासंबंधी प्रा. दे. गं. सोटे यांनी खुल्या अधिवेशनात निमंत्रण दिले. रात्री १० वा. श्री. आ. रा. देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली कविसंमेलन झाले. यात ५२ कवींनी भाग घेतला.

कलाकेंद्र समिती—ही समिती नव्याने अस्तित्वात आली असून या समितीद्वारे चित्रकलेचे शिक्षण तसेच चित्रप्रदर्शन आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

अनुक्रमणिका

दि. २७ सप्टेंबर ६६ रोजी चित्रप्रदर्शन भरविण्यात येऊन श्री. कृ. ग. पाठक, उपसंचालक, शिक्षण विभाग, यांचे हस्ते उद्घाटन करण्यात आले. या प्रदर्शनात एकूण १४१ कलाकृती ठेवण्यात आल्या. त्यांपैकी बालचित्र विभागातील ५३ चित्रे होती.

३० बालचित्रकारांनी काढलेली ८६ चित्रे, शंकर्स इंटर नॅशनल चिल्ड्रेन्स स्पर्धेकरिता दिल्ली येथे पाठविण्यात आली.

दि. २२ जानेवारी ६७ रोजी सायंकाळी. ५–३० वा. एअर कमांडर श्री. एच्. मूळगावकर एम्. व्ही. सी. यांचे हस्ते, सुप्रसिद्ध चित्रकार श्री. इव्हॉन डेन्झिल स्वीट यांच्या ६७ चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्घाटन झाले.

श्री. काकासाहेब दांडेकर, डायरेक्टर, कॅम्लीन प्रा. लि. मुंबई, यांनी कलाकेंद्राला भेट देऊन, बालकलाकारांच्या प्रोत्साहनार्थ त्यांनी आपल्या कारखान्यात तयार झालेले रंगसाहित्य पाठविले.

साहित्य गोष्ठीतर्फे—चार बैठकी झाल्या. नवोदित लेखक-कवी यांचे साहित्य सर्वांना ऐकावयास मिळाले, व त्यांना प्रोत्साहन देणे, नवोदित कलाकृतींचे परीक्षण करणे – चर्चा घडवून आणणे इत्यादी उद्देश या 'साहित्य गोष्टी'द्वारे साधण्याचा प्रयत्न चालू आहे.

दि. २७ जुलै ६६ रोजी रात्री 'कवितामैफिल'चे आयोजन करण्यात आले.

दि. २८ सप्टेंबर ६६ रोजी श्री. भाऊ पाध्ये यांच्या 'वासुनाका' पुस्तकावर चर्चा करण्यात आली.

दि. १२ ऑक्टोबर ६६ रोजी चित्रकार श्री. भाऊ समर्थ यांचे 'मॉडर्न आर्ट' या विषयावर भाषण होऊन त्यावर सर्वांगीण चर्चा करण्यात आली.

या व्यतिरिक्त श्री. प्रभाकर पुराणिक, श्री. प्रभाकर सिरास, श्री. सुधाकर लोखंडे आदी व्यक्तींनी वेळोवेळी आपले साहित्य वाचून दाखविले.

स्मृतिदिन—

दि. १ मे ६६ रोजी नाटककार कै. नाना जोग यांच्या स्मृतिदिनानिमित्त रंजन कलामंदिरातर्फे तीन एकांकिका सादर करण्यात आल्या.

दि. १ ऑक्टोबर ६६ रोजी कविवर्य कै. श्री. रा. उपाख्य अण्णाजी बोबडे स्मृतिदिन श्री. आ. रा. देशपांडे (अनिल) यांचे अध्यक्षतेखाली साजरा झाला. यावेळी 'महाराष्ट्रा'चे संपादक श्री. दि. ब. पंडित यांचे व्याख्यान झाले.

दि. १८ डिसेंबर ६६ रोजी कवी कै. गोविंद गोपाळ ऊर्फ मामा रामभजनी यांचा सातवा स्मृतिदिन साजरा करण्यात आला. यावेळी 'तरुणभारत'चे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांचे भाषण झाले. यावेळी सौ. तारा देशपांडे आणि सौ. तोतरे यांनी कै. रामभजनी यांच्या काही कविता गाऊन दाखविल्या.

दि. २३ जानेवारी ६७ रोजी कवी-नाटककार कै. राम गणेश गडकरी यांच्या ४८ व्या स्मृतिदिनानिमित्त प्रा. द. भि. कुळकर्णी यांचे 'अर्वाचीन मराठी काव्य आणि गोविंदाग्रज' या विषयावर भाषण झाले.

दि. ३१ जानेवारी ६७ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक कै. गोविंदराव दोडके यांचा स्मृतिदिन डॉ. मा. गो. देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.

या वेळी 'लोकांची शाळा' या संस्थेकडून दोडके स्मारकाकरिता रुपये ३०० = ०० देणगी म्हणून देण्यात आले.

भेटी व सत्कार

नागपूर विद्यापीठाचे कुलगुरुपदी डॉ. वि. भि. कोलते यांची नियुक्ती झाल्याबद्दल दि. १० एप्रिल ६६ रोजी म. म. द. वा. पोतदार यांचे अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला. यावेळी प्रा. रा. श्री. जोग, डॉ. मा. गो. देशमुख, प्रा. प्र वा. ऊर्ध्वरेषे, डॉ. म. गो. बोकरे आणि प्रा. वा. कृ. चोरघडे यांची भाषणे झाली.

काटोल येथे भरलेल्या संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. अ. ना. देशपांडे यांचा सत्कार, दि. २८ एप्रिल ६६ रोजी, करण्यात आला. याप्रसंगी श्री. आ. रा. देशपांडे, प्रा. व. कृ. वऱ्हाडपांडे, प्रा. श्री. म ा. कुळकर्णी व श्री. बाळ पांडे यांची गौरवपर भाषणे झाली.

सुप्रसिद्ध कवी व समीक्षक प्रा. म. श्री. पंडित यांच्या ६१ व्या वाढदिवसानिमित्त त्यांचे निवासस्थानी जाऊन त्यांना संस्थेतर्फे पुष्पहार अर्पण करण्यात आला.

दि. ५ सप्टेंबर ६६ रोजी मुंबई ग्रंथसंग्रहालयाचे कार्यकर्ते श्री. वा. वि. भट यांनी भेट दिली. यावेळी श्री. शां. शं. रेगे आणि डॉ. पंड्या त्यांचे समावेत होते.

दि. १७ नोव्हेंबर ६६ रोजी सुप्रसिद्ध कादंबरीकार श्री. दत्त रघुनाथ कवठेकर यांनी भेट दिली.

दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी नटश्रेष्ठ श्री. मामा पेंडसे यांचा, षष्टयब्दिपूर्तीनिमित्त, सत्कार करण्यात आला.

दि. ११ जानेवारी ६७ रोजी सायं. ६-३० वा. 'किर्लोस्कर' मासिकाचे संपादक श्री मुकुंदराव किर्लोस्कर यांनी भेट दिली.

दि. २० जानेवारी ६७ रोजी रात्री १० वाजता सुप्रसिद्ध नाटककार व चित्रपट कथालेखक श्री. मधुसूदन कालेलकर यांचा प्रा. रा. शं. वाळिंबे यांचे अध्यक्षतेखाली सत्कार करण्यात आला.

शाखावृत्त—

काटोल, गोंदिया, यवतमाळ, वणी, चंद्रपूर, खामगाव, अमरावती, वरूड, वर्धा, चिखली, अकोला, दर्यापूर, यागावी वि. सा. संघाच्या शाखा आहेत. या शाखांनी साहित्यिकांचे स्मृतिदिन, संस्थेचा वर्धापन दिन आणि इतर नित्य-नैमित्तिक कार्यक्रम घडवून आणले.

वर्धा शाखेतर्फे—दि. ४ मे ६६ रोजी कुलगुरु डॉ. वि. भि. कोलते यांचा सत्कार करण्यात आला व नवीन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले.

गोंडवन शाखेतर्फे–दि. १४ ऑगस्ट रोजी सभासदांची सभा होऊन कार्यकारी मंडळ निवडण्यात आले यावेळी पूर्वाध्यक्ष प्रा. रा. ना. घाटोळे यांना निरोप देण्यात आला.

दि. २ ऑक्टोबर ६६ रोजी शाखेतर्फे गांधीजयंती निमित्त विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा आयोजित करण्यात आली. कवी श्री. ना. गो. हूड यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ झाला.

कवी केशवसुत जन्मशताब्दी निमित्त दि. २५ ऑक्टोबर ६६ रोजी परिसंवाद घेण्यात आला. यावेळी सर्वश्री सा. भू. तु. ना. काटकर, न. रा. निमजे, म. ह. देशपांडे, दि. व. कापरे, सौ. रेवती खांदेवाले यांची भाषणे झाली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कवी श्री. ना. ना. हूड हे होते.

दि. २६ रोजी कवि-संमेलन झाले.

गोंदिया शाखेतर्फे—दि. १ ऑगस्ट रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथीनिमित्त श्री. केवलानंद जैन यांचे व्याख्यान; तुलसीजयंतीनिमित्त दि. २२ ऑगस्ट रोजी श्री. ठाकूर वकील यांचे अध्यक्षते-खाली प्राचार्य वर्मा व श्री. टी. आर. गुप्त यांची भाषणे; नाटककार खाडिलकर स्मृतिदिनानिमित्त दि. २६ ऑगस्ट रोजी प्रा. पांडे यांचे अध्यक्षतेखाली प्रा. सराफ यांचे भाषण इत्यादी कार्यक्रम झाले. यावेळी स्थानिक कलाकारांनी नाट्यगीते गाऊन दाखविली.

दि. ११ सप्टेंबर रोजी प्रा. विजय मुन्शी यांनी साभिनय कथावाचनाचा कार्यक्रम सादर केला.

श्रीमंत प्रभाकरशेठ क्षत्रिय यांना निरोप देण्यात आला. दि. २६ नोव्हेंबर रोजी श्री. बाबासाहेब तनखीवाले यांचे अध्यक्षतेखाली 'वेड्याचं घर उन्हात' या नाटकाचा मुहूर्त करण्यात आला. दि. १६ डिसेंबर रोजी प्रा. पांडे यांचे अध्यक्षतेखाली 'ज्ञानेश्वर पुण्यतिथी'निमित्त प्रा. नानासाहेब देशपांडे यांचे भाषण झाले.

दि. १४ जानेवारी ६७ रोजी संस्थेचा वर्धापन दिन संघाध्यक्ष प्रा. वा. कृ. चोरघडे यांच्या उपस्थितीत साजरा झाला. अध्यक्षस्थानी श्री. महादेवराव घोटे होते. या कार्यक्रमाला माननीय श्री. बाळासाहेब देसाई (गृहमंत्री, म. राज्य) उपस्थित होते.

दि. १५ जानेवारी रोजी 'वेड्याचं घर उन्हात' या नाटकाचा प्रयोग झाला.

अमरावती शाखेतर्फे—विजयादशमीच्या मुहूर्तावर प्रा. भाऊ मांडवकर लिखित 'कानचिरी' या संग्रहाचे प्रकाशन श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी यांचे हस्ते होऊन श्री. सुदाम सावरकर यांचे भाषण झाले.

दि. २६-१०-६६ रोजी कवी केशवसुत जन्मशताब्दीनिमित्त परिसंवाद घेण्यात आला.

वणी शाखेतर्फे—दि. २१-११-६६ रोजी शाखासभासदांची सभा झाली. प्राचार्य राम शेवाळकर यांचे 'आचार्य अत्रे' यांच्या विविधरंगी व्यक्तिमत्त्वावर भाषण झाले.

दि. २७-११-६६ रोजी श्री. सदानंद जोशी यांनी 'मी अत्रे बोलतोय्' हा एकपात्री कार्यक्रम सादर केला.

दि. १-१२-६६ रोजी 'मी नकलाकार कसा झालो' या विषयावर श्री. सदानंद जोशी यांचे प्रात्यक्षिकासहित भाषण झाले.

दि. ३ ते ७ डिसेंबर ६६ पर्यंत 'आर्य चाणक्य' या विषयावर म. म. बाळशास्त्री हरदास यांनी व्याख्याने दिली.

दि. ८ डिसेंबर रोजी श्रीज्ञानेश्वर पुण्यतिथी साजरी झाली.

वि. सा. संघाला अनुदान—

विदर्भ साहित्य संघाला महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले.

(अ)	वार्षिक अनुदान——	रु. ७५००—००
(आ)	नाटयसमिती——	रु. २५००—००
(इ)	'युगवाणी , मासिकाकरिता——	रु. ५०००—००
(ई)	मुख्यमंत्र्यांच्या निधीतून—— श्रीशिवाजी संदर्भ ग्रंथालयाकरिता	रु. २०००—००

खामगाव येथील कै. श्री. कृ. कोल्हटकर स्मारकाकरिता रु. ५०००—००

वि. सा. संघ शासनाचा अत्यंत आभारी आहे. इ. स. ६६—६७ मध्ये ज्या व्यक्तींनी सहकार्य दिले त्यांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

आपले

वा. कृ. चोरघडे अध्यक्ष	म. ल. देशमुख तु. ना. काटकर	बाबुराव चिमोटे सरचिटणीस
शं. बा. शास्त्री उपाध्यक्ष	भाऊ मांडवकर चिटणीस	सौ. सरलाबाई भावे कोषाध्यक्ष

अनुक्रमणिका

अनुसूची ११ (नियम १७ (१) प्रमाणे)

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६७ ला संपणाऱ्या जमा-खर्चाचा तक्ता

खर्च		उत्पन्न	
इमारतीकरता झालेला खर्चः—		व्याज (ठेवीवरील)	५४७-६९
अवमूल्यन (Depreciation)	२,९७४-७२	सरकारी अनुदान	१०,५००-००
अंकेक्षण शूल्क	२००-००	वि. सा. संघ-कार्यक्रमांचे उत्पन्न	७,८१९-४५
हीनार्थ रंगमंदिर (Deficit in Rang Mandir)	८,८६४-०४	इतर उद्गमांपासून उत्पन्न (Income from other Sources)	
वि. सा. संघाच्या उद्देशाप्रमाणे झालेला खर्च—		साधारण समासद वर्गणी	२,९४४-००
शैक्षणिक	३६,३९८-९७	संलग्न संस्था	१०-००
		परीक्षा शुल्क	९,०८३-०१
		पुस्तक विक्री	३३८-७२
		युगवाणी वर्गणी	४००-००
		युगवाणी-जाहिरातीचे शत्पन्न	५७५-००
		किरकोळ उत्पन्न	२,०७२-३६
		हीनार्थ (Deficit) स्थितिविवरणाकडे (Dificit carried over to Balance Sheet)	१४,१४७-५०
एकूण	४८,४३७-७३	एकूण	४८,४३७-७३

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष,
विदर्भ साहित्य संघ

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे

नागपूर दि. १५-७-६७ महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्

अनुसूची ८ (नियम १७ (१) प्रमाणे)

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१ मार्च १९६७ चे स्थिती विवरण (बॅलन्सशीट)

फंड व लायबिलिटिज		रुपये पैसे	रु. पैसे
मंदिर निधी मागील			२,०२,७८७–२४
सरकारी अनुदान मागील		२,४१,९७३–००	
सरकारी अनुदान श्रीशिवाजी ग्रंथालय मागील		३२,०००–००	
ग्रंथ प्रकाशन	८,९२०–००		
वजा खर्च	८,७७३–३५	१४६–६५	२,७४,११९–६५
इतर विशेषांकित निधी—			
अवमूल्यन निधी		१,८१,३४८–४७	
आजीव सभासद		१२,८५४–००	
कै. बेहेरे व्याख्यानमाला		६,०००–००	
श्रीगणेश व्याख्यानमाला		६,०००–००	
श्री. खांडेकर सत्कार निधी		८,०९१–१२	
कै. श्री. वरेरकर सत्कार निधी		५८५–७१	
डॉ. शिगणापूरकर पारितोषिक		५००–००	
कै. श्री. नेने स्मारक निधी		७५–००	
रंगमंदिर देणग्या		४,००१–००	
भविष्य निधी		२,०६८–८८	
कै. पद्माकर डावरे एकांकिका नाटय स्पर्धा		७८०–१७	
कै. श्री. गो. रा. दोडके स्मारक		३००–००	

असेट्स व प्रॉपर्टीज	रुपये पैसे	रुपये पैसे
मंदिर रचना (संघमंदिर, रंगमंदिर व श्रीशिवाजी ग्रंथालय)		६,९६,२०४–०३
विद्युत् आणि दूरध्वनी स्थित निक्षेप		२,१५६–००
प्रसिद्धी अधिकारी खाते यांचेकडून येणे असलेले भाडे		४,२७५–००
इमारत बांधकामाचा अग्रिमा		१,३६०–९६
विद्युत् कामासाठी अग्रिमा		७,०००–००
रोख आणि बँक खाते शिल्लक—		
मुदती ठेव	२५,७०५–००	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (करंट)	४,२५२–५९	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (वि. फंड)	२,४८१–७४	
दि बँक ऑफ महाराष्ट्र (श्रीशि. ग्रंथालय)	११२–७७	
विदर्भ प्री–को–ऑ–हाउसिंग सोसायटी	१,८१७–८४	
„ „ (प्रॉ. फंड)	२,०८८–८८	
शिल्लक जवळ (रु. २५०/–चा वनादेश धरून)	-५,५५२–३०	
शिल्लक जवळ रंगमंदिर	३६४–४८	
शिल्लक जवळ श्रीशिवाजी ग्रंथालय	२८४–३७	
		४२,६५९–९७

कै. नाना जोग स्मारक फंड	२,०६८–८८	
श्रीशिवाजी ग्रंथालय देणग्या	४३,२८१–८४	
श्री. पेंडसे छायाचित्र	२५–००	२,६८,०००–०७
सुरक्षा स्थित निक्षेप (ठेकेदार)		१,०९९–२८
तात्पुरते कर्ज		१०,०००–००
निलंबित खाते		१८३–६३
व्यापारी देणे	४७,८९९–६७	
देणे असलेला खर्च	२००–००	४८,०९९–६७
एकूण		८,०४,२८९–६४

जमा–खर्चाचा हिशेब—			
मागील बॅलन्स शीटमध्ये दाखविलेली रक्कम		३८,४६५–५१	
अधिक यंदाचे (हीनार्थ)		१४,१४७–५०	
		५२,६१३–०१	
वजा यंदाची समयोजना	२,७५९–५०		
अधिक यंदाची समयोजना	७८०–१७	१,९७९–३३	५०,६३३–६८
एकूण			८,०४,२८९–६४

प्रमाणपत्र—विदर्भ साहित्य संघ या संस्थेच्या ३१ मार्च १९६७ रोजी तयार असलेल्या स्थितिविवरणात वर दिलेले आकडे संघाच्या पुस्तकांशी तंतोतंत जुळतात आणि ही पुस्तके आम्ही तपासली असून ती बरोबर आहेत असे आम्ही प्रमाण–पत्र देतो.

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे

नागपूर दि. १५–७–६७

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य सं

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंट्स

विदर्भ साहित्य संघ, नागपूर

३१-३-१९६७ च्या स्थिती-विवरणाच्या मत्तेचे अनुसूचितींचे पत्रक

तपशील	३१-३-१९६६ चे मूल्य	अधिक यंदाचे	एकूण	३१-३-१९६६ पर्यंत अवमूल्यन (Depreciation)	अवमूल्यन यंदाचे	३१-३-१९६७ पर्यंत अवमूल्यन	३१-३-१९६७ ला निव्वळ मूल्य
रंगमंदिर	५,३४,७८७-१७	९,७३०-०४	५,४४,५१७-२१	१,३७,५६८-४०	१९,८६०-९४	१,५७,४२९-३४	३,८७,०८७-८७
श्रीशिवाजी ग्रंथालय	९०,८०२-९९	६१४-२७	९१,४१७-२६	२,१८५-३५	२,२१५-४०	४,४००-७५	८७,०१६-५१
टिनशेड आणि विहीर	५,३४१-८६	—	५,३४१-८६	७५२-०९	१४४-५०	८९६-५९	४,४४५-२७
उपस्कर आणि स्थावर							
रंगमंदिर	२९,४३५-७७	६,२५०-००	३५,६८५-७७	११,०६०-८३	१,९९७-५०	१३,०५८-३३	२२,६२७-४४
विदर्भ साहित्य संघ	११,०८६-७६	—	११,०८६-७६	४,९४८-६४	६१४-८२	५,५६३-४६	५,५२३-३०
पुस्तके	२,०५१-८४	१,७२५-९७	३,७७७-८१	—	—	—	३,७७७-८१
निर्जीवसाठा	५९६-७६	—	५९६-७६	—	—	—	५९६-७६
कै. नाना जोग पुतळा	३,१३९-४३	—	३,१३९-४३	—	—	—	३,१३९-४३
कै. गडकरी तैल चित्र	३००-००	—	३००-००	—	—	—	३००-००

अनुक्रमणिका

लो. ना. बापूजी अणे तैलचित्र	३२२–०६	·१९–११	३४१–१७	—	—	—	३४१–१७
एकूण	६,७७,८६४–६४	१८,३३९–३९	६,९६,२०४–०३	१,५६,५१५–३१	२४,८३३–१६	१,८१,३४८–४७	५,१४,८५५–५६

आमच्या जोडलेल्या अहवालाप्रमाणे

वावुराव चिमोटे
सरचिटणीस
विदर्भ साहित्य संघ

वा. कृ. चोरघडे
अध्यक्ष
विदर्भ साहित्य संघ

नागपूर दि. १५–७–६७

महेश्वर गद्रे आणि कंपनी
चार्टर्ड अकौंटंटस्

विदर्भ साहित्य संघ–धनवटे रंग मंदिर, नागपूर

३१ मार्च १९६७ ला संपणाऱ्या आय–व्ययाचा तक्ता

व्यय	रुपये नवे पैसे	आय	रुपये नवे पैसे
वेतन	८,५१५–००	भाडे	३४,३५७–५०
वीज खर्च	६,४४२–६८	द्विचक्र स्थान	१,५६६–६६
कर	५,२५९–६९	हीनार्थ (Deficit)	८,८६४–०४
विमा हप्ता	५७८–१३		
दूर ध्वनी	२८४–२५		
अनुज्ञप्ती (Licence Fee)	११५–००		
किरकोळ खर्च	१,३७४–४१		
व्याज	३६०–००		
अधिकोष वर्तन	००–६०		
अवमूल्यन (Depreciation)			
इमारत ५% प्रमाणे	१९,८६०–९४		
उपस्कर १०% प्रमाणे	१,९९७–५०		
एकूण	४४,७८८–२०	एकूण	४४,७८८–२०

बाबुराव चिमोटे
सरचिटणीस,
विदर्भ साहित्य संघ

वा. कृ चोरघडे
अध्यक्ष,
विदर्भ साहित्य संघ

याच दिनांकाच्या अहवालाप्रमाणे
महेश्वर गद्रे आणि कंपनी
नागपूर दि. १५–७–६७ चार्टर्ड अकौंटंटस्

अनुक्रमणिका



मुद्रक : पां. ना. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धनतोली, नागपूर १.
प्रकाशक : मा. गो. गलगलीकर, विदर्भ साहित्य संघ, उत्तर अंबाझरी रस्ता, सीताबर्डी, नागपूर १.

अनुक्रमणिका